# शब्द रुची

मे २०१५ | मूल्य १० रु. | पृष्ठसंख्या : ६०
अतिथी संपादक : प्रवीण बर्दापूरकर



निमित्त : केंद्रातील भाजप सरकारचे एक वर्ष

## ग्रंथाली
## पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



पत्रकार संजीव लाटकर लेखक हेमन्त टकले यांची मुलाखत घेताना





हेमन्त टकले लिखित 'थोडी ओली पाने' पुस्तक प्रकाशनसमयी छगन भुजबळ, विश्वास ठाकूर, लेखक हेमन्त टकले, मधु मंगेश कर्णिक, शरद पवार, सुनील तटकरे आणि डॉ. जब्बार पटेल



किसन चव्हाण लिखित 'आंदकोळ' या पुस्तक प्रकाशनसमयी यशवंतराव गडाख-पाटील, लक्ष्मण माने, लेखक किसन चव्हाण, संदीप जावळे, सुदेश हिंगलासपूरकर, लहू कानडे, किसन चव्हाण यांच्या मातोश्री आणि सुनीता चव्हाण



श्रीवर्धन येथे झालेल्या ग्रंथप्रदर्शन उद्घाटन सुनील तटकरे यांच्या हस्ते झाले. आमदार अवधूत तटकरे 'ग्रंथाली' प्रतिनिधी धनश्री धारप

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मे २०१५, वर्ष तिसरे
अंक दुसरा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **प्रवीण बर्दापूरकर**
मुखपृष्ठ : **विवेक रानडे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

४१ ग्रंथाली



## अनुक्रम

एक वर्षापूर्वी आणि नंतर... / ५
**प्रवीण बर्दापूरकर**
आसमां पै है खुदा... / १०
**अरविंद गोखले**
दी ग्रेट हिंदू सर्कस / १५
**जयदेव डोळे**
मनमोहन ते मोदी... / १९
**सुजय शास्त्री**
'घुमजाव' सरकार! / २५
**सुधाकर जाधव**
नवी दिल्ली : नवे राजकारण! / २८
**अभिलाष खांडेकर**
'टोलमुक्त' देशाचे स्वप्न! – गडकरी / ३१
**विकास झाडे**
शेतकऱ्यांसाठी 'बुरे दिन' / ३५
**श्रीकृष्ण उमरीकर**
मोदी सरकार : पहिल्या वर्षाचा ताळेबंद / ३९
**अमेय तिरोडकर**

ग्रंथपाने
**रोहन प्रकाशन, मौज प्रकाशन,**
**पद्मगंधा प्रकाशन, ग्रंथाली प्रकाशन**

## राजकारण व समाजकारणाचा वेध घेणारी 'रोहन'ची काही नावाजलेली पुस्तकं...

रोहन प्रकाशन
घराला समृद्ध करणारी पुस्तकं

**१ असा घडला भारत**
१९४७ पासूनच्या घटना-घडामोडींतून उलगडलेला स्वतंत्र भारत
स्वातंत्र्योत्तर भारताची सर्व क्षेत्रांतील ६५ वर्षांची समग्र वाटचाल उलगडणारा महद्ग्रंथ!
सं.: **मिलिंद चंपानेरकर, सुहास कुलकर्णी** मोठा आकार ◆ पृष्ठं : ९२४ (रु.१५००)

**२ साउथ ब्लॉक दिल्ली**
परराष्ट्र व्यवहारातील मुत्सद्देगिरीच्या विश्वाचा विविधांगी वेध घेणारं पुस्तक
**विजय नाईक** पृष्ठं : ३६० (रु.३००)

**३ असाही पाकिस्तान**
साहित्य, संस्कृती, कला क्षेत्रातील आगळ्या-वेगळ्या पाकिस्तानची झलक...
**अरविंद व्यं. गोखले** पृष्ठं : २३२ (रु.२४०)

**४ फील्ड मार्शल सॅम माणेकशा**
भारतीय लष्कराचा मानबिंदू
१९७१ च्या बांगलादेश युद्धात पाकिस्तानच्या लष्कराला फक्त १८ दिवसांत शरण आणणाऱ्या सेनानीचं रोमहर्षक चरित्र...
**मे. जन. शुभी सूद** ◆ अनु.: **भगवान दातार** पृष्ठं : २१२+१६ पानं छायाचित्र (रु.२५०)

**५ सहकारधुरीण**
भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करणाऱ्या पद्मश्री **विठ्ठलराव विखे पाटील** यांचं उद्बोधक चरित्र
**अरुण साधू** पृष्ठं : ३०२+२४ पानं छायाचित्र (रु.३४०)

**६ यशवंतराव चव्हाण**
यांची ४ सुप्रसिद्ध पुस्तकं जन-आवृत्तीत
**यशवंतराव चव्हाण**
१. **कृष्णाकांठ** पृष्ठं : ३३२ (रु.१९५)
२. **सह्याद्रीचे वारे** पृष्ठं : ३०४ (रु.१९५)
३. **ऋणानुबंध** पृष्ठं : २४८ (रु.१९५)
४. **भूमिका** पृष्ठं : २४८ (रु.१९५)

रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२
अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या
**www.rohanprakashan.com**



# एक वर्षापूर्वी आणि नंतर...

**प्रवीण बर्दापूरकर**

।।१।।

मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील यूपीएचे सरकार पायउतार होणे ते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तारूढ होणे या काळात दिल्लीत राहण्याची संधी मिळाली. लोकसभेचे वृत्तसंकलन करताना सभागृहात मनमोहनसिंग यांचा परफॉर्मन्स बघता आला. मनमोहनसिंग यांना दोन वेळा भेटण्याचीही संधी मिळाली. त्यापैकी एकदा, त्यांच्यासोबत प्रवास करत रशियात झालेल्या जी-२० परिषदेचे वृत्तसंकलन करता आले. समोरच्याचे म्हणणे शांतपणे तसेच संयमाने ऐकणे, कमीतकमी बोलणे ही त्यांच्यातल्या एका कुशल प्रशासकाने आदबशीर पण नियोजनबद्धरीत्या केलेली आखणी आहे, असे माझे त्यांच्याबद्दल मत झाले आहे. मनमोहनसिंग यांची अर्थतज्ज्ञ म्हणून ख्याती मोठी. पंतप्रधानपदी पी.व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहनसिंग असताना देशाने आर्थिक सुधारणा तसेच उदारीकरणाच्या वाटेवर टाकलेले पाऊल एक पत्रकार म्हणून पाहता आलेले होते. त्या धोरणाचे कर्कशश स्वरात उमटलेले भले-बुरे पडसाद आणि परिणाम अनुभवता आले होते; त्या परिणाम आणि पडसादांचे वृत्तसंकलन एक पत्रकार म्हणून करणाऱ्या पिढीतील मी आहे. त्यांच्या नम्र विद्वत्तेचा गवगवा जगभर कसा आहे याचीही कल्पना होती. पंतप्रधानपदाचे वलय, शिष्टाचार आणि वस्त्रे बाजूला ठेवून रशियाच्या विमान प्रवासात प्रत्येक पत्रकाराच्या आसनाजवळ येऊन त्यांनी व्यक्तिश: परिचय करून घेतला, तेव्हा नम्रताही उजळ असते याची खात्री पटली! मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे काउंटडाऊन सुरु झाल्याचा तो काळ होता. चोहोबाजूंनी टीका आणि आरोपाचे वार त्या काळात सुरू झालेले असताना, ज्या शांत स्वरात राहुल गांधी यांचा उल्लेख आणि राहुल यांनी पक्ष तसेच सरकारचे नेतृत्व स्वीकारावे याबाबत टिप्पणी करत त्यावरून मनमोहनसिंग यांच्यात एक मिश्कीलपणा लपलेला आहे असे मत झाले.



मनमोहनसिंग यांना केवळ भारतीय जनता पक्षाने पुरते बदनाम केले हे म्हणणे मला तरी कधीच पटले नाही. काँग्रेस आणि सरकारमध्ये सोनिया गांधी आणि राहुल गांधी ही जशी सत्ताकेंद्रे होती तशीच अहमद पटेल, मोतीलाल व्होरा, चिदंबरम, अंटोनी हे सरकारातील सर्वोच्च पदाची महत्त्वाकांक्षा बाळगणारे गट होते, शिवाय दिग्विजयसिंह, शीला दिक्षित, कपिल सिब्बल, अजय माकन असे काही उपगट आणि त्यांचे स्वतंत्र हितसंबध होते. याशिवाय 'सरकारकडून उद्योगपतींचा फायदा कसा करून देता येईल याची काळजी' घेणारा दलालांचा एक गट होता; कोळसा कांड हे त्याचे बोलके उदाहरण! घटनाबाह्य सत्ताकेंद्रे, गट, उपगट, उपउपगट आणि मनमोहनसिंग यांच्यासह प्रणब मुखर्जी जोपर्यंत ठामपणे उभे होते तोपर्यंत म्हणजे; प्रामुख्याने यूपीए सरकारचा पहिला पाच वर्षाचा काळ मनमोहनसिंग यांचे कर्तृत्व बहरण्याचा होता. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीएला केंद्रात सत्तेची जी दुसरी टर्म मिळाली त्यात सर्वात महत्त्वाची भूमिका मनमोहनसिंग यांच्या या बहरलेल्या कर्तृत्वाची होती. पंतप्रधानपदाच्या पहिल्या टर्ममध्ये प्रणब मुखर्जी हे मनमोहनसिंग यांच्यासोबत सावलीसारखे

होते आणि सोनिया गांधी यांचा अविचल विश्वास असल्याने हे दलाल, गट तसेच उपगटांचे उपद्व्याप आणि राजकिय अडथळे ठोसपणे मनमोहनसिंग यांच्या मार्गात अडसर म्हणून उभे राहू शकले नाहीत हे नाकारताच येणार नाही.

प्रणब मुखर्जी राष्ट्रपती झाल्यावर मात्र चित्र बदलेले. सोनिया गांधी यांचा प्रचंड विश्वास असूनही पक्ष तसेच सरकारातील हे दलाल समर्थक तसेच मनमोहनसिंग विरोधी गट आणि उपगट अधिक सक्रिय झाले, त्यांचे 'उपद्रव मूल्य' आणखी वाढले. हे उपद्रव मूल्य मंत्रिमंडळातील अन्य कोणाहीपेक्षा प्रामुख्याने मनमोहनसिंग यांनाच त्रासदायक ठरले. त्यातच या गटाला राहुल गांधी यांना आपल्या बाजूने ओढून घेण्यात यश मिळाल्यावर तर मनमोहनसिंग यांच्या आणि त्यांच्या सरकारच्या भ्रष्टाचार तसेच असलेल्या-नसलेल्या अकार्यक्षमतेचा खूप डांगोरा पिटला गेला. तसा बोभाटा करवण्यात या गट तसेच उपगटांनी मोठी कामगिरी बजावली. पंतप्रधानपदाच्या मनमोहनसिंग यांच्या पहिल्या कार्यकालात त्यांचे प्रसिद्धी सल्लागार असलेले संजय बारू यांच्या 'The Accidental Prime minister' या पुस्तकातील; पंतप्रधान म्हणून बहुतांश काळ मनमोहनसिंग कसे कळसूत्री बाहुले होते, या स्वरूपाच्या मजकुराने दिल्ली राज्याबाहेरच्या लोकांना आश्चर्य वाटले, पण दिल्लीच्या सत्तादालनात मात्र मनमोहनसिंग यांना अंतर्गत विरोधकांच्या कुरघोड्यांनी कसे प्रभावशून्य आणि हतबलही केले गेलेले आहे याची उघड चर्चा होती. धनलोलुप दलाल तसेच या गट आणि उपगटांनी माध्यमांना हाताशी धरून पेरलेल्या बातम्या तसेच राहुल गांधी यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग अमेरिकेत असताना सरकारच्या निर्णयाची ज्या जाहीरपणे खिल्ली उडवली; त्या तुलनेत भारतीय जनता पक्षासकट सर्वच एकजात विरोधी पक्षांनी मनमोहनसिंग यांच्यावर केलेली टीका मवाळ तर होतीच पण महत्त्वाचे म्हणजे अपमानास्पद नव्हती असे म्हणायला भरपूर जागा आहे. या अंतर्गत कुरघोड्यांवर मनमोहनसिंग यांना प्रणब मुखर्जी यांच्या मदतीशिवाय प्रभावीपणे मात करत आली नाही ही वस्तुस्थिती आहे. You see, you must understand one thing. I have come to the terms with this. There can not be two centres of power असे मनमोहनसिंग म्हणाले (बारू यांच्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर ब्लर्ब म्हणून ते विधान प्रकाशित करण्यात आले आणि त्या म्हणण्याचा मनमोहनसिंग यांनी कधीही इन्कार केला नाही) त्याची पार्श्वभूमी ही अशी सरकारात निर्माण झालेल्या घटनाबाह्य सत्ताकेंद्र तसेच अंतर्गत कुरघोडीच्या राजकारणाची आहे. भ्रष्टाचाराचा कळस, कंबरडे मोडणारी महागाई आणि मनमोहनसिंग सरकारची काँग्रेसमधून झालेली मोठी बदनामी या नकारात्मक बाबींचे अवजड ओझे आणि आपली सत्ता नक्की जाणार याची पूर्ण जाणीव घेऊन यूपीएतील काँग्रेससकट सर्व घटक २०१४च्या लोकसभा निवडणुकीचा मुकाबला करण्यासाठी सज्ज झाले तेव्हा नरेंद्र मोदी यांना प्रतीक्षा होती ती केवळ त्यांच्या विजयावर शिक्कामोर्तब होण्याची!

खरे तर, केंद्रात यूपीएची सत्ता जाऊन एनडीएची सत्ता आली' हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. कारण नरेंद्र मोदी यांनी एनडीए तर लांबच, भारतीय जनता पक्षाच्या नावावर मते मागितली नाहीत. त्यांनी कधीच मनमोहनसिंग यांच्यावर टीकास्त्र सोडले नाही. कारण मनमोहनसिंग यांचे (मोदी यांच्या आवडत्या उद्योगपतींच्या गोटाला सोयीचे ठरणारे) आर्थिक उदारीकरणाचे धोरण मोदी यांना पुढे न्यायचे होते. मोदी यांनी प्रामुख्याने जोरदार हल्ला चढवला तो आत्मविश्वासाचा अभाव असलेल्या काँग्रेसचे भावी नेते 'शहजादा' राहुल गांधी यांच्यावर; हे उल्लेखनीय आहे. 'अब की बार, मोदी सरकार' अशी मोदी प्रचाराची बेसलाईन होती. त्यामुळे यूपीएची सत्ता जाऊन नरेंद्र मोदी सत्तेत आले', असे म्हणणे अचूक ठरेल. मोदी यांचा भावी पंतप्रधान म्हणून होणाऱ्या उदयाची प्रक्रिया संघपातळीवर अडवाणी यांनी पाकिस्तानात जाऊन मोहम्मद अली जिना यांची स्तुती केली तेव्हाच म्हणजे; २०१४च्या लोकसभा निवडणुकाआधी साडेचार-पावणेपाच वर्षांपूर्वी सुरू झालेली होती. अडवाणी गटाकडून पक्षाध्यक्षपद काढून ते नितीन गडकरी यांच्याकडे देण्यात आले, लोकसभेतील विरोधीपक्षनेतेपदावरचा अडवाणी यांचा हक्क त्याआधीच डावलला गेलेला होता. अडवाणी नावापुरते राहिलेले होते आणि मुरली मनोहर जोशी, जसवंतसिंह, कलराज मिश्र नावापुरते ज्येष्ठ नेते होते. पक्षांतर्गत पातळीवर मोदी यांचा नेता म्हणून एकमताने स्वीकार ही औपचारिकता लोकसभा निवडणुकीपूर्वी शिल्लक होती. दुर्धर आजारपण आणि त्यामुळे झालेली शारीरिक विकलांग अवस्था यामुळे अटलबिहारी वाजपेयी बाजूलाच झालेले होते. लालकृष्ण अडवाणी यांनी पंतप्रधान होण्याची पात्रता आणि गरज (संघाच्या दृष्टिकोनातून) गमावलेली आहे, अडवाणीही आपला 'हिंदुत्वाचा अजेंडा' पुढे नेऊ शकत नाहीत, हे एव्हाना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पुरते सिद्ध केलेले होते. अडवाणी यांना पक्षाचा नेता म्हणून पूर्ण निष्प्रभ करणे आणि त्यांचा गटाच्या मुसक्या आवळणे ही कामगिरी नरेंद्र मोदी यांना करायची होती. त्यासाठी संघाची पूर्ण ताकद त्यांच्या पाठीशी होती. नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून प्रतिष्ठापना करण्यासाठी राजनाथसिंह, अडवाणी समर्थनाचे शस्त्र म्यान करून अरुण जेटली आणि नितीन गडकरी ही ताज्या दमाची फौज तयार होती. त्यांच्या दिमतीला पक्षाचे दुसऱ्या फळीतील जवळजवळ सर्वच नेते होते. मोदी यांच्या विरोधात अडवाणी यांनी बराच थयथयाट करण्याचा प्रयत्न केला, पण तो थंड डोक्याने शमवण्यात आला. नाराज अडवाणी आणि संघ, असंतुष्ट अडवाणी आणि पक्ष यांच्यातील मध्यस्थ म्हणून नितीन गडकरी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि अडवाणी यांना अक्षरशः नमवले गेले.

नरेंद्र मोदी हे नाव राष्ट्रीय राजकारणात काही अपरिचित नव्हते. ८०च्या दशकात त्यांनी भाजपच्या मुख्यालयात काम केलेले होते. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून ते देशाला परिचित होते आणि गुजरात दंगलीतील एकांगी वादग्रस्त भूमिकेमुळे त्यांच्याविषयी देशात अत्यंत उत्सुकता होती. पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नाव जाहीर झाल्यावर नरेंद्र मोदी यांच्या कार्यशैलीचा परिचय दिल्लीला

नव्याने झाला. मोदी सर्व निर्णय स्वत: सर्व बाबी तपासून घेत. त्यांच्या कामात पूर्ण एकाधिकारशाही आहे आणि ते केवळ अमित शहा वगळता कोणावरही अवलंबून राहत नाहीत हे काही दिवसांतच स्पष्ट झाले. त्यांचे कार्यक्रम मग ते भेटी-गाठी असो की जाहीर सभा की अगदी कोणासोबतचे साधेसे चहा-पान; ते सर्व गुजरात राज्यात ठरत आणि ते राबवणारी त्यांची स्वतंत्र यंत्रणा असे. मोदी जाणार तिथे ही यंत्रणा कामाला लागत असे. या यंत्रणेच्या कामात लुडबूड किंवा दुरुस्ती करण्याची कोणालाही परवानगी नसे. मोदींची वेशभूषा-केशभूषा, खाणे-पिणे, भाषणातील मुद्दे, पोस्टर-बॅनर कसे असणार, त्यावर काय मजकूर आणि कोणाचे छायाचित्र असणार, त्या छायाचित्राचा आकार काय असणार, स्थानिक वृत्तपत्रातील जाहिराती आणि जाहिरातींच्या त्या बिलाचे 'डील' काय असणार, त्यांच्या कारमध्ये कोण बसणार, सभेच्या ठिकाणी डी'मध्ये जाण्याची परवानगी कोणाला मिळणार, व्यासपीठावर कोण बसणार, कोण किती वेळ बोलणार, मोदी यांचे भाषण कोणत्या वृत्तवाहिनीवरून लाइव्ह प्रसारित होणार... आदी सर्व तपशील ही यंत्रणा ठरवत असे. गुजरातच्या या यंत्रणेने माहिती दिल्यावर मोदी यांच्या दौऱ्याचे तपशील पक्षाच्या दिल्ली मुख्यालयात कळत.

मोदी यांच्या कामाची पद्धत कशी एकचालकानुवर्ती आणि कडेकोट होती याचे एक उदाहरण- रामविलास पासवान आणि त्यांचा पक्ष लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाशी युती करणार आहे याची माहिती दिल्लीत भाजपच्या कोअर गटालाही नव्हती. पासवान यांच्याशी युती करण्याबाबत अमित शहा यांनी केवळ नरेंद्र मोदी यांच्याशीच चर्चा केली होती. त्यामुळे या युतीची बातमी आली तेव्हा भाजप मुख्यालयातील प्रवक्त्यांचे चेहरे पूर्ण अनभिज्ञतेने काळवंडलेले होते! सोशल मीडिया सांभाळण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी स्वत:ची यंत्रणा उभारली होती. मोदी यांच्यासंबंधी येणाऱ्या प्रत्येक कमेंटचे खंडन कसे करायचे याची योजना राबवली जात होती. प्रकाशवृत्त वाहिन्यांवरून त्यांच्या सभांची प्रसारणं थेट (मालक पातळीवर) ठरत आणि त्यात फेरबदल करण्याची प्राज्ञा कोणाची नसे हेही मी अनुभवले आहे. त्याचे झाले असे-दिल्लीत विधासभा निवडणुका सुरु असताना एक रविवार असा आला की, एकाच वेळी पाटण्यात मोदी आणि दिल्लीत राहुल गांधी यांच्या सभा होत्या. मोदींची सभा अर्थातच लोकसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वीची होती आणि राहुल गांधी यांची विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी शेवटच्या टप्प्यात असताना होती. त्यामुळे राहुल यांना प्राधान्य मिळावे यासाठी इलेक्ट्रॉनिक मीडियातील आमच्या एका सहकाऱ्याचे प्रयत्न कसे निष्फळ ठरले हे 'याचि डोळा..' मी अनुभवले! मोदी यांची ही कार्यशैली अनुभवताना जॉर्ज ऑरवेलच्या कादंबरीतील 'बिग-ब्रदर'ची त्या काळात अनेकदा आठवण व्हायची!

**नाराज अडवाणी आणि संघ, असंतुष्ट अडवाणी आणि पक्ष यांच्यातील मध्यस्थ म्हणून नितीन गडकरी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि अडवाणी यांना अक्षरशः नमवले गेले.**

निवडणुकीचे निकाल येण्यास सुरुवात झाली आणि जेमतेम अर्ध्या तासातच पंतप्रधानांची सुरक्षाव्यवस्था बघणाऱ्या चमूला घेऊन एक विशेष विमान गांधीनगरला निघाले असल्याची बातमी आली. मनमोहनसिंग यांचा पंतप्रधान म्हणून अस्त झाला असून नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान म्हणून उदय झाला असल्यावर शिक्कामोर्तब झाले आणि मी टीव्ही बंद केला...

त्यापुढच्या वर्षभरात काय घडले त्याचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न म्हणजे 'शब्द रुची'चा हा अंक आहे. ज्या देशात एकीकडे सरकारात दर पाच वर्षांनी बदल होतात आणि दुसरीकडे एकदा नोकरीला लागल्यावर निवृत्त होईपर्यंत अधिकारी-कर्मचारी घट्ट चिकटून असणारी प्रशासकीय यंत्रणा असते, त्या भारतासारख्या क्षेत्रफळाने अवाढव्य आणि व्यापक मिश्रभाषक-संस्कृती असणाऱ्या तसेच असंख्य धर्म-जाती-उपजातींचे हितसंबध प्रबळ असणाऱ्या देशात केवळ एका वर्षात सरकारच्या कामाचा लेखा-जोखा मांडणे अवघड असते. ही प्रशासनयंत्रणा बदलायला पटकन तयार नसते कारण सरकारप्रमाणे या यंत्रणेला दर पाच वर्षांनी निवडणुकीच्या परिक्षेला बसायचे नसते. म्हणूनच सरकार बदलल्यावर बाटली नवी, दारू मात्र जुनीच' असे म्हणण्याचा प्रघात असावा! सत्तेच्या दालनात असे समजले जाते, की दोन अर्थसंकल्प सादर झाल्यावर कोणतेही नवे सरकार सरकार स्थिरावते आणि चौथ्या अर्थसंकल्पापासून त्या सरकारला संभाव्य निवडणुकीचे लागलेले वेध दिसू लागतात. तरीही एका वर्षात केंद्र सरकारची कामगिरी कशी आहे, याचा विविध पैलूंतून आढावा घेण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. यातील बहुसंख्य लेखक 'शब्द रुची'साठी नवीन असले तरी नावलौकिक संपादन असलेले हे सर्व आहेत. हे मान्यवर 'शब्द रुची'च्या वाचकांनाही कळावेत म्हणूनच त्यांच्या लेखनाचे नियोजन करण्यात आलेले आहे. प्रतिभावान कलावंत विवेक रानडे यांनी तत्परतेने मुखपृष्ठ करून देऊन 'ग्रंथाली'वरील लोभाचा पुन:प्रत्यय दिला. या अंकाचा अतिथी संपादक म्हणून मी या सर्व मित्रवर्य लेखकांच्या ऋणातच राहणे पसंत करेन.

।।२।।

वयाच्या साठीच्या उंबरठ्यावर असताना आम्ही दिल्लीला शिफ्ट होण्याचा घेतलेला निर्णय अनेक मित्रांना रुचला नव्हता तर काहींना; ज्यांच्यासाठी मी काम करणार, तिथे माझे सूर जुळणार का अशी शंका होती. मी मात्र दिल्ली जवळून अनुभवण्यासाठी


आतुर झालेलो होतो. दिल्ली विधानसभा निवडणुकीने माझ्या आकलनाच्या कक्षा गतीने विस्तारण्यात मोठी भर घातली हे नि:संशय. या निवडणुकीच्या निमित्ताने मी राजधानी दिल्लीच्या गल्ली-बोळात एखाद्या नवख्या वार्ताहरासारखा वणवण फिरलो. त्यामुळे दिल्लीचा 'फील' अगदी तळागाळातून आला. त्यातच मराठी माणसाच्या अस्मितेचा कळसाध्याय असणारा गणेशोत्सव कव्हर केल्याने अफाट विस्तारलेल्या दिल्लीच्या मराठी वर्तुळात सहज थेट प्रवेश मिळाला. लोकसभेचे अधिवेशन, आम आदमी पार्टीचा उदय, विजय आणि ४९ दिवसांत सत्तेतून पायउतार होणे, चारा घोटाळ्यात लालूप्रसाद गजाआड होणे, तहेलका'च्या तरुण तेजपालचे बिंग फुटणे, नितीन गडकरी यांचे दिल्लीतील डळमळीत झालेले अस्तित्व आणि त्यांनी पुन्हा घट्ट पाय रोवणे, नरेंद्र मोदी यांचा उदय आणि भारतीय जनता पक्षात लालकृष्ण अडवाणी यांचा अस्त, आत्मविश्वासाचा अभाव असणाऱ्या राहुल गांधी यांचे नेता म्हणून तालकटोरा स्टेडियमवर काँग्रेसकडून घाईघाईने करण्यात आलेले प्रोजेक्शन आणि तरीही दिल्ली विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीत झालेली काँग्रेसची धूळदाण... असे विविधांगी अनुभव; दिल्लीचा असह्य उकाडा, सलग टोचणारी उन्हे, मुंबईच्या तुलनेत पडणारा चिमूटभर पाऊस आणि हाडाला चावा घेणारी-गात्रे कडकडा वाजवणारी थंडी झेलत मला घेता आले. दिल्ली अशी 'ग्राउंड लेव्हल'वर कळायला साधारणपणे कोणाही पत्रकाराला एरवी चार-पाच तरी वर्षे लागायला हवीत. मला मात्र अत्यंत कमी वेळेत एक पत्रकार म्हणून दिल्ली जरा जास्तच धीटपणे भिडली.

राजकीयदृष्ट्या विचार केला तर देशाच्या स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राची दिल्लीच्या सत्तेच्या दालनातील ओळख म्हणा की प्रतिमा की चेहरा म्हणजे; चिंतामणराव देशमुख आणि नंतर प्रदीर्घ काळ यशवंतराव चव्हाण, हे ऐकले होते. या दोघांनीही ही महाराष्ट्राची ओळख दिल्लीचे सांस्कृतिक जगत आणि मराठी वर्तुळात विस्तारत नेली. पुढे मधू दंडवते, वसंत साठे आणि अल्पकाळ अब्दुल रहमान अंतुले यांच्या नावे ही ओळख मिरवल्याचा अनुभव आमच्या पिढीच्या पत्रकारांनी घेतला होता. वसंत साठे यांची आठवण तर दिल्लीच्या एकूण सांस्कृतिक वर्तुळात आणि मधू लिमये यांची आठवण इंटेलेक्चयुल सर्कलमध्ये आजही आदराने काढली जाते. नंतर प्रमोद महाजन म्हणजे महाराष्ट्र असे समीकरण बराच काळ होते. शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे यांनी ती जागा नंतर घेतली. केंद्रीय गृहमंत्री झाल्यावर सुशीलकुमार शिंदे यांच्यावर सुरक्षेची बंधने आली. आधी प्रमोद महाजन आणि नंतर शरद पवार यांनी मात्र सुरक्षेचे हे अडथळे बाजूला ठेवून 'मराठीपण' दिल्लीत जपले. दिल्लीत असले की शरद पवार दररोज सकाळी थोडा वेळ का असेना लोकांसाठी सहज उपलब्ध असत. दिल्लीत येणारा मराठी कलावंत, साहित्यिक या तीनपैकी एका (शक्यतो पवार यांच्याच!) घरात मैफिल भरवणार ही प्रथाच झाली. पवार-महाजन घरी नसले तरी त्यांचा कर्मचारीवृंद दूरदेशातून दिल्लीत आलेल्या मराठी माणसाची काळजी घेणार हे नक्की असायचे. मी दिल्लीत असताना माणिकराव गावित आणि प्रतीक पाटील हे मंत्रीमंडळात होते, पण या संपूर्ण वास्तव्यात एकदाही त्यांची भेट झाली नाही. साधारणपणे सहज लक्षात येणारी आणि महत्त्वाची बाब म्हणजे, महाराष्ट्रातला राजकारणी दिल्लीच्या राजकारणात मनापासून रमला तो केवळ (ही यादी खूप मोठी आहे!) राजकारणापुरताच. याला अपवाद वसंत साठे, मधू दंडवते आणि मधू लिमये यांचा. त्यांची आठवण आजही काढली जाते. मधू लिमये यांचे तर एका मार्गाला नाव देण्यात आले इतका प्रभाव परिणामकारक होता. महाविद्यालयीन जीवनापासूनचे स्नेही असणारे, महाराष्ट्रात लोकनेते असूनही गोपीनाथ मुंडे तर दिल्लीत रमलेच नाहीत. काम संपताच त्यांना मुंबईचे विमान पकडण्याची घाई होत असे. महाराष्ट्रात मराठीचे राजकारण करणाऱ्या शिवसेनेचे अस्तित्व दिल्लीच्या मराठी वर्तुळात नाही; 'महाराष्ट्र म्हणजे शिवसेना' अशी स्वत:ची ओळख काही दिल्लीत 'मराठी' शिवसेनेला निर्माण करता आलेली नाही. (तरी, एक उल्लेखनीय बाब म्हणजे, दिल्ली आणि उत्तर भारतात राज ठाकरे यांच्याविषयी क्रेझ आहे. 'महाराष्ट्र से आये क्या?' या प्रश्नाला आपण होकारार्थी उत्तर दिले की 'ये राज ठाकरे इतना अंगार क्यो है?' हा प्रश्न कॉमन!) महाराष्ट्रातून येणाऱ्या लोकांची राहणे-खाणे आणि रेल्वेचे तिकीट कन्फर्म करून देत प्रवासाची सोय केली की आपली जबाबदारी संपली, अशीच दिल्लीत असणाऱ्या महाराष्ट्रातील बाकी राजकीय नेत्यांची धारणा. पण, हेही भान कमी खासदारांना. उत्तराखंडमधील महाभयंकर आपत्तीत सापडलेले मराठी लोक दिल्लीत यायला सुरुवात झाल्यावर त्यांच्या सांत्वन आणि मदतीला प्रसिद्धी खाते तसेच महाराष्ट्र सदनाच्या कर्मचाऱ्यांसोबत महाराष्ट्रातील खासदारांपैकी सर्वात प्रथम, तेही बेरात्री धावून गेले ते हंसराज अहिर आणि प्रकाश जावडेकर हे दोघेच खासदार.

> मोदी यांची ही कार्यशैली अनुभवताना जॉर्ज ऑरवेलच्या कादंबरीतील 'बिग-ब्रदर'ची त्या काळात अनेकदा आठवण व्हायची!

याची कारणे जशी व्यक्तिसापेक्ष जडणघडण आणि व्यक्तिपरत्वे असणारी कुवत ही आहेत, तशीच त्याची कारणे दिल्लीच्या राजकारणाच्या शैलीतही दडलेली आहेत. डावपेच, बेरीज वजाबाकीची समीकरणे यात आपण (म्हणजे महाराष्ट्रातील जनता) शरद पवार यांना समकालीन राजकारणात प्रमाण' मानतो. दिल्लीत १०० शरद पवार एका व्यक्तीत एकवटून वसलेले आहेत, असे दीड-दोन हजारांवर राजकारणी सहज सापडतील. दिल्लीच्या राजकारणाचे

पाणी वेगळेच आहे. जिभेवर खडीसाखर, डोक्यावर बर्फ आणि चेहऱ्यावरची सुरकुती हलू न देता अदृश्य बेरकेपणाने सारे राजकारण सुरू असते. आपल्या मनात काय चालले आहे याचा समोरच्याला जराही अंदाज येऊ न देता समोरच्याच्या मनातील गुपित काढून घेण्यात दिल्लीच्या सत्तादालनातील बालवाडीत शिकणारे बालकही एकदम वस्ताद! असे दोन असामी भेटले की त्यांचे परस्परांशी 'पायलागू', 'प्रणाम जी', 'हां जी', 'आप का तो बस नामही काफी है हुजूर', 'आदेश करिये/दीजिये सिर्फ आप' अशा तडतडणाऱ्या फुलझड्यांसह चाललेले वागणे/बोलणे परस्परांचे राजकारणातले पाणी किती खोल आहे हे जोखण्याचा इरसाल पाठ असतो! संसदेच्या सेन्ट्रल हॉलमध्ये अहमद पटेल, मोतीलाल व्होरा, जॉर्ज असे अर्क लोक सोफ्यावर बसून शांतपणे राजकारणातली 'जोड-तोड' कशी करतात, हे बघणे हा कोणतीही भेसळ नसलेला दिल्ली दरबारातील इरसाल राजकारणाचा अस्सल अनुभव असतो. दिल्ली दरबारात आजवर असे अर्क अनेक झाले, आजही आहेत आणि उद्याही असतील कारण, ती दिल्ली दरबाराची मूलभूत गरजच आहे. मराठी माणूस अशा राजकरणात रमू शकत नाही. सर्वसाधारणपणे 'दोन घ्यावे दोन द्यावे' हा मराठी गुण दिल्लीत मात्र अवगुण ठरतो!



अलिकडच्या २०-२५ वर्षांत दिल्लीच्या राजकारण आणि सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्र म्हणजे प्रमोद महाजन, शरद पवार, सुशीलकुमार शिंदे हे रूढ असलेले समीकरण गेल्या वर्षभरात पुसट होत गेलेले आहे. यात शरद पवार यांचा संपर्क ७८-८०पासून म्हणजे चार दशकांचा आणि महत्त्वाचे म्हणजे जात-धर्म-राजकीय विचार या पलीकडचा. हाच वारसा मग प्रमोद महाजन आणि सुशीलकुमार शिंदे यांनी चालवला. गेल्या वर्षीपर्यंत महाराष्ट्रातला माणूस दिल्लीत आला की राजकीय विचार बाजूला ठेवून या तिघांना (प्रमोद महाजन यांची हत्या झाली आणि यातील एक घर बंद झाले.) किंवा त्यापैकी एक-दोघाचे दर्शन घेतल्याशिवाय परतीचा प्रवास सुरू करत नसे. सुशीलकुमार निवडणूक हरल्याने आता दिल्लीत फारसे नसतात आणि शरद पवार यांचे दिल्लीत असणे तुलनेने कमी झालेले आहे; ती जागा आता नितीन गडकरी, प्रकाश जावडेकर, सुरेश प्रभू, हंसराज अहिर, मनोहर पर्रीकर, पीयूष गोयल यांनी घेतली आहे; हा या वर्षभरातील महत्त्वाचा बदल आहे. राजकीय अभिनिवेशात बोलायचे तर महाराष्ट्राची दिल्लीतील सेक्युलर ओळख आता हिंदुत्ववादी झाली आहे! यात नितीन गडकरी यांचे स्थान खूप वरचे आहे.

अर्थात त्यासाठी गडकरी यांना बरेच चढ-उतार सहन करावे लागले. गडकरी यांचा स्वभाव अस्सल वऱ्हाडी, मोकळाढाकळा आणि राजकारणाची शैली त्यापेक्षाही जास्त मोकळीढाकळी. त्यात पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी (वरवर लोकशाही मार्गाने पण,) थेट नियुक्ती झालेली. दिल्लीकरांना हे रुचणे शक्यच नव्हते. बेरक्या दिल्लीकरांनी गडकरींना दिल्ली दरबाराच्या हॉल'मध्येच गुंतवून टाकले, घराच्या आत जाऊच दिले नाही आणि पुरते बदनामही केले. कोण खरे बोलतोय, कोण नाही हे कळेपर्यंत दोन वर्षे उलटली आणि गडकरींना अध्यक्षपदाची दुसरी टर्म मिळणार हे स्पष्ट झाल्यावर तर पक्षांतर्गत कट-कारस्थानांनी कळसच गाठला; गडकरींना अनेक वादांत अडकवले गेले तर काही जाळ्यांत ते स्वत:हून सहज अडकले. दिल्लीकरांनी गडकरींचा पार खिमा करून टाकला. पण पदामुळे एव्हाना गडकरी पक्षात महत्त्वाचे नेते झालेले होते. पक्षाचे निर्णय घेणाऱ्या सर्व महत्त्वाच्या समित्यांवर ते पदसिद्ध सदस्य होते. राष्ट्रीय अध्यक्षपद गेले तरी महाराष्ट्रात परतायचे नाही हे त्यांनी ठरवले आणि दिल्ली विधानसभा निवडणुकीचे आव्हान जिद्दीने स्वीकारले. कामाची क्षमता, संघटनचातुर्य आणि आकलनाबद्दल वादच नव्हता. त्यांनी स्वभावाला मुरड घातली, बोलणे कमी केले, विस्कळीत झालेला पक्ष अगदी मुळातून बांधला. निवडणुकीत पक्ष दिल्ली विधानसभेत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आणला. त्याचवेळी अडवाणी आणि त्यांच्या गटाच्या मुसक्या आवळण्याचे काम पक्ष पातळीवर सुरू होते त्या कटकटीच्या काळात अडवाणी आणि पक्ष, अडवाणी आणि संघ यांच्यात दुवा म्हणून काम करण्याच्या मिळालेल्या संधीचे गडकरींनी सोने केले. अडवाणी नाराज झाले असले तरी बंडाचे शस्त्र उगारणार नाहीत (एका क्षणी अडवाणी 'लेटर बॉम्ब'चा स्फोट करायला निघाले होते!) यासाठी कळीची भूमिका निभावली. सरकार आल्यावर पायाभूत सुविधांचे काम करणारे खाते हट्टाने मागून घेत गडकरी यांनी स्वतची एक प्रतिमा आता निर्माण केली आहे. केंद्र सरकारात काम करणारे मंत्री म्हणून जे ओळखले जातात त्यात गडकरी, सुरेश प्रभू, प्रकाश जावडेकर, मनोहर पर्रीकर ही मराठी माणसे आहेत आणि शरद पवार-सुशीलकुमार शिंदे यांची प्रतिमा अस्पष्ट झाल्याने या सर्वांची दिल्लीतला महाराष्ट्र अशी नवी ओळख आता निर्माण झालेली आहे. गेल्या वर्षभरातील दिल्लीतला हा एक मोठा राजकीय आणि सांस्कृतिक बदल आहे. इंग्रजी-मराठी वाचन, साहित्य, संगीत यात रुची, राजकारणापुरतेच राजकारण, मैत्री जपण्याचा गुण आणि पक्षातले मोक्याचे स्थान असल्याने नितीन गडकरी या दिल्लीतील महाराष्ट्राचा राजकीय-सांस्कृतिक प्रतिमेचा मुख्य चेहरा आहेत! महाराष्ट्राची दिल्लीतली ही प्रतिमा किती काळ टिकते याचे उत्तर आज तरी कोणाचकडे नाही! ●

**- प्रवीण बर्दापूरकर**
९८२२०५५७९९ / ९०११५५७०९९
praveen.bardapurkargmail.com



# आसमां पै है खुदा...

**अरविंद गोखले**

नरेंद्र मोदी पंतप्रधान बनले त्या घटनेला आता एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यांच्या कारकिर्दीचे सविस्तर मूल्यमापन करायची ही वेळ नक्कीच आहे. भारतीय जनता पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांमध्ये दिसू लागलेली सत्तेची मस्ती किंवा धुंदी म्हणू या फार तर, आवरली नाही तर मोदींना किंवा त्यांच्या पक्षाच्या दुसऱ्या कोणत्याही नेत्याला सत्तेवर यायची संधी पुन्हा मिळणे अवघड आहे. खुद्द मोदींनी आपल्या खासदारांना केवळ शब्दांचे फटकारे लगावत न बसता किंवा त्यांना कानपिचक्या देत न बसता त्यांना पक्षातून काढून टाकण्याची हिंमत दाखवायची गरज आहे. त्यासाठी त्यांच्या हाताशी अमित शहा यांच्यासारखी व्यक्ती अध्यक्षपदी आहे. मोदींनी आता त्यांच्या परिवाराचे प्रमुखपद भूषविणाऱ्या संघटनेलाही आपल्या कामात अडथळे उभे न करायचा सल्ला द्यायला हवा.

सध्या झाले आहे ते असे की,
आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आजकल वह इस तरह देखता है कम

'फिर सुबह होगी' चित्रपटातल्या साहिर लुधियानवी या कविश्रेष्ठाने लिहिलेल्या या अतिशय हृद्य अशा ओळी आठवाव्यात अशी सध्याची अवस्था आहे. तो खुदा वर म्हणजे सत्तेवर आहे असे मानले तर खाली मीच आहे ही घमेंड आता डोकावू लागली आहे आणि तो परमेश्वार (सत्ताधीश) या बाजूला लक्षही देत नसल्याने निर्माण होणारी अवस्था सध्या आपण अनुभवतो आहोत. मोदी यांच्या मंत्रिमंडळातले एक-दोघे अपवाद वगळता सहकारी कामाच्या अनुभवाने शून्य आहेत हे मान्य केले तरी त्यांच्या चेहऱ्यावर जे सौजन्य दिसायला हवे ते दिसत नाही. त्याचबरोबर कोणी स्वामी, आचार्य, कोणी साध्वी, कोणी आनंद वगैरे मंडळी कसे बहकल्याप्रमाणे बोलतात त्याचे दर्शन गेल्या काही महिन्यांपासून आपण घेत आहोत. या ठिकाणी एक किस्सा सांगायलाच हवा. १९७७ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले आणि पंतप्रधान मोरारजी देसाई यांचा परदेश दौरा होता. आताप्रमाणे तेव्हाही पंतप्रधान परदेश दौऱ्यावरून परतल्यावर विमानतळावर अतिविशिष्ट व्यक्तींच्या स्वागतकक्षात हारतुरे घेऊन कॅबिनेटमंत्री, सचिव आदि उपस्थित असायचे. तसे तेव्हाचे केंद्रीय आरोग्यमंत्री राजनारायण हजर होते. राजनारायण हे मोरारजी देसाई यांच्या दिशेने गेले आणि त्यांनी मोरारजी देसाई यांच्या हाताला अत्तर लावायचा प्रयत्न केला, तेव्हा मोरारजींनी त्यांना सुनावले आणि म्हटले की, अत्तर हे सुगंधासाठी असते आणि तुम्ही माझ्या अनुपस्थितीत इथे जी घाण करून ठेवलेली आहे ती या अत्तराने दूर होणे कठीण आहे. तेव्हा आपली जीभ आधी सांभाळा.

> मोदींनी आता त्यांच्या परिवाराचे प्रमुखपद भूषविणाऱ्या संघटनेलाही आपल्या कामात अडथळे उभे न करायचा सल्ला द्यायला हवा.

त्यावेळी आपल्या सरकारला धोकादायक ठरणारे खलपुरुष कोण आहेत ते मोरारजी देसाईंना कळले होते तसे ते त्यांच्याच राज्यातून आलेल्या मोदींना कळले आहे की नाही ते कळत नाही. पण ते समजा, कळले तरी ते वळेल असे नाही. तेव्हा चरणसिंह हे त्यावेळच्या सगळ्या उठाठेवीचे कर्तेकरविते होते, आता दुसरे कोणी असू शकते. हे निखारे फार काळ अस्तनीत ठेवून चालणार नाहीत. काही दिवसांपूर्वी अण्णा हजारे यांना भेटून गेलेल्यांमध्ये कोणकोण होते याची यादी जर तपासून पाहिली तर काही विशिष्ट ग्रह मोदी यांच्या विरोधात एकत्र येऊ लागले आहेत हे लक्षात येते. त्यांनी तसे एकत्र यायला माझी हरकत असायचे कारण नाही, पण ज्यांनी मोदींचे नाव निवडणुकांपूर्वी दोन वर्षे आपल्या मायक्रोस्कोपखालून तपासून घेतले तेच आत त्यांना दूर करण्यासाठी पुढाकार घेत आहेत असा संशय आहे. याचे कारण काय असू शकेल याच्या खोलात मी जाणार नाही, कारण ज्यांनी या पदावर लालकृष्ण अडवाणींना डावलून मोदींना बसवायचे बऱ्याच आधीपासून निश्चित केले होते त्यांनीच त्यांचे ते पद काढून घ्यायचे ठरवले असेल तर

त्यांना रोखणार कोण असा प्रश्न आहे. कदाचित म्हणूनच सरकारच्या कामात अडथळे निर्माण होतील अशी विधाने करण्याची स्पर्धा सुरू आहे आणि हे कमी पडले म्हणून की काय, शिवसेनेसारखा सहकारी पक्षही आपली पायरी ओलांडताना पाहायला मिळतो आहे. सामना या वृत्तपत्रात जे प्रसिद्ध होते ते शिवसेनेचे अधिकृत मत आहे असे मानायचे झाले तर, –म्हणजे ते तसे असतेच असे बहुतेकांचे मत आहे– काही दिवसांपूर्वी मुस्लिमांचा मतदानाचा हक्क काढून घेण्याविषयी जे प्रसिद्ध झाले त्याची जबाबदारी कोण घेणार? खासदार संजय राऊत यांनी त्या विधानापासून आता फारकत घेतली आहे. अर्थात शिवसेनेवाचून केंद्रात मोदींचे अडणार नसले तरी महाराष्ट्रात ते अडणार असल्यानेच वाटेल तशी विधाने केली जात आहेत.

मला आठवते ते असे की 'झी-२४ तास'च्या लोकसभा निवडणूक निकालाचा विशेष कार्यक्रम संपवून मी बाहेर पडलो आणि टॅक्सीत बसलो. मुंबईच्या इस्माईल या टॅक्सी ड्रायव्हरने मला तेव्हा जे सांगितले होते, त्याचा इथे उल्लेख करतो. तो म्हणाला होता, की आम्ही गेली दहा वर्षे तरी शिवसेनेला मत देत आहोत, मग ती महापालिकेची असो की विधानसभा वा लोकसभेची. मी त्याला हे कसे, असा प्रश्न केला, तेव्हा त्याने सांगितलं की, साहेब आमच्या अडीअडचणीला आमचे शिवसेनेचे हे स्थानिक नगरसेवकच धावून येत असतात, ना काँग्रेसवाले आम्हाला विचारतात ना राष्ट्रवादीवाले. अशा स्थितीत आम्ही त्यांना मदत नको का करायला? त्यावेळी बसलेल्या धक्क्यातून सावरायच्या हेतूने मी स्वत: काही निवडक मतदारसंघातल्या मतदानाची टक्केवारी आणि तिथे असलेला मुस्लिम मतदार आणि गेल्या खेपेला त्यांचे झालेले मतदान यांची टक्केवारी यांचा ताळमेळ घालू लागलो. तेव्हा माझी खात्री झाली की या खेपेला (म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या वेळी) शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाला किमान दहा ते पंधरा टक्के मुस्लिमांनी मतदान केले असले पाहिजे. मी हे आकडेवारीने सिद्ध करायला तयार आहे. हे मी काही काँग्रेस नेत्यांना सांगितले तेव्हा त्यांनी हा बदललेला कल मान्य केला. विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यात फरक का पडला त्याचे उत्तर त्यांनीच शोधायला हवे. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनीही हा कल असू शकतो असे सांगितले पण आमच्या वरिष्ठ नेत्यांना हे कोण समजावून देणार असा मलाच उलट प्रश्न केला. अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार जवळपास वीस टक्क्यांच्या घरात मुस्लिम मतदारांनी लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला देशभरात मतदान केले. ते काही चुकून केले असे म्हणता येत नाही. आता जर निवडणुका झाल्या तर मात्र हा बदल त्यांना अनुभवायला मिळेल की नाही हे सांगता येत नाही. सध्या मुस्लिम इत्तेहादुल मुसलमीन (म्हणजेच एमआयएम) या पक्षाला मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेता या दोन पक्षांनी आपण होऊन या समाजाला त्या पक्षाकडे लोटले आहे असे म्हणता येईल. वांद्रे पूर्व मतदारसंघात पार पडलेल्या पोटनिवडणुकीत 'एमआयएम'ला अपेक्षेइतकीही मते पडलेली नाहीत, याचाही अर्थ मी तसाच घेतो. भारतीय जनता पक्ष किंवा शिवसेना या बदलाला डोळसपणे सामोरे जाणार आहे की नाही असा प्रश्न आहे.


अर्थात शिवसेनेवाचून केंद्रात मोदींचे अडणार नसले तरी महाराष्ट्रात ते अडणार असल्यानेच वाटेल तशी विधाने केली जात आहेत.

सध्या मोदी आणि त्यांचे पक्षातले वा सहकारी पक्षातले विरोधक यांनी काय चालवले आहे ते सांगण्यासाठी हे सगळे मी स्पष्ट केले आहे. दिल्लीत संघाची एक फळी मोदींच्या विरोधात काहींना बळ देत असल्याचे ऐकू येते आहे. मोदींनी ज्या संजय जोशी यांना गुजरातचे प्रभारी बनवायला विरोध केला होता त्या जोशी यांचे 'हम तुम्हारे साथ है'सारख्या 'गर्जनां'नी दिल्लीत स्वागत होते आहे आणि दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी गर्दीही जमते आहे. जेव्हा कुणी कुडबुड्या ज्योतिषी आपला भविष्यवाला पोपट पिंजऱ्यातून बाहेर काढून भविष्याची पाने उलगडून निवडायला सांगतो तेव्हा त्याच्या भोवती गर्दी ही होत असतेच, पण इथे तो पोपट साधासुधा नाही आणि ज्योतिषीही कुडबुड्या म्हणता येईल इतका फाटका नाही. जिथे अडवाणींची अवस्था त्या पिंजरेबंद पोपटासारखी केली गेली तिथे संजय जोशींचे काय असा प्रश्न आहे. अडवाणींमागे असणारा संघाचा हात महमद अली जीनांविषयी त्यांनी केलेल्या विधानानंतर मागे घेतला गेला तो पुन्हा पुढे आलाच नाही. संजय जोशी यांच्यामागे असणाऱ्यांचे हात स्पष्ट व्हायचे आहेत, पण उद्या कदाचित संजय जोशी यांचाही वरदहस्त मागे घेतला जाईल आणि कुणीतरी स्वामी वा गुरू आपणच खरे आव्हान देऊ शकतो या पवित्र्यात उभा राहील. कदाचित तेव्हा सत्तेचे खांब कोसळू लागलेले असतील. सध्या दिल्लीत भयकंपित वातावरण असल्याचे दाखले दिले जात आहेत. अनेक मंत्री उद्याला आपल्याला कोणत्या प्रश्नांच्या फैरींना तोंड द्यावे लागेल याची काळजी करताना दिसत असल्याचे मानले जात आहे. एका अर्थाने हे चांगले आहे. कारण विचारणारे कोणीतरी पलीकडे आहे असे म्हटल्यावर फार गडबड करायच्या भानगडीत कोणी पडत नाही, पण एका अर्थाने ते वाईटही आहे. स्वतंत्र निर्णय करण्याची क्षमताच हरवून बसण्याची त्यामुळे शक्यता असते. सध्या तेच चित्र दिसते आहे. कोणताही महत्वाचा निर्णय मंत्रीपातळीवर केला जात नाही. एखाद-दुसरी व्यक्ती त्यास अपवाद असेल, प्रश्न तो नाही, तो त्याहीपेक्षा वेगळा आणि महत्त्वाचा आहे. तो त्यांच्या लटपटणाऱ्या

पायांचा आहे. तो कशामुळे उद्‌भवला ते शोधायची गरज आहे. कोणताही महत्त्वाचा निर्णय आपल्यापर्यंत यावा या हेतूने मोदींनी सर्व सचिवांना आपल्या संपर्कात ठेवलेले आहे. याविषयीचे कोडे पंतप्रधानांचे कार्यालयच निश्चितपणे सोडवू शकते.

महाराष्ट्र सरकारने शोभा डे यांच्याबाबतीत जे केले तेही मला निदर्शनास आणायचे आहे. महत्त्वाच्या वेळी सायंकाळी मराठी चित्रपट मल्टिप्लेक्समध्ये दाखवायचा निर्णय घेण्यात आला, त्यात चुकीचे नाही, तरीही त्यासंदर्भात समजा एखाद्याने विरोधी मत व्यक्त केले असेल तर तो काही दंडार्ह वा फासावर चढवायचा गुन्हा नाही. तो विधानसभेचा हक्कभंग होतो असे मानण्याचे कारण नाही. यापूर्वी अशा पद्धतीने विरोधी मतप्रदर्शन केले गेले आहे याची किमान नोंद संबंधितांनी घेण्याची आवश्यकता आहे. त्यांची मुस्कटदाबी करायची ही कृती योग्य किंवा लोकशाहीला धरून आहे असे म्हणता येत नाही. या पद्धतीने सरकार चालणार असेल तर मग कुणाला सरकारच्या कारभाराबद्दल काहीही मतच व्यक्त करता येणार नाही. या अशा गोष्टीसाठी मनाचा मोठेपणा लागतो आणि तो आधीच्या सरकारांप्रमाणचे हेही सरकार हरवून बसणार असेल तर त्याचे ते कोणत्या दिशेने जाणारे पाऊल असेल ते सांगायला हवेच असे नाही. या प्रवृत्तीमुळेच एकाधिकारशाही निर्माण होत असते हे लक्षात घ्यायची गरज आहे.

इतके सगळे सांगितल्यावर मोदींच्या चांगल्या काही गोष्टींचा उल्लेख करणे अधिक गरजेचे आहे. मोदी सरकारने काही चांगले निर्णय घेतले आहेत आणि ते कितीही चांगले असले तरी ते सरकारला निव्वळ सावरायला उपयुक्त ठरतील असे नाही. मोदी सरकारचे हे निर्णय देशांतर्गत प्रश्नांबद्दल जसे आहेत तसे ते आंतरराष्ट्रीय प्रश्नांबद्दलही आहेत. मोदींच्या सत्तेच्या प्रारंभीच्या काळात महत्त्वाचा प्रश्न होता तो 'इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया'च्या (आयसिस) तावडीतून इराक आणि सीरिया या देशांमधल्या परिचारिकांना सोडवून आणायचा. तो गंभीर बनू शकला असता. मोदींनी ही परिस्थिती अतिशय कौशल्याने हाताळली आणि त्यांची सुटका केली. त्यावेळच्या त्यांच्या धिटाईनंतर त्यांनी परराष्ट्र राजकारणाबाबत योग्य तो पुढाकार घेतला.



मोदींनी अगदी प्रारंभी गंगा नदी शुद्ध करायला प्राधान्य दिले आहे. केवळ गंगाच काय, पण सर्वच नद्या सध्या गटारगंगा बनल्या आहेत. गटारगंगा हा शब्दही कदाचित गंगेची सध्याची अवस्था दाखवायला पुरेसा असण्याची शक्यता आहे. गंगा शुद्ध ही आवश्यकता आहे, ती केवळ पवित्र नदी म्हणून नव्हे तर ती कोट्यवधी जनतेची जीवनदायिनी म्हणून शुद्ध व्हायला हवी. तिच्याकडे बघितले तरी आपल्याला आनंद व्हावा, पण तो कुणाला होताना दिसत नाही. आपल्याकडे नदी म्हणजे सर्व घाण एकत्रितरीत्या ओकण्याची जागा असे मानायची जी पद्धत आहे ती बदलायची गरज आहे. आपल्या महाराष्ट्रात अशा कितीतरी नद्या आहेत, की ज्यांचे पाणी वर्षानुवर्षे ॲसिडमय असूनही त्याकडे सातत्याने दुर्लक्षच झाले आहे. अगदी अलीकडे पंचगंगा नदीतून मेलेले मासे वर आले तेव्हा माध्यमांनी त्याकडे लक्ष वेधले, पण ते व्यर्थ आहे. सांगलीत आमच्या लहानपणी कृष्णा नदीची जी अवस्था तिथल्या सहकारी साखर कारखान्याने करून ठेवलेली होती, तिच्यात आजही बदल झालेला नाही. पन्नास वर्षे जर या नद्या शहरी घाणीने दुथडी भरून वाहणार असतील तर तिच्या काठावर असलेल्या खेड्यापाड्यांनी जगायचे कसे हा प्रश्न कोणालाच का सतावत नाही हे न उकलणारे कोडे आहे. परदेशातल्या नद्या ज्यांनी पाहिल्या आहेत त्यांना आपल्याकडे या नद्या एवढ्या गलिच्छ का असा प्रश्न पडत असतो. गंगेत तर प्रेतेच्या प्रेते वाहून येत असतात. गंगार्पण करण्यात आलेल्या प्रेतांना त्या नदीतून बाहेर काढून त्यांची व्यवस्था लावणे हा एक महत्त्वाचा भाग असतो. या मृतदेहांपैकी अनेक प्रेते कशा अवस्थेत असतात त्याचे वर्णन करता येणे अशक्य आहे. मोदींनी जो दुसरा कार्यक्रम देशाला दिला तो स्वच्छ भारत अभियानाचा. भारत स्वच्छ ठेवण्यात अयोग्य काहीच नाही, तरीही अनेकांना त्याने धक्का बसला. एका पंतप्रधानाने हा असा कार्यक्रम राबवावा का, असा काहींनी प्रश्न केला. पंतप्रधानांनी तो जाहीर केल्याने आपल्यापैकी बऱ्याचजणांना किमानपक्षी आपण रस्तोरस्ती जी घाण करतो आहोत त्याची लाज वाटेल अशी अपेक्षा होती, पण तसे एकही चिन्ह दिसत नाही. सिंगापूरचे एकेकाळचे सर्वेसर्वा ली क्वान यू अलीकडेच गेले. ते एका अर्थाने बेदरकार राज्यकर्ते होते, त्यांनी सिंगापूर अगदी उत्तम ठेवले. तथापि याच सिंगापूरमध्ये असंख्य भारतीय ज्या मॉलला भेट देतात, त्या मुस्तफा सेंटरसमोर मात्र घाणीचे साम्राज्य असते. दुर्दैवाने तीच आपली ओळख बनलेली आहे. तिथे भारतीयच बहुसंख्येने जात असतात. ही ओळख आपल्या प्रतिमेला अंधारयुगात नेणारी आहे. म्हणूनच

स्वच्छ भारत हा एक मंत्रच नव्हे तर तो कायदाही बनवायला हवा, तरच या देशाला काही भवितव्य उरणार आहे.

हे सगळे सांगितल्यावर मला नरेंद्र मोदींच्या परराष्ट्र धोरणाकडे लक्ष वेधायचे आहे. त्यांनी आपल्या शपथविधीच्या समारंभाला दक्षिण आशियाई विकास परिषदेच्या सर्व राष्ट्रप्रमुखांना पाचारण केले आणि अगदी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यापासून अगदी 'सार्क'मध्ये नसलेल्या मॉरिशसच्या अनिरुद्ध जगन्नाथांपर्यंत सर्व राष्ट्रप्रमुख आले हे विशेष. तेव्हापासूनच मोदी हे परराष्ट्र धोरणात आक्रमकता दाखवतील हा होरा होता, तो खरा ठरला आहे. ज्यांच्याकडे परराष्ट्र खाते आहे त्या सुषमा स्वराज यांना प्रसंगी बाजूला सारून ते अनेक देशांचे दौरे करत आहेत आणि त्यावर आपली छापही पाडत आहेत. त्यांनी नेपाळपासून आपला दौरा सुरू करून फ्रान्स, जर्मनी, कॅनडा या देशांच्या दौऱ्यापर्यंत ते आले आहेत. सुरुवातीला त्यांनी ज्या काही देशांना भेटी दिल्या त्यात म्यानमार, जपान, ऑस्ट्रेलिया यांचा समावेश होता. म्यानमारमध्ये त्यांनी भारत-म्यानमार हा राजमार्ग अनेक पदरी बांधून द्यायचे जाहीर केले आणि इंफाळ-मंडाले या दरम्यान बससेवा सुरु करण्याची योजना जाहीर केली. त्यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांना भारतभेटीचे निमंत्रण दिले आणि ते मोदी यांच्या वाढदिवशीच म्हणजे १७ सप्टेंबरला अहमदाबादेत आले. त्या आधी शी यांच्या भेटीच्या कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी पंतप्रधानांचे खास दूत या नात्याने त्यांनी आपले राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांना बीजिंग येथे पाठवले होते. शी यांनी याचवेळी भारतात पायाभूत सुविधांसाठी शंभर अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीची घोषणा केली. शी यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर मोदींनी व्हिएतनामलाही भेट दिली. दक्षिण चीनच्या समुद्रात (साऊथ चायना सी) सध्या चीनने भलतेच प्रस्थ माजवलेले आहे. त्या परिसरावर चीनचा जवळपास कब्जाच आहे. अशावेळी चीनला त्या परिसरात जाऊन आवाज द्यायची आवश्यकता होती, ती मोदींनी पूर्ण केली आहे. मोदींनी आपल्या भेटींच्या कार्यक्रमातून फिजीसारख्या देशालाही सोडले नाही. दोनशे वर्षांपूर्वी फिजीमध्ये काही भारतीय मजूर गेले होते. त्या देशाला इंदिरा गांधींनी १९८१ मध्ये भेट दिली होती, त्यानंतर गेल्या वर्षी भेट देणारे पंतप्रधान हे मोदी होते. अगदी शेजारच्या श्रीलंकेला १९८७ मध्ये राजीव गांधी यांनी पंतप्रधान या नात्याने भेट दिली होती. त्यानंतर श्रीलंकेबरोबरचे संबंध सुधारणेपलीकडे गेले. भारतीय सैन्याचे शांततारक्षक पथक तिथे होते आणि प्रश्न सुटण्यापूर्वीच त्याला तो देश सोडून भारतात परतावे लागले. श्रीलंकाभेटीला तामिळनाडूच्या काही राजकीय पक्षांचा असलेला विरोध डावलून मोदी कोलंबोला गेले. पंतप्रधान या नात्याने जी धोरणात्मक दृढता दाखवायची आवश्यकता असते ती त्यांनी दाखवलेली आहे यात शंका नाही. मी हे केवळ परराष्ट्र धोरणाविषयीच सत्य असल्याचे म्हणतो तेव्हा देशांतर्गत धोरणात कुठेतरी कच खाल्ली जात असल्याचेही त्यातून मला स्पष्ट करायचे आहे. मोदींनी आपल्या भूमीसंपादन विधेयकाविषयी अधिक काळजी घेण्याची गरज होती, पण ती घेतली गेली नाही. काँग्रेस पक्षाच्या कारकिर्दीत जे विधेयक संमत करण्यात आले त्यातल्या नेमक्या त्रुटी आधी सांगितल्या गेल्या असत्या आणि त्यात बदल करण्याची काय आवश्यकता आहे ते स्पष्ट केले गेले असते तर या विधेयकाविषयी आरडाओरडा करण्याची संधी विरोधकांना मिळू शकली नसती. हे विधेयक शेतकरीविरोधी आणि भांडवलदारधार्जिणे असल्याची समजूत भारतीय जनता पक्षाला महागात पडणारी ठरू शकते.

फ्रान्स, जर्मनी

> मुस्कटदाबी करायची ही कृती योग्य किंवा लोकशाहीला धरून आहे असे म्हणता येत नाही. या पद्धतीने सरकार चालणार असेल तर मग कुणाला सरकारच्या कारभाराबद्दल काहीही मतच व्यक्त करता येणार नाही.



पाकिस्तानशी मैत्री होणे न होणे हे त्या देशाच्या भारताकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे, पण त्याहीपेक्षा काश्मीरचा प्रश्न सुटण्याशी त्या संबंधांची गाठ बांधली जाते. तो प्रश्न तर कधीही पाकिस्तानच्या मनासारखा सुटण्याची शक्यता नाही.

आणि कॅनडा या देशांचा अलीकडला दौरा घ्या, किंवा ऑस्ट्रेलियाचा दौरा घ्या, त्यामागे देशाच्या संरक्षणसिद्धतेचा प्रश्न लावून धरायचा भाग नक्कीच होता. जैतापूरच्या अणुभट्टीला जे इंधन लागणार आहे ते आपल्याला ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, कॅनडा या देशांकडून मिळणार आहे आणि फ्रान्सशी आपण रॅफल लढाऊ विमाने मिळवणार आहोत. गेल्या दहा वर्षांत आपल्याकडे म्हणावी तेवढी युद्धसामग्री गोळा केली गेलेली नाही. संरक्षण सामग्री बाहेरच्या देशातून खरेदी करताना त्यात भ्रष्टाचार होतो म्हणून यापूर्वीच्या डॉ. मनमोहनसिंग सरकारमधले संरक्षणमंत्री ए. के. अँटनी यांनी ती खरेदी करण्याचेच थांबवले होते आणि काही सामग्री ही आता कालबाह्य ठरत असल्याचे सांगितले जात होते. रशियन बनावटीची मिग विमाने बेताबेताने बाहेर काढायचा निर्णय घेतल्यानंतर त्यांची जागा घेणारी दुसरी विमाने नसतील तर पंचाईत होण्याची शक्यता गृहीत धरायला हवी होती, पण ती धरली गेली नाही. एकीकडे आपला शेजारी पाकिस्तान आपण भारतापेक्षा संरक्षणसिद्धतेत वरचढ आहोत असा दिमाख दाखवत असताना आपल्या संरक्षण क्षेत्राबाबत शंका निर्माण होणे हे परवडणारे नव्हते. आता यातही विशेष भाग हा, की डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी यांच्यासारखी व्यक्ती रॅफल विमानांना विरोध करण्यासाठी पुढे आली आहे. स्वामी हे पहिल्यापासून भंपक गृहस्थ आहेत. त्यांचा लढाऊ विमानांबाबत विशेष अभ्यास नाही. ते आता या विमानखरेदीच्या विरोधात न्यायालयात आपण दाद मागणार आहोत असे म्हणत आहेत. ते सध्या भारतीय जनता पक्षात आहेत. ते यापूर्वी जनसंघात आणि नंतर जनता पक्षातही होते. त्यांनी त्यांचा एक जनता पक्ष चालवला होता, पण तो निवडणुकीपूर्वी त्यांनी भारतीय जनता पक्षात विलीन केला. स्वामी आणि डोकेदुखी हे समीकरण कायमचेच आहे.

पाकिस्तानशी मैत्री होणे न होणे हे त्या देशाच्या भारताकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे, पण त्याहीपेक्षा काश्मीरचा प्रश्न सुटण्याशी त्या संबंधांची गाठ बांधली जाते. तो प्रश्न तर कधीही पाकिस्तानच्या मनासारखा सुटण्याची शक्यता नाही. अशावेळी बेसावध राहून चालणारे नक्कीच नाही. म्हणूनच मोदींनी या खेपेला प्रथमच भारताची सागरी किनारपट्टी अधिक सक्षम करण्याची गरज ओळखून मालदीव, सेशेल्स, मॉरिशस आणि श्रीलंका या देशांचा दौरा निश्चित केला. त्यापैकी मालदीवचा दौरा त्या देशातली राजकीय परिस्थिती लक्षात घेता तो त्यांनी रद्द केला. तथापि इतर तीन देशांच्या दौऱ्यात त्यांनी भारताला अधिक ताकद मिळवून दिली. मॉरिशस आणि सेशेल्सकडून त्यांनी अनुक्रमे अगालेगा आणि अझम्प्शन या बेटांना भाडेपट्ट्यावर घेऊन तिथे आपली हिंदी महासागर आणि अरबी समुद्र यांच्यात होणाऱ्या हालचालींची टेहळणी करणारी यंत्रणा उभी करण्याचे ठरवले आहे. या अशा केंद्राला गुरगावच्या 'मॅनेजमेंट अॅनॅलिसिस सेंटर'शी जोडण्यात येणार आहे. फ्रान्स, जर्मनी, स्पेन किंवा अमेरिका यांनी हिंदी महासागरात आणि अरबी समुद्रात कितीतरी बेटे आपल्या ताब्यात ठेवलेली आहेत. त्यामुळे त्यांना या कराराविषयी बोलण्याचा अधिकारच नाही. ही बेटे कोणत्याही विस्तारवादी दृष्टिकोनातून नव्हे तर त्या परिसरातल्या देशांनाही साह्य होईल अशा पद्धतीने ही सागरी तटबंदी निर्माण होणार आहे आणि म्हणूनच हे पाऊल अपूर्व आहे.

मी हे लिहिले म्हणजे मोदींची सर्वच पावले अचूक असतील असे नाही, अमेरिकेची त्यांची भेट गाजली आणि बराक ओबामांची भारतभेटही सर्वार्थाने नावाजली गेली. ओबामांनी दौऱ्याच्या अखेरीस दिलेल्या काही कानपिचक्या या थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेतृत्वाला उद्देशून होत्या. हिंदुत्वाचा उन्मादी अवतार जागोजागी पाहायला मिळणे देशाला परवडणारे नाही, पण त्यानंतर थंडावलेला हा भाग पुन्हा एकदा अधिक तीव्रतेने दिसू लागलेला आहे. त्याला आवर घालण्यात जर मोदींना यश आले नाही तर मात्र साहिरच्याच वर उद्धृत केलेल्या काव्याच्या पुढल्या भागात सांगितलेल्या अवस्थेवर आपण गेलो असल्याचे पाहायला मिळेल.

आजकल किसी को वह टोकता नहीं
चाहे कुछ भी कीजिये रोकता नही

आणि असे झाले तर मात्र देशाची सर्वार्थाने कोंडी होणार आहे. एक नक्की आहे, की मोदींनी आपण नवखे आहोत आणि आपल्याला थोडा अवधी द्या असे एकदाही न म्हणता देशाचा गाडा हाकला आहे हे निश्चित. आधी नाकारलेल्या आणि नंतर यशस्वी पार पडलेल्या अमेरिकाभेटीनंतर त्यांच्या जागी अधिक धिटाई आली. त्यांच्या जोमाचे कदाचित हेही रहस्य असू शकेल. ●

**– अरविंद व्यं. गोखले**
९८२२५५३०७६
arvindgokhale@gmail.com



# दी ग्रेट हिंदू सर्कस

**जयदेव डोळे**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक राष्ट्र, एक धर्म, एक ध्वज अशा घोषणा देऊन भारतीय राजकारणात समुदाय, समूह आणि सर्वजन यांचे महत्त्व ठसवत असला तरी त्याला व्यक्ती, व्यक्तिनिष्ठा आणि व्यक्तिवाद संपवता आलेला नाही. एकचालकानुवर्ती संघटनेत एकाचे म्हणजे व्यक्तीचे महत्त्वच अधिक राहते; ती संघटना समूहाची वा समाजाची आग्रही कितीही असली तरी एक विरुद्ध अनेक असे स्वरूप तिला येतेच. अगदी 'विरुद्ध' असे म्हटले नाही तरी एक 'आणि' इतर असा तिचा आकार असतोच. संघाच्या रचनेत ही अशी एक मूलभूत विसंगती आहे. अवघ्या समाजाचे वा समूहाचे भलेबुरे एका व्यक्तीने ठरवायचे आणि त्याला साऱ्या संबंधितांनी होकार द्यायचा! तोही निमूट, हा मोठा विरोधाभास आहे. त्यामुळे एकदा दीनदयाळ उपाध्याय, मग अटलबिहारी वाजपेयी आणि आता नरेन्द्र मोदी अशा एका व्यक्तीच्या कह्यात संघप्रणीत राजकारण (म्हणजे सत्ता) जात राहते व संघ त्या राजकारणात दलदलीत बुडाल्यासारखा बुडून जाऊन अदृश्य होतो. त्यामुळे हे भाजपचे सरकार की मोदी सरकार या वादात संघ पिछाडीला जातो. मग हा अंधार त्याला असह्य होतो आणि तो आपली सामुदायिक ताकद दाखवायचा प्रयत्न करून एक विरुद्ध अनेक असे वातावरण तयार करतो. प्रत्यक्षात तो 'एक' त्याचाच एक हिस्सा असतो हे विसरून! थोडक्यात, संघातील ठार लोकशाहीविरोधी कार्यप्रणाली देशाच्या सत्तेच्या राजकारणातील लोकशाहीशी चार हात करू लागते व त्यात निभाव न लागून हताश, पराभूत ठरते. या व्दिधा मन:स्थितीत सध्या सत्तारूढ पक्ष व त्याचे नेते असून त्या अवस्थेतच त्यांना मे महिन्यात सत्तेचा पहिला वाढदिवस साजरा करावा लागतो आहे.

सर्वप्रथम या नेत्यांना बोचणारी बाब म्हणजे आपण अवघे हिंदुत्ववादी असूनही आपले/आमचे सरकार हिंदुत्ववादी नाही. सत्ता मिळवण्यासाठी सारेजण मनाविरुद्ध भलत्याच गोष्टी बोलून बसले आहेत.

सर्वप्रथम या नेत्यांना बोचणारी बाब म्हणजे आपण अवघे हिंदुत्ववादी असूनही आपले/आमचे सरकार हिंदुत्ववादी नाही. सत्ता मिळवण्यासाठी सारे जण मनाविरुद्ध भलत्याच गोष्टी बोलून बसले आहेत. विकास, अच्छे दिन, महासत्ता, स्वयंपूर्णता, स्वाभिमान, राष्ट्राभिमान आदी बिगर हिंदू मुद्दे त्यांना प्रचारात आणावे लागले. भाजप हा धर्मनिष्ठ राजकारण करणारा पक्ष नाही. याचा अर्थ तो ते करतच नाही असा होत नाही. देशाची धर्मनिरपेक्ष राज्यघटना त्याला राजकारणात व सत्तेसाठी धर्म, जात आदी मुद्दे वापरू देत नाही, इतकाच त्याच्या राजकीय मुद्यांचा अर्थ. आपले मूळचे मन मारून भाजपला सतत संविधानाकडे लक्ष देत सत्ता हाकावी लागते. आपोआपच मग दुटप्पीपणाचा व दुतोंडीपणाचा आधार त्याच्या राजकारणाला लाभतो. त्यामुळे खरोखर सचोटीच्या, निष्ठावंत अन् स्वच्छ चारित्र्याच्या नेत्या-कार्यकर्त्यांना फार त्रास सोसावा लागतो. निराश झालेले त्यांचे मन मग हेलकावे खात राहते. त्यातूनच धर्मांतरितांची घरवापसी, हिंदू-मुस्लिम प्रेमिकांसंदर्भात लव्हजिहाद, हिंदू स्त्रियांनी चार अपत्यांना जन्म देण्याचा आग्रह, सोनिया गांधींचा गोरा रंग, उन्हाने गोरी त्वचा काळी पडण्याचा विनोद, बलात्काराला अर्धवस्त्री स्त्री आमंत्रित करते असे म्हणणे, निर्भयावरील माहितीपट देशविरोधी असल्याचा आरोप करणे, गोवंश बंदी कायदेशीर करणे, गांधी जयंतीची सुटी रद्द करून नंतर तो मुद्रणदोष असल्याची सारवासारव करणे, असे आत्मघातकी प्रकार त्यांनी केले.

आपली जी ओळख आहे तीच आपल्या सरकारचीही व्हावी असा काही मंत्र्यांचा, खासदारांचा प्रयत्न सरकारी निर्णय पिछाडीला टाकून गेला. एकदा तर साक्षात पंतप्रधान पुराणातील वानगी देत म्हणाले की हजारो वर्षांपूर्वी भारतात उच्च दर्जाची शल्यचिकित्सा प्रचलित होती. म्हणून गणपतीला हत्तीचे डोके लाभले किंवा गांधारीच्या गर्भाशयातून शंभर कौरव जन्मले! वर्षभरात भाजप

सरकारने काय केले, कोणते कल्याणकारी निर्णय राबवले, नव्या योजना कोणत्या आणल्या, लोक खूश किती आहेत, यांवर चर्चा अत्यल्प झाली. आचरट, वाह्यात व अशास्त्रीय वावदूक विचारांवर ती अधिक झाली. प्रधानमंत्री जनधन योजना करोडो गरिबांच्या खात्यांत काही रक्कम सोडणारी ठरली. पहिल्या शंभर दिवसांतच ती पूर्ण झाली अशी थोरवी पंतप्रधान स्वत:च गात राहतात. एकटाच माणूस गाणे म्हणणार, इतरांनी साथीलाही गुणगुणायचे नाही असा दंडक असल्यावर करणार काय? संघवाल्यांची खासियत अशी की शक्यतो लहान मुले, अज्ञान तरुण, नासमझ किशोर-किशोरी, सरळ शाळकरी आणि निर्मळ मध्यमवर्गीय यांच्यात त्यांचे 'कार्य' असल्याने त्यांचा बौद्धिक आवाका व आकलन तेवढेच राहते. 'काय वहिनी, आहेत का वसंतराव घरात?' 'काय 'आजी, औषध घेताय ना रोज?' 'अरे निखिल, चिंता नको करूस, होशील पास!' असा त्यांचा रोजचा जनसंपर्क असून मुसलमानांच्या विरोधात खोटीनाटी माहिती देणे, समाजवाद्यांच्या-कम्युनिस्टांच्या विरोधात असत्य काहीतरी सांगणे, आरक्षणाला वाईट ठरवून गुणवत्ता कशी ढासळत चालली याविषयी शोक व्यक्त करणे, मुली कशा नाठाळ होत चालल्या याच्या तक्रारी करणे, काँग्रेसवाल्यांनी देश कसा लुटला याच्या कहाण्या रचणे, गांधीजींचे वागणे फाळणीला पोषक कसे होते याबद्दल अतिशयोक्ती करणे आदी प्रचार ते करत राहतात. आपण काय करतो ते इकडचे तिकडे होता कामा नये अशी ताकीद मिळत असल्याने त्यांना लोकशाहीमधील चार खावेत - चार द्यावेत हे तत्त्वच माहीत होत नाही. चर्चा, वादविवाद, प्रतिवाद, तर्कयुद्ध या गोष्टींना तर संघवाले इतके पारखे की बिचारे सदा काहीतरी अतिरेकी अन् ऐतिहासिक दाखले देत राहतात. त्यामुळे सत्ता हातात आल्यावर प्रतिपक्षाचा आदर राखायचा व आपलेच खरे मानायचे नाही या प्रथा त्यांना अज्ञात राहतात. जे खाजगी कुजबुजीत प्रचारार्थ बोलायचे असते ते संसदेबाहेर अथवा जाहीर सभांत बोलत राहतात. मग फुफाटा उडतो आणि साऱ्यांच्याच नाकाडोळ्यांत धूळ जाते. आपल्या निर्णयापेक्षा वक्तव्यांमुळे मोदी सरकार स्मरणात राहणार असे दिसते. मंत्र्यांना, खासदारांना जितके खुलासे व स्पष्टीकरणे द्यावी लागली तितके ते संसदेतही बोलले नाहीत.

मोदी सरकारमध्ये स्मृती इराणी ही महिला शिक्षण खाते सांभाळते ही गोष्ट सर्वात विनोदी व विचित्र आहे. या बाईच्या स्वत:च्या शिक्षणावरूनच सुरुवातीला अशा बातम्या फुटल्या की त्यांच्याविषयीचा संशय आणखीच घट्ट झाला. संघाला त्यांच्या हातून आपले निर्णय राबवायचे असल्याचे स्पष्ट झाले. दिल्ली विद्यापीठातील चार वर्षांचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करणे, कुलगुरूंना फटकारणे, यूजीसीचे नामांतर, यूजीसीचे अध्यक्ष बदलणे, एनसीइआरटीला नवा प्रमुख देणे, आयआयटीच्या संचालकांची उचलबांगडी करणे, अनिल काकोडकरांना झिडकारणे, सर्वत्र श्रेयांक पद्धती लागू करण्यात दबाव आणणे, संघाच्या शैक्षणिक शाखांना विद्यापीठांत घुसवणे यांमुळे या बाई खरोखर अल्पशिक्षित आणि कारस्थानी आहेत हे पटू लागले. त्या इतक्या उद्धट व बेताल, की शिक्षणासारख्या क्षेत्रात समोरील व्यक्तीदेखील चतुर, विद्वान असू शकते हेच त्या विसरून गेल्या. काँग्रेसच्या नेमणुका म्हणजे भ्रष्ट, नालायक, डाव्या आणि अकार्यक्षम असा समज त्यांनी करवून घेतला. त्यामुळे स्मृती इराणी शिक्षण खात्यांत नेमके गेले वर्षभर काय करत आहेत हे संघ प्रचारकालाही सांगता येणार नाही इतके मोठे रहस्य आहे. अनेक विद्यापीठांत कुलगुरूंची पदे रिकामी होत आहेत किंवा झाली की संघनिष्ठ प्राध्यापक इराणींच्या कार्यालयात खेट्या मारत राहतात. त्या मग ज्येष्ठ, संशोधक, विद्वान, विदूषी लोकांना काहीबाही विचारून म्हणजे 'आपल्याच विचारांचे आहात ना' याची खात्री करवून घेण्यासाठी भेटतात. त्यांनी आजवर किती विद्यापीठांचे पदवीदान समारंभ भूषवले हेही एक मोठे गूढ आहे. कारण काय बोलणार तिथे? आडातच नाही तिथे पोहऱ्यात कुठून येणार? शिक्षण खात्याशी संबंधित महत्त्वाच्या पदांवर आणि संस्थांमध्ये संघीय माणसे बसवायला स्मृती इराणी कशाला पाहिजेत? ते काम अन्य कोणी म्हणण्यापेक्षा संघच करू शकतो की नाही? मग इराणी नेमके काय काम करतात?

मोदी सरकारचे निम्मे वर्ष 'आपण शेतकरी विरोधी नाही' हे सांगण्यात खर्चले. शेतकऱ्यांची जमीन आणि तिच्याची शेतकऱ्यांशी असलेले घट्ट नाते 'कॉमेडी एक्स्प्रेस' या कलर्स मराठी वाहिनीच्या कार्यक्रमात ३ एप्रिलला उलगडले गेले त्याच दिवशी तिकडे बंगळुरात पंतप्रधान मोदी काही तास आधी वाजवीपेक्षा जास्त नाटकीपणा आणून घसाफोड भाषण करत होते. आम्ही शेतकऱ्यांची प्रगती करू वगैरे सांगत होते. पक्षाचा अध्यक्ष एक शाह आणि पंतप्रधान एक मोदी असल्यावर व्यापारी लोकांच्या फायद्याचीच गोष्ट भाजप करणार हे शेतकऱ्याला समजत नाही का? त्यासाठी सोनिया आणि नीतिशकुमार कशाला लागतात? पूर्वी जनसंघाला शेटजीभटजींचा पक्ष म्हणायचे. भाजपने ओबीसींच्या पाठीवर बसून अनेक राज्यांत व केंद्रात सत्ता मिळवली. तरीही व्यापारी व उद्योगपती यांचा कैवार भाजप सोडत नाही. म्हणजेच हा पक्ष त्याचे हितसंबंध व्यवस्थित सांभाळून आहे. व्यापाऱ्यांचा दबाव किती असावा? भाजपचे तीन खासदार चक्क तंबाखूचे कारखानदार असून त्यांनी कर्करोगाचा आणि तंबाखूसेवनाचा काही संबंध नसल्याचे ठाम प्रतिपादन केले आहे. गांधी, शर्मा, गुप्ता अशा आडनावांचे हे नेते सुनीता तोमर नावाची महिला तंबाखूमुळे कर्करोग होऊन मरण पावल्यावरही बोलतात याचा अर्थ त्यांना पक्षापेक्षा व्यापार महत्त्वाचा वाटतो हे स्पष्ट आहे. राजकारण हा त्यांचा जोडधंदा आहे. अशा लोकांचा पक्ष वर्षभरात सामान्य लोकांसाठी काही करील की आपापल्या व्यवसायवृद्धीसाठी?


भूसंपादनाचा कायदा अशा लोकांमुळेच शेतकऱ्यांचा काळ ठरतो आहे. कसदार जमीन कारखान्यांसाठी विकत घेता यावी यासाठी शेतकऱ्यांची संमती आवश्यक नाही असे सांगणारा कायदा हुकूमशाहीची चाहूल सांगतो आहे. भूसंपादन विनासायास व्हावे यासाठी भाजप हा कायदा पटकन् मंजूर व्हावा याचा ज्या पद्धतीने

आग्रह धरतो, तो पाहता हा निवडणूक प्रचाराच्या खर्चाची परतफेड करायचा खटाटोप तर नाही ना, अशी शंका वाटते. आरंभाच्या वर्षातच अदानी समूहाला ऑस्ट्रेलियात स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्षांच्या समक्ष काही हजार कोटी रुपयांचे कर्ज पंतप्रधानांनी मंजूर करवून घेण्याचा प्रकारही खटकला. मोदींनी आवर्जून अंबानींनी विकत घेतलेल्या दवाखान्याच्या उद्घाटनासाठी मुंबईत हजेरी लावण्याचा प्रकारही परतफेडीचा भासला. आता अंबानींच्या हातात माध्यमांची मालकी गेल्याने आणि त्यांना दुखावणे अन्य माध्यमांना परवडणार नाही म्हणून असे संबंध जोडून कोणी पत्रकार दाखवत नाही. तर्क करणे आपल्या हातात असते. पण संघवाले गुप्ततेच्या बाबतीत फार पटाईत. मानले पाहिजे त्यांना. बाकी अंगावर स्वत:चे नाव विणलेला सूट घालण्याचा पंतप्रधानांचा सोस त्यांची सांस्कृतिक ठेवण कशी आहे हे सांगून गेला. आत्यंतिक आत्मप्रीती आणि अतिरेकी आत्मविश्वास यांनी पछाडलेला हा माणूस आहे. तो सारे काही स्वत: करू पाहतो. इतरांनी काहीही केले तरी यांच्या मंजुरीबिगर ते कार्य प्रसिद्धीस पात्र होणार नाही याची काळजी तो घेत असतो. त्यामुळे सबंध वर्षभर आपण भारतीय लोक गुजरातचे नागरिक होऊन गेलो. कसे? मोदी मुख्यमंत्री असताना त्यांची कीर्ती दुमदुमायची. इतर मंत्री जणू खिजगणतीत नव्हते. आताही मोदींचे मंत्री म्हणून फक्त अरुण जेटली आणि व्यंकय्या नायडू बातम्यांत असतात. इतरांना वावच नाही. प्रकाश जावडेकर इतकी वर्षे कॅमेऱ्यासमोर वावरले. परंतु आता मंत्री म्हणून चक्क व्याघ्रपदर्शनासारखे दुर्मिळ झाले आहेत. नितीन गडकरी मात्र मोदींना न जुमानता बातम्यांत राहायचा प्रयत्न यशस्वी करून जात आहेत.

अशी थोरवी पंतप्रधान स्वत:च गात राहतात. एकटाच माणूस गाणे म्हणणार, इतरांनी साथीलाही गुणगुणायचे नाही असा दंडक असल्यावर करणार काय?

एकंदर, मोदींचे मंत्रिमंडळ विरुद्ध भाजपचे सरकार विरुद्ध संघाचा पहिलाच लोकसभेवरील भगवा ध्वज असा त्रिफळा केंद्रातील सत्तेचा उडालेला आहे. आपापसात मात करण्याचे राजकारण काँग्रेस पक्षात फार असे. त्यात पक्षश्रेष्ठींपर्यंत आपलीच पोच असावी एवढा स्वार्थ असे. परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांच्याऐवजी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांचाच बोभाटा जास्त होतो आहे. हे मोदी परवा सिंगापूरच्या माजी हुकूमशहांच्या अंत्यविधीला गेले आणि बिल क्लिंटन आदी वैश्विक राजकारण्यांच्या बाजूला बावळटासारखे बसल्याचे छायाचित्र प्रसिद्ध झाले. बळेबळे 'इंडियन प्राईम मिनिस्टर' म्हणून आपली घुसखोरी जागतिक पुढाऱ्यांत मोदी करत आहेत. त्यांना खरोखर काही कळते का आंतरराष्ट्रीय राजकारणाचे? मूळचा प्रचारक हा माणूस दहा वर्षे मुख्यमंत्री राहिला खरा. पण तो 'स्टेट्समन' म्हणून, मुत्सद्दी म्हणून दिसलाच नाही. मार्क्सवाद वा समाजवाद ही आंतरराष्ट्रीय विचारसरणी असल्याने या विचारांचे नेते आपसूक साऱ्या घडामोडींचा वैश्विक विचार करतात. राजकीय अर्थशास्त्र जागतिक असल्याने त्याच्या चौकटीत निर्णय करतात. मोदी तर संघप्रचारक. त्यांना पाकिस्तानखेरीज दुसरा देश अज्ञात. ते आपले व्यापारी करार, औद्योगिक संबंध वाढवण्याचा प्रयत्नात साजरे होतात. पंतप्रधान म्हणून मोदी खूप हिंडले. पण जगाला आता नवा शांततेचा दूत मिळाला, विकासाचा मार्गदर्शक मिळाला, असे कोण्या देशाने म्हटले का?

गेल्या वर्षभरात अकरा वेळा या सरकारने वटहुकूम वापरून आपला कारभार पुढे नेला. मोदी यांचा नेहमीचा चार हात करण्याचा पवित्रा विरोधी पक्षांना खिजवून जातो आणि मग संसदेत कामकाज होऊ शकत नाही. मोटार वाहन (दुरुस्ती) विधेयक २०१५, खाणी व खनिज (विकास आणि नियमन) दुरुस्ती विधेयक २०१५ आणि कोळसा खाणी (विशेषाधिकार) विधेयक २०१५ या बाबतीत विरोधी पक्षांनी आक्षेप घेतले आहेत. संसदेच्या



स्थायी समितीपुढे एकही विधेयक न येता ते मार्गी लावण्यात आले. लोकसभेतील भाजपचे बहुमत विरुद्ध राज्यसभेतील विरोधकांचे बहुमत असे नवेच राजकारण देश आता अनुभवू लागला आहे. लोकशाही व्यवस्था आणि मोदींचे सुप्रसिद्ध सुशासन याने कसे सुरळीत चालणार?

भाजपची नियत म्हणावी की औकात म्हणावी, त्याला त्याचे मित्र पक्ष सांभाळता येईनासे झाले आहेत. शिवसेना, पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी, अकाली दल यांच्याशी त्याचे खटके उडू लागले आहेत. भूसंपादन कायद्याच्या बाबतीत रामविलास पासवान सांशक होते. 'मेक इन इंडिया' साकार व्हायला या सरकारचा आराखडा काय, अजून काही स्पष्ट नाही. तो आणि भूसंपादन कायदा यांचे काही साटेलोटे आहे काय काही कळत नाही. जागतिकीकरणात गॅट, गॅटस्‌पासून डब्ल्यूटीओपर्यंत जे करार भारताने केले त्यातूनच भारतात निर्यात वाढली. या करारांना वा जागतिकीकरणाला भाजपने कडाडून विरोध कधीही केलेला नव्हता. स्वदेशी जागरण मंच व भारतीय मजदूर संघ या संघीय उपशाखांनी केला होता. तेव्हा 'मेक इन इंडिया'चा पाया स्वदेशी असेल तर परदेशांशी मोदी करार का करत सुटले? विमा क्षेत्रात ४९ टक्क्यांपर्यंत त्यांनी परदेशी गुंतवणूक का मंजूर केली? दूरसंचारच्या चारही मोठ्या कंपन्यांत एकही देशी का नाही? नुसती मालकी भारतीय, बाकीचे सारे परदेशी असे रूप उद्योगांना का येत चालले आहे?

माहितीचा अधिकार वापरून अनेक गोष्टी का व कशासाठी चालल्या आहेत हे कळत तरी असे. मोदी सरकार आता या कायद्याचा गळा दाबायला बसल्याचे दिसून येत आहे. आल्या आल्या या सरकारने हजारो सरकारी दस्तावेज जाळून टाकले. त्यात गांधी खून खटल्याचे काही होते काय अशी विचारणा करणाऱ्यांना वर्षभरापासून उत्तर मिळेनासे झाले आहे. जम्मू-कश्मीरमध्ये स्वतंत्र राज्यघटना आहे. ती एकाएकी स्वीकारार्ह कशी काय झाली भाजपला? ज्याचा कार्यक्रमच 'एक देश में एक निशान- एक संविधान' होता, तो सत्तेसाठी कश्मीरमध्ये कसा काय लवचीक झाला?


लवचिकता हा भाजपचा सर्वात मोठा गुण आहे. राजकीय उलटापालट करण्यात हा पक्ष व त्याची माता रा.स्व. संघ वाकबगार आहेत. गेले वर्षभर एखाद्या सर्कशीतील लवचीक देहाच्या कसरती पाहत आहोत आपण सारे. हे सरकार नव्हे! ही तर ग्रेट हिंदू सर्कस! ●

**– जयदेव डोळे**
९४२२३१६९८८
jaidevdole@yahoo.com

ग्रंथाली

**प्रपंचाचे ज्ञान तेच विज्ञान**

**रविन थत्ते**




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २२५ रुपये**

परंपरेप्रमाणे ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाच्या मंथनातला शेवटचा ग्रंथ अमृतानुभव (किंवा अनुभवामृत). विंदा करंदीकरांच्या अमृतानुभावाच्या अर्वाचीनीकरणाला अनुभवामृत हे नाव आहे. ह्यातल्या ग्रंथपरिहार या शेवटच्या प्रकरणातल्या शेवटच्या काही ओव्यांत 'म्हणून माझे भाषण । मौनाचेही करी मौन । हे पाण्यावरी रेखाटण । मगरीचे ।।' अशी ओवी येते. शब्देविण संवादिजे असे सुचवणारे ज्ञानेश्वर एकंदरच विश्वव्यापार कसा क्षणभंगुर आहे, असेही ह्या अनुभावामृताचा समारोप करताना म्हणत आहेत. प्राणी निवडला आहे मगर. म.सु. पाटील त्यांच्या ज्ञानेश्वरीचा 'काव्यबंध' ह्या पुस्तकात म्हणतात, की मानवजातीच्या संस्कृतीकरणात काही आद्यग्रंथ अशा तऱ्हेने निर्माण होतात की, त्या ग्रंथांवर ती ती संस्कृती आपली भावनिक, आध्यात्मिक आणि व्यावहारिक भूक भागवत राहते. अशा ग्रंथांवर टीका सांगता येतात परंतु ती किंवा तशी रचना परत निर्माण होऊ शकत नाही. भारतीयांच्या संचितातला असा एक ग्रंथ म्हणजे गीता आणि मराठी माणसांसाठी असा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी. ह्या दोन ग्रंथांचा एक तुटपुंजा अभ्यास म्हणजे हे पुस्तक, किंवा म्या मगरीचे लगेचच पुसले जाईल असे रेखाटण.



# मनमोहन ते मोदी...

**सुजय शास्त्री**

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग व आजी पंतप्रधान नरेंद्र मोदी ही परस्परभिन्न, अतिशय टोकाची व्यक्तिमत्त्वे. एक व्यक्तिमत्त्व विद्वान-विचारवंत, द्रष्टे, सुसंस्कृत, प्रामाणिक, सचोटीचे तर दुसरे व्यक्तिमत्त्व पक्का कुटील राजकारणी, हुकूमशाही प्रवृत्तीचे, सत्तालोलुप, अहंकारी, आत्ममग्न असे सातत्याने आरोप होत असलेले. एका व्यक्तिमत्त्वाला प्रशासनाचा सुमारे ४० वर्षांचा अनुभव शिवाय प्रत्यक्ष राजकारणाचा २० वर्षांचा अनुभव तर दुसऱ्याची संघ स्वयंसेवक ते गुजरातचे मुख्यमंत्री व पुढे पंतप्रधान अशी ४० वर्षांची वाटचाल. एकाने २० वर्षांत असा समाज निर्माण केला की ज्या समाजाला स्वतःचे सत्व गवसले, त्याच्यामध्ये महत्त्वाकांक्षा निर्माण झाली, त्याला स्वतःचे आर्थिक कौशल्य गवसले, आत्मसन्मान मिळाला. मोदींना मिळालेला भारत हा डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणातून तयार मिळालेला आहे. या भारताला स्वतःची आयडेंटीटी सापडली आहे, तो महासत्तेचा दावा करतोय, बाजारपेठेची लालूच जगाला दाखवतोय. या देशात एकीकडे मध्यमवर्ग वाढत आहे तर दुसरीकडे प्रचंड सामाजिक विषमताही वाढू लागली आहे. डॉ. मनमोहनसिंग यांच्या धोरणातून निर्माण झालेला प्रचंड मध्यमवर्ग जसा आत्मकेंद्री आहे तसा तो मतलबी, पोकळ राष्ट्रवादाला साद घालणारा आणि धीर नसलेलाही आहे. या वर्गाचे राजकारण करत मोदींना भाजपचे अध्यक्ष म्हणताहेत त्याप्रमाणे पुढील २० वर्षे राजकारण करायचे आहे.

डॉ. मनमोहनसिंग यांच्या धोरणातून निर्माण झालेला प्रचंड मध्यमवर्ग जसा आत्मकेंद्री आहे तसा तो मतलबी, पोकळ राष्ट्रवादाला साद घालणारा आणि धीर नसलेलाही आहे.

बहुतांश राजकीय विचारवंतांनी, पत्रकारांनी व समाज-शास्त्रज्ञांनी, उदारीकरणामुळे बदलेला २० वर्षांचा भारत पाहून मोदींचा २०१४ च्या लोकसभेतील विजय हा देशाच्या राजकारणाला वेगळे वळण देणारा, देशाची राजकीय-सामाजिक-आर्थिक स्तरावर उलथापालथ करणारा, आजच्या २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाच्या भाषेत सांगायचे म्हणजे देशाचे स्वातंत्र्यादरम्यान असलेले सॉफ्टवेअर ६० वर्षांनी पूर्णपणे रिबूट करणारा असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या म्हणण्यात किती तथ्य आहे याची मीमांसा मोदी जोपर्यंत पंतप्रधान राहतील तोपर्यंत व त्यानंतरही केली जाईल. पण एक निचोड असा सांगता येईल की, मोदींचा विजय हा उच्च व नवमध्यमवर्गाच्या इच्छा-अपेक्षांचा, त्यांच्यातील लोभीप्रवृत्तीचाही आहे. या वर्गाच्या पाठिंब्यावर एकट्या भाजपला २८० जागांवर विजय मिळाला असला तरी हा विजय केवळ मोदींच्या प्रेमाखातर नाही तर ती काँग्रेसच्या विटलेल्या कारभाराला दिलेली तीव्र प्रतिक्रिया होती. हिंदू मतांचे धुव्रीकरण होते, कॉर्पोरेट हाउसेस, बड्या कंपन्या, विदेशी कंपन्या, उद्योगपती, बडे बिल्डर यांना अधिक नफ्यासाठी उद्योगाची संधी हवी असल्याने त्यांनी मोदींच्या यशात मोठा हातभार लावला. हे सर्व घटक मोदींच्या मागे राहिले. तसे झाले नसते तर मोदींचा एवढा दणदणीत विजय झाला नसता. महत्त्वाचे म्हणजे मोदींचा हा मतदार तयार झाला डॉ. मनमोहनसिंग यांच्या १९९१ साली अर्थमंत्री ते २००४-१४ या काळातील पंतप्रधानपद अशा एकूण २० वर्षांच्या कालावधीत. (वाजपेयींचे मधले सहा वर्षांचे सरकार. या सरकारने डॉ. मनमोहनसिंग यांचे उदारीकरणाचे धोरण पुढेच नेले.) या २० वर्षात भारत कसा बदलला हे पाहिल्यास समाजाच्या अपेक्षा कशा बदलत गेल्या ते लक्षात येईल.

भारतात औद्योगिक क्रांती घडली नसली तरी उदारीकरणाच्या पहिल्या दशकानंतर त्याचे व्यापक परिणाम देशात दिसू लागले. त्याचे कारण शहरीकरण, नागरीकरणाचा वेग वाढू लागला होता. ९० च्या दशकातील ५.६ टक्के हा आर्थिक विकासाचा दर २००० मध्ये ७.७ टक्क्यांपर्यंत पोचला होता. देशाच्या मध्यमवर्गाची लोकसंख्या एकूण एक अब्ज (२००१ची जनगणना) लोकसंख्येच्या

तुलनेत ३१ टक्क्यांपर्यंत आली होती. देशातील ग्रामीण भागाचे रुपडे बदलले होते. गावांची नगरे झाली होती. नगरांची शहरे झाली होती. शहरांची महाकाय महानगरे होण्यास सुरुवात झाली होती. 'मायबाप सरकार' ही संकल्पना पुरती नामशेष होत चालली होती. आक्टोबर २००३ च्या गोल्डमन सॅक्सच्या ब्रिक्स अहवालात ब्राझील, रशिया आणि चीननंतर जगात भारत एक महासत्ता म्हणून लवकरच उदयास येईल असे भाकित करण्यात आले होते. 'मार्केट' ही संकल्पना देशात मूळ धरू लागली होती. या संकल्पनेत राज्याच्या अधिकारांना दुय्यमत्व देण्यात येऊन खासगी गुंतवणूक, नफा यांना अतिरिक्त महत्त्व प्राप्त झाले होते. देशात एक मोठा ग्राहकवर्ग जन्मास आला होता ज्याच्या जीवनशैलीमध्ये केवळ १० वर्षांच्या उदारीकरण धोरणामुळे आमूलाग्र बदल झाला होता. १९९१ ते २००१ या कालावधीत मारुती कार ब्रँडची मक्तेदारी संपून होंडासारख्या परकीय कार कंपन्या देशात आल्या होत्या. मध्यमवर्गाचे कार घेण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आले होते. मोटारसायकली गावोगावी सायकलींसारख्या विकल्या जात होत्या. वस्तूंची खरेदी डेबिट, क्रेडिट कार्डच्या माध्यमातून केली जाऊ लागली होती. इंटरनेटचे कॅफे गावोगावी, शहरांमध्ये सर्रास दिसू लागले होते. मोबाइल ग्राहक उदारीकरणाच्या पहिल्या टप्प्यात फारसे वाढले नव्हते पण श्रीमंत आणि उच्च मध्यमवर्ग या सेवांचा लाभ घेऊ लागला होता. ब्लॅक अँड व्हाइट टीव्हींचा जमाना जाऊन रंगीत टीव्हीच विक्रीसाठी दिसत होते. झी टीव्ही, सोनी टीव्हीच्या आगमनाने खासगी उपग्रह वाहिन्यांचा एक नवा उद्योग देशात रुजू लागला होता. कनिष्ठ मध्यमवर्ग आता उच्च मध्यमवर्गाकडे वाटचाल करत होता तर आयटी उद्योगाच्या भरारीमुळे एक नवमध्यमवर्ग जन्माला येत होता. हा सामाजिक वर्ग पूर्वीचा बँकेत, सरकारी संस्थेत, विमा कंपन्या, उद्योग, शेतींमध्ये, खासगी कंपन्यांमध्ये काम करणारा होता, त्यांची पुढची पिढी आयटी क्षेत्रात गेल्याने त्यांच्या उत्पन्नात कमालीची वाढ झाली होती. 'खातेपिते घर' अशी मध्यमवर्गातील सधन कुटुंबाची केली जाणारी संभावना आता लोप पावत होती. कष्ट करा, भरपूर शिका, कम्प्युटरचे मिळेल ते कोर्स करा असे मध्यमवर्गातले वातावरण होते. बीए, बीकॉमला पुन्हा चांगले दिवस येऊ लागले होते. डॉक्टर, इंजिनीअर एवढ्याच करिअरच्या मर्यादित वाटा न राहता बँका, विमा कंपन्या, वित्तीय संस्था, विदेशी कंपन्यात रोजगार मिळावा म्हणून एमबीएची लाट आली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये प्रवेश घेणे ही जीवघेणी स्पर्धा झाली होती. आयआयटीची क्रेझ कमी झाली होती. अनेक शिक्षण संस्था उदयास आल्याने शिक्षणाचा वेग वाढू लागला होता. पदवी शिक्षण देणार्या खासगी संस्था, कोचिंग क्लासेस यांचे पेव फुटले होते. गृहबांधणी, इलेक्ट्रॉनिक्स, इंजिनीअरिंग, आरोग्य, वाहतूक, दळणवळण या क्षेत्रांचा विस्तार होऊ लागला होता. स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण झाल्याने अनेक नवे उद्योग जन्माला आले. ७०-८०च्या दशकात मनोरंजनासाठी सरकारी 'दूरदर्शन'च्या ऐवजी दुसरा पर्याय नव्हता. ती मक्तेदारी उपग्रह वाहिन्यांच्या आगमनाने इतिहासजमा झाली.

हा बदलता भारत निश्चितच नव्या आशा, अपेक्षा-आकांक्षा घेऊन आला होता. या नव्या वर्गाकडून राजकीय विचारसरणीशी बांधिलकीची अपेक्षाही करण्यात काहीच अर्थ नव्हता.


उदारीकरण मूलतः भारतामध्ये दडलेल्या सुप्त क्षमतांसाठी सेफ्टी व्हॉल्व्ह होता. ज्ञान, कौशल्य, मेहनत यांची या देशात काहीच कदर होत नाही असा विचार करणाऱ्या हजारो-लाखो तरुणांना, त्यांच्या आई-वडिलांना हा सुखद धक्का होता. करिअर केवळ अमेरिकेत होऊ शकते असा समज असणाऱ्या पांढरपेशा समाजाला ती चपराक होती. त्यामुळे केवळ उदारीकरणाच्या निर्णयामुळे मध्यमवर्गामध्ये स्वतःच्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास वाढला. छोटे-मोठे उद्योजक, कारखानदार, शेतकरी यांच्या कौशल्याला बळ मिळाले. ज्या इंग्रजी भाषेबद्दल पिढ्यान्‌पिढ्या न्यूनगंड होता ती भाषा सहजपणे तळागाळापर्यंत, सामाजिक जीवनात मुरू लागली, आपलीशी होऊ लागली. जातीपातीच्या भिंतींना तडे जाऊ लागले. कम्प्युटर-इंटरनेट तंत्रज्ञानाला या समाजाने आपलंसे केले.

म्हटले तर हा बदल अविश्वसनीय, आश्चर्यकारक होता. जी मुले कम्प्युटर शिकण्यासाठी अमेरिकेत जात होती तीच मुले कम्प्युटरचे आधुनिक तंत्रज्ञान शिकून आयटीमध्ये अमेरिकन-युरोपीय कॉर्पोरेट कंपन्यांच्या बड्या पदांवर आरूढ झाली. देशात कोकाकोला, पेप्सी, आयबीएम, मायक्रोसॉफ्ट अशा जायंट कंपन्या गुंतवणुकीसाठी येऊ लागल्या.

हा बदलता भारत निश्चितच नव्या आशा, अपेक्षा-आकांक्षा घेऊन आला होता. या नव्या वर्गाकडून राजकीय विचारसरणीशी बांधिलकीची अपेक्षाही करण्यात काहीच अर्थ नव्हता. कारण बाजारचलित अर्थव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संधी या नवमध्यमवर्गासाठी महत्त्वाच्या होत्या. हा वर्ग स्वतःच्या पूर्वीच्या जीवनमूल्यांना कवटाळणारा नव्हता. त्याला समृद्धीची, आरामशीर जगण्याची हौस होती. मॉल, मल्टिप्लेक्स थिएटर, ही त्याच्या विकएंड साजरी करायची ठिकाणे होती. शहरालगत मोकळ्या विस्तीर्ण जागेवर अम्युझमेंट पार्क उभी राहत होती. रिसॉर्ट नावाचा एक नवा चंगळवाद निर्माण झाला होता. एसटी बस किंवा ट्रेन नव्हे तर स्वतःच्या कारमधून किंवा भाड्याच्या आलिशान कार मधून फिरणे हे नित्याचे झाले होते. विमानप्रवास हा ऐट मिरवणारा

राहिला नाही. तसेच घरात एसी, मायक्रोवेव्ह, फ्लॅट स्क्रीन टीव्ही, डबल डोअरचा फ्रीज असणे हे श्रीमंतीचे लक्षण राहिले नाही.

भारतीय समाजाची एकंदरीत मानसिकता उदारीकरणामुळे इतकी बदलली, की एकेकाळी या देशाला गौरवशाली इतिहास आहे म्हणून चर्चा केली जात असे त्या चर्चेचा आशय किंवा नूर बदलत जाऊन, या देशाचे भविष्य उज्ज्वल आहे अशी केली जाऊ लागली. एकेकाळी या देशात संधीची कमतरता आहे अशा चर्चा मध्यमवर्गाच्या ड्रॉइंग रूममध्ये केल्या जात होत्या त्या चर्चा बदलत जाऊन या देशात आता अमाप संधी आहेत, परदेशी शिकण्यासाठी जाण्याची काही गरज नाही, अशा स्वरूपाच्या झाल्या. पूर्वीपासून हा देश मंत्रतंत्र चमत्कारांचा, सापांचा देश आहे असे बोलले जात होते, तो देश एक बडी फॅशन इंडस्ट्री आहे असे विदेशी वृत्तपत्रांतून लिहिले जाऊ लागले. भारत हा परंपरागत वस्तूंचा देश आहे असे हिणवले जात होते तो देश जगाला सॉफ्टवेअर पुरवणाऱ्या तंत्रज्ञानाचा देश आहे असे बिरुद लावले जाऊ लागले. फॅशन, लाइफस्टाइल, ऑटोमोबाइल, संगीत, फर्निचर, इंटिरिअर डिझाइन, बॉलीवूड, टेक्नॉलॉजी, सेक्स यांच्या मॅगझिनची बाजारपेठ भरभराटीस आली. अनेक नव्या दमाचे लेखक, विचारवंत वेगवेगळ्या विषयांवर लिहू लागले. बदलत्या भारताचे स्पंदन, त्याचे सामाजिक-आर्थिक-राजकीय अंतरंग हे ताकदीने, अंतर्विरोधासह, हिरिरीने मांडले जाऊ लागले. दळणवळण या बदलांपासून दूर राहू शकत नव्हते. रस्त्यावरच्या बैलगाड्या, सायकली कालबाह्य होत जाऊन मोटारी, बाइक धावताना दिसू लागल्या. देशातील उद्योजकांची फळी, वृत्तपत्रांचे संपादक, गुंतवणूकदार, शेअर बाजारातील सट्टेवाले, बडे व्यापारी, मंत्री-संत्री यांच्या तोंडी 'भारत एक महासत्ता होणार' असे येऊ लागले. लंडन, टोक्यो, न्यू यॉर्क यांच्या शेअर बाजारातील घडामोडी भारतातील मध्यमवर्ग सॅटेलाइट टीव्हीमुळे पाहू लागला. त्याला जगाच्या अर्थकारणात रस वाटू लागला. राजस्थान, ओरिसा, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश या गरीब राज्यांतील वेठबिगार मजूर, भूमीहीन शेतकरी, रोजगारासाठी कोलकाता, मुंबई, चेन्नई, पुणे, कानपूर, विशाखापट्टणम, कोची, बंगळुरू, अहमदाबाद, भोपाळ, इंदूर, जयपूर, हैदराबाद, दिल्ली यांसारख्या महानगरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर करू लागला. जो सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुबळा वर्ग शतकानुशतके दुर्लक्षित गेलेला होता तो नव्या बाजारपेठेचा ग्राहक बनला. ज्या वर्गाबद्दल पूर्वी केवळ ऐकले जायचे तो वर्ग एकाएकी सामाजिक-राजकीय पटलावर स्वतःहून बोलू लागला.



९० च्या दशकानंतर भारतातील मध्यमवर्ग आर्थिक परिस्थितीमुळे व्यामिश्र होऊ लागला. कारण संपत्ती, उत्पन्न, नोकरीधंदा, व्यवसाय, शिक्षण, जात यांच्यामुळे भारतातील मध्यमवर्गाचे विविध स्तर तयार झाले होते. उदाहरणार्थ, असा एक वर्ग निर्माण झाला की, जो महागड्या वस्तूंची, ब्रँडेड वस्तूंची खरेदी फक्त परदेशात, मॉलमधून करणारा होता. एक वर्ग असा होता की, जो दरवर्षी परदेशीवारी करणारा होता, फर्स्ट क्लास एसीतून, राजधानी, शताब्दी एक्स्प्रेसमधून, व्हॉल्वो बसमधून प्रवास करणारा होता. या वर्गाचे स्वतःचे दोन-तीन फ्लॅट होते. यांची गुंतवणूक केवळ सोन्यात नव्हे तर शेअर बाजार, म्युच्युअल फंड, जमीनजुमला यामध्ये मोठ्या प्रमाणात होती. बहुसंख्य मध्यमवर्ग हा डबल इन्कम ग्रुपचा होता. या वर्गाच्या श्रीमंत बनण्याचा अपेक्षा नव्हत्या पण त्यांना अपार कष्टाचे, काटकसरीतले जीवन नको होते. हा वर्ग एकेकाळी मिलमध्ये, कारखान्यात, शेती उद्योगधंद्यात, लघुउद्योगात, सरकारी खात्यात कनिष्ठ स्तरावर शारीरिक मेहनतीची कामे करायचा त्या वर्गामध्ये गरिबीविषयी, शारीरिक कष्टाविषयी एक चीड निर्माण झाली. त्यांना उदारीकरणामुळे निर्माण झालेल्या आर्थिक संधी डोळ्यांपुढे दिसत होत्या. गरीब नसलेला, दोन वेळच्या खाण्याची भ्रांत नसलेला मध्यमवर्गाचा एक स्तर मॉलमध्ये खरेदी करण्यात स्वतःची आर्थिक प्रगती मानत होता, हा वर्ग 'मेड इन चायना' वस्तूंचा मोठा ग्राहक होता, तो नोकरी आणि काम यांच्यामध्ये फरक करायला लागला. तसेच त्याने तंत्रज्ञानालाही सहजपणे आपलेसे केले. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मध्यमवर्गाच्या सुबत्तेमध्ये भर पडली, त्याचा आत्मविश्वास वाढू लागला. मध्यमवर्गाने तंत्रज्ञानाला झपाट्याने आपलेसे केल्याने गरीबवर्गही तंत्रज्ञानाकडे आत्मविश्वासाने वळला. टेलिफोन, मोबाइल, कम्प्युटर,

इंटरनेटचे पसरलेले जाळे हे मध्यमवर्गाच्या अभिव्यक्तीचे नवे माध्यम झाले.

भारतातला नागरीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण होणारा मध्यमवर्ग हा ग्रामीण प्रदेशाशी आपली नाळ तोडू पाहत होता हे स्पष्ट दिसत होते. ७०-८०च्या दशकात ग्रामीण भागातून शहरात आलेल्या पिढीची पुढची पिढी शहरात जन्मास आल्याने मध्यमवर्गाचे विभिन्न स्तर तयार होऊ लागले. ग्रामीण संस्कृती आणि शहरी संस्कृती असे भेद खुद्द मध्यमवर्ग करू लागला. त्याच्या मते रुढी, परंपरेच्या जोखडात अडकल्याने व्यक्तीची प्रगती रोखली जात असते. शहरात परंपरा-संस्कृती नावाचे सामाजिक ओझे डोक्यावर घेऊन जाण्याची सक्ती नसल्याने व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगता येते. शहरात जीवनावश्यक वस्तू मुबलक असल्याने ग्रामीण भागात करावा लागणारा दैनंदिन संघर्ष शहरात तितकासा करण्याची वेळ येत नाही. आपण टॅक्स देतो म्हणजे सरकारवर उपकार करतो अशी मनोवृत्ती तयार होण्यामागे महत्त्वाचे कारण हे, की मध्यमवर्गाच्या जीवनातील मूलभूत प्रश्न सुटू लागले होते. त्याचा वीज-पाणी-निवारा-रोजगार यांवर होणारा दैनंदिन संघर्ष कमी झाला होता. नागरीकरणाच्या रेट्यामुळे बरेचसे प्रश्न सुटत होते त्यामुळे राजकारणाविषयी त्याला फारसे ममत्व राहिले नव्हते. राहिला तो रागच. संसदीय लोकशाहीत असलेले राजकारण किंवा केवळ मतांसाठी असलेले राजकारण हे केवळ गरीबांसाठी आहे अशी पक्की धारणा या वर्गाची होत गेल्याने त्याला मतदानाच्या अधिकाराचेही फारसे महत्त्व वाटत नव्हते. सरकार गरिबांना देत असलेली सबसिडी ही आपल्या पैशांतून देते असा समज पहिल्यांदा विचारवंतांनी आणि नंतर मीडियाने मध्यमवर्गावर खोलवर बिंबवला. हे सुलभीकरण पुढे मीडियाने सिद्धांत असल्यासारखे जनमानसावर

> अफवा या इतिहासालाही साद देत असतात. इतिहासातील बऱ्यावाईट घटनांची वर्तमानाशी तुलना करून प्रतिमेवर हल्ले करण्याचे हे तंत्र असते.

ठसवण्यात यश मिळवले. मीडियाची सूत्रे मध्यमवर्गाकडे गेल्याने या वर्गाच्या प्रश्नांना सातत्याने हायलाइट करण्यात येत होते. १९ व्या शतकात व पुढे २० च्या शतकाच्या सुरुवातीस-मध्यास स्वातंत्र्यचळवळीत भाग घेणारा मध्यमवर्ग हा त्याच्या आर्थिक स्थितीवर ओळखला जात नव्हता तर हा वर्ग साहित्य-वर्तमानपत्रे, नियतकालिके-मासिके वाचणारा, सुधारणावादी-पुरोगामी भूमिका मांडणारा, गरीब-पददलितांच्या अधिकार-हक्कांसाठी रस्त्यावर उतरणारा म्हणून ओळखला जात होता. या वर्गाची सांपत्तिक स्थिती अतिशय वाईट होती पण हा वर्ग शैक्षणिक प्रगतीवर ओळखला जात होता. हे चित्र विसाव्या शतकातल्या अखेरच्या दशकानंतर साफ पुसले गेले. मध्यमवर्ग- नवमध्यमवर्ग- उच्च मध्यमवर्ग- कनिष्ठ मध्यमवर्ग हे उदारीकरणाच्या २० वर्षांच्या टप्प्यात निर्माण होत गेले.

या वर्गाच्या राजकीय अपेक्षा-आकांक्षा सुरुवातीला फारशा आक्रमक नव्हत्या पण जेव्हा नागरीकरणाचे प्रश्न गंभीर होऊ लागले, सरकारी सेवांमधील ढिसाळपणा, भ्रष्टाचार, खाबूगिरी वाढू लागली तसे हा वर्ग आपल्या हक्कांविषयी जागा होऊ लागला. २००९ नंतर दोन वर्षांत जेव्हा कॉमनवेल्थ घोटाळा, टुजी स्पेक्ट्रम घोटाळा आणि त्यानंतरचा कोळसा घोटाळा या प्रकरणातील लाखो कोट्यवधी रुपयांचे आकडे मीडियातून बाहेर येण्यास सुरुवात झाली तेव्हा त्याचा उद्रेक अण्णा हजारे-अरविंद केजरीवाल यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाच्या माध्यमातून दिसून आला. हा उद्रेक नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्रीय राजकारणातील उदयास कारणीभूत ठरला.

अफवांचे एक वेगळे राजकारण असते. या राजकारणाचा मूळ उद्देश समाजात एक प्रकारचा आर्थिक असंतोष



> घरवापसी, लव जिहाद, चर्चवरील हल्ले, वाचाळ भाजप नेत्यांची वादग्रस्त वक्तव्ये, जम्मू-काश्मीरमधील पीडीपीसमवेतचा संघर्ष, मोदींचे परदेशदौरे व संसदेत भूसंपादन विधेयकावरून झालेली मोदींची कोंडी यामध्ये हे सरकार पुरते अडकले आहे.

निर्माण करणे व तो दीर्घकाळ कायम राहील या पद्धतीने व्यवस्थेपेक्षा व्यक्तिविरोधात सातत्याने प्रचार करत राहणे व त्याची प्रतिमा मलीन करणे असा असतो. अफवा या इतिहासालाही साद देत असतात. इतिहासातील बऱ्यावाईट घटनांची वर्तमानाशी तुलना करून प्रतिमेवर हल्ले करण्याचे हे तंत्र असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपने काँग्रेसवर जोरदार प्रहार करण्यास सुरूवात केली. १९९१च्या ज्या आर्थिक संकटांतून डॉ. मनमोहनसिंग यांनी देशाला वर काढले तेच संकट २० वर्षांनंतर देशावर पुन्हा घोंगावत आल्याचा प्रचार भाजपने सुरू केला. भाजपने २० वर्षांची भारताची ग्रोथ स्टोरी हा इतिहास झाला आहे इथपासून, अर्थव्यवस्थेला अर्धांगवायू झाला आहे असेही चित्र उभे केले. अण्णा व केजरीवाल यांच्या दोन-अडीच वर्षांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात मोदी हे अदृश्य असून सक्रीय होते. अण्णा-केजरीवाल यांनी मध्यमवर्गात डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारविरोधात जो संताप-राग उत्पन्न केला त्याचे सर्व श्रेय मोदींनी गुजरातचा विकासपुरुष म्हणून लाटले व स्वतःची मसिहा, सुपरमॅन अशी प्रतिमा निर्माण केली.


आता प्रत्यक्षात मोदींना सत्तेवर येऊन दहा महिने झाले आहेत व त्यांचे सरकार भरीव असे काहीही करू शकले नाही. उलट घरवापसी, लव जिहाद, चर्चवरील हल्ले, वाचाळ भाजप नेत्यांची वादग्रस्त वक्त, जम्मू-काश्मीरमधील पीडीपीसमवेतचा संघर्ष, मोदींचे परदेश दौरे व संसदेत भूसंपादन विधेयकावरून झालेली मोदींची कोंडी यामध्ये हे सरकार पुरते अडकले आहे. ते इतके अडकले आहे की, मोदींच्या तथाकथित कणखर, बेधडक, सचोटी या गुणविशेषांना तडे जाऊ लागले आहेत. मोदींचे रोजचे टीव्हीवर दिसणे, सोशल मीडियातला त्यांचा अहोरात्र वावर यामुळे त्यांच्याविषयी एक प्रकारचे नकारात्मक वातावरण तयार होऊ लागले आहे. इंडिया टुडे या नियतकालिकाने १३ एप्रिल २०१५ च्या आपल्या अंकात 'अ वेकअप कॉल' या कव्हरस्टोरीतून मोदींची लोकप्रियता व त्यांची विकास पुरुष ही प्रतिमा कशी ढासळत आहे याचा एक सर्व्हे प्रसिद्ध केला आहे. या सर्व्हेत मोदी सरकारच्या आर्थिक आघाड्यांपासून सामाजिक प्रश्नांपर्यंत मोदी सरकारने घेतलेल्या निर्णयांबाबत लोकांची मते घेतली आहेत. या एकूण विविध सर्वेक्षणात स्पष्टपणे असे दिसते की मोदींच्या दोन प्रतिमा आहेत. ते बोलतात पण काहीच भरीव करून दाखवू शकलेले नाहीत. त्यांचे धार्मिक प्रश्नांबाबत असलेले मौन, कॉर्पोरेट कंपन्यांपुढे त्यांनी घातलेले लोटांगण, भूसंपादन विधेयकात त्यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या तरतुदी यामुळे लोकांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे.

एकंदरीत मोदींच्या प्रतिमेचे भंजन एवढ्या अल्पावधीत झाले कसे? दिल्लीत मोदींची जादू का चालली नाही? जम्मू-काश्मीरमध्ये पीडीपीबरोबरचा संसार असा आतबट्ट्याचा, संशय निर्माण करणारा का झाला? पाकिस्तानसोबत मोदी बोलणी अजून का सुरू करू शकले नाहीत? काश्मीरमधील दहशतवाद पुन्हा का उफाळून आला? हे प्रश्न आताच उपस्थित होऊ लागले आहेत. त्यांच्या पुढील चार वर्षांतल्या राजकीय वाटचालीत जे काटे येणार आहेत, त्यामध्ये अर्थव्यवस्थेला अधिक सदृढ करून देशातील लाखो बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यापासून संघपरिवाराच्या हिंदूत्वाला आवर घालणे, भारतीय उपखंडात सत्तास्पर्धा होऊ नये म्हणून पाकिस्तान-श्रीलंकेशी नियमितपणे वाटाघाटी करणे.. इत्यादी प्रश्न आहेत. पण त्यातही एक महत्त्वाचा प्रश्न आहे तो ज्या मतदारांनी त्यांच्या पारड्यात भरभरून मते टाकली आहेत त्यांचा. मोदींनी त्यांना दाखवलेली स्वप्ने पूर्ण न झाल्यास हा मतदार त्यांच्या मागे पुन्हा उभा राहील का? डॉ. मनमोहनसिंग यांच्या प्रत्यक्ष पंतप्रधानपदाच्या १० वर्षांच्या कारकीर्दीत देशातील सुमारे ३० कोटी गरीबवर्ग दारिद्र्यरेषेच्या वर आला आहे व हा वर्ग कनिष्ठ मध्यमवर्गाकडे वाटचाल करत आहे. या वर्गाच्या अपेक्षाही या पाच वर्षांत आमूलाग्र बदलतील, तरुणांच्याही बदलतील, शेतकरी-कष्टकरी मजुरांच्याही बदलतील. या सर्वांना कवेत घेणारे राजकारण मोदींना करून दाखवावे लागेल. अजून पाच वर्षांनी देशाचा समाज कसा असेल याचे भाकित करता येणे तसे कठीण आहे, पण गेल्या २० वर्षांत देशातला समाज कसा बदलला आहे हे पाहिल्यास मोदींचा विकासाचा रोडम्याप आव्हानांचा आहे.

●

**– सुजय शास्त्री**
९८१९२१८०४८
sujayshastri@gmail.com
(लेखक दिव्य मराठी या दैनिकात कार्यरत आहेत)
(संदर्भ – डॉ. मनमोहनसिंग : एक वादळी पर्व, ग्रंथाली)

# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने



भिन्नधर्मीय आईवडिलांच्या पोटी जन्म घेतलेल्या एका बुद्धिमान आणि संवेदनशील तरुणाने धर्म आणि संस्कृती यांचा अर्थ शोधण्यासाठी केलेल्या विचक्षण प्रवासाचे, मन हेलावणारे कथन

## इतिहासाचा अनभिज्ञ यात्री

### आतिश तसीर अनुवाद शारदा साठे

किंमत ३०० रुपये




ग्राफिक डिझाइनच्या मूलतत्त्वांची, संकल्पनांची, रचनातंत्राची कलेच्या चौकटीपलीकडे जाऊन दिलेली ही व्यापक ओळख! जाणकारांना ग्राफिक डिझाइनकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देता देता, डिझायनर्सना अधिक आत्मविश्वासाने डिझाइन साकार करण्यासाठी दिशाही देणारी....

## ग्राफिक डिझाइनचं गारुड

### यशोदा भागवत

किंमत ५०० रुपये    आर्टपेपरवर संपूर्ण चार रंगात छपाई




शहर वसण्याआधी, फक्त तू जागी हो, माझ्याच थारोळ्यात रुतलेली मुलगी, झोपू दे मला निवान्त माझ्याच थारोळ्यात, मृत्यू या दीर्घ कवितांचा समावेश असलेला नीरजा यांचा नवीन काव्यसंग्रह.

## मी माझ्या थारोळ्यात

### नीरजा

किंमत १०० रुपये




महानुभाव पंथाचा आद्य ग्रंथ असणाऱ्या 'लीळाचरित्र' या ग्रंथाची सर्वस्पर्शी आणि तलस्पर्शी अशी विस्तृत संशोधनकेंद्री समीक्षा करणारा तसेच महानुभावी साहित्याच्या अभ्यासक-संशोधकांनाच नव्हे तर, वाचकालाही एक मर्मदृष्टी देण्याचे कार्य विवेकनिष्ठ संवेदनशीलतेने करणारा ग्रंथ

## महानुभावीय निवडक वाङ्मय : एक अभ्यास

### डॉ. र. बा. मंचरकर

किंमत २०० रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४०० ००४ ☎ २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com



# 'घुमजाव' सरकार!

सुधाकर जाधव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे एक वर्ष आता पूर्ण होत आहे. भारतासारख्या लोकसंख्येने आणि आकाराने विशाल असलेल्या देशात कोणत्याही सरकारला आपल्या कार्याचा ठसा उमटवायला हा कालावधी तसा अल्पच आहे. देशातील बहुविधता आणि विषम सामाजिक आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली तर सर्वांचे समाधान होईल असा निर्णय घेणे ही सोपी गोष्ट नाही. लोकशाही प्रक्रियेत सरकारच्या मनात आले आणि घेतला निर्णय असेही चालत नाही. संसदेत आणि विरोधीपक्षांसोबत व्यापक विचारविनिमय करून निर्णय घ्यावा लागत असल्याने निर्णयाची गती मंदावते. मोदी सरकारची कसोटी पाहणाऱ्या भूमीअधिग्रहण विधेयकाकडे याचे उदाहरण म्हणून बघता येईल. अशा परिस्थितीत एक वर्षाच्या कामगिरीच्या आधारे एखाद्या सरकाबद्दल निष्कर्ष काढणे अन्यायाचे होईल. सरकारच्या कामाच्या पद्धतीवरून, गतीवरून आणि कमी संख्येत का होईना घेतलेल्या निर्णयाच्या परिणामाचा अंदाज लक्षात घेऊन त्याची वाटचाल सत्तेत येताना आणि सत्तेत येण्यासाठी दिलेल्या आश्वासनपूर्तीच्या दिशेने होते की नाही हे बघण्यासाठी दिशादर्शक म्हणून एक वर्षाचा कालावधी पुरेसा समजता येईल. तसेही नव्या सरकारकडून लोकांच्या अपेक्षा एवढ्या असतात की पहिला महिना पूर्ण होताच सरकारचा पंचनामा सुरू होतो. अल्पावधीत असा पंचनामा सुरू होण्यामागे आपल्याकडे पेव फुटलेल्या वृत्तवाहिन्यांना किंवा वृत्तपत्रांना काही प्रमाणात जबाबदार धरता येईल. पण खरी जबाबदार सत्तेत येताना योजना आणि आश्वासनांची अविचारी खैरात करण्याची राजकीय पक्षांची आणि पक्षनेत्यांची सवय कारणीभूत आहे. आपला पक्ष सत्तेत आला की जादूची कांडी फिरेल आणि सगळे काही आबादीआबाद होईल अशी चुकीची धारणा आर्थिक आणि राजकीय निरक्षर जनमनावर बिंबवण्यात आमच्या नेत्यांचा आणि पक्षांचा हातखंडा राहिला आहे. हीच गोष्ट प्रत्येक सत्तेवर येणाऱ्या नेत्यांसाठी आणि पक्षासाठी अडचणीची ठरत आली आहे. ज्या परिस्थितीत आणि ज्या पद्धतीने नरेंद्र मोदींची प्रतिमा लोकांसमोर उभी करून लोककौल मागण्यात आला त्यामुळे तर मोदी सरकारकडून लोकांच्या अपेक्षा अभूतपूर्व वाढल्या आहेत. लोकअपेक्षेचे प्रचंड ओझे डोक्यावर घेऊन मोदी सरकार सत्तारूढ झाले होते. त्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने एक वर्षात भरीव काही होणे शक्यच नव्हते. त्यामुळे सरकारचे १० महिने पूर्ण होताना आलेल्या १ एप्रिलला पंतप्रधानांनी देशातील जनतेला 'एप्रिलफूल' तर बनवले नाही ना अशी चर्चा होण्याचा अपूर्व प्रकार घडला.

निर्णय आणि त्याच्या परिणामाच्या दृष्टीने एक वर्षाचा कालावधी अत्यल्प आणि अपुरा असला तरी सरकार किंवा सरकारचा नेता जनतेला दिलेल्या आश्वासनाकडे पाठ तर फिरवत नाही ना हे बघण्यासाठी हा कालावधी पुरेसा आहे

निर्णय आणि त्याच्या परिणामाच्या दृष्टीने एक वर्षाचा कालावधी अत्यल्प आणि अपुरा असला तरी सरकार किंवा सरकारचा नेता जनतेला दिलेल्या आश्वासनाकडे पाठ तर फिरवत नाही ना हे बघण्यासाठी हा कालावधी पुरेसा आहे. त्या अनुषंगाने मोदी सरकारच्या पहिल्या वर्षाकडे पाहिले तर हे वर्ष 'घुमजाव'चे वर्ष ठरावे असे मानण्याइतकी सामुग्री मोदी सरकारने माध्यमांना आणि लोकांना पुरवली आहे. निवडणूकप्रचार काळात काळा पैसा, आतंकवादी आणि फुटीरतावादी कारवाया, सीमेवर पाकिस्तान आणि चीन यांचेकडून होणारी आगळीक यावर मोदींनी मोठ्या प्रमाणावर लोकभावना उत्तेजित आणि आंदोलित केल्या होत्या. 'सबका साथ सबका विकास' ही त्यांची निवडणूकप्रचारातील मध्यवर्ती घोषणा होती. पूर्वीच्या सरकारने स्वार्थासाठी धार्मिक भेदभाव करून वातावरण नासवले आपण मात्र सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा विकास करू अशा प्रचाराने नरेंद्र मोदींनी देशातील वातावरण भारून नि बदलून

टाकले होते. आजवर भारतीय जनता पक्षाचा प्रत्येक निवडणुकीत राम मंदिर, काश्मीरला स्वायत्तता प्रदान करणारे घटनेचे ३७० वे कलम आणि समान नागरी कायदा हे अल्पसंख्याकांना डिवचण्यासाठी निवडलेले मुद्दे असायचे. मोदी निवडणूकप्रचारात या मुद्यांना फाटा देऊन ते फक्त विकासावर बोलत राहिले. मात्र शेवटच्या क्षणी मतदान सुरू झाल्यानंतर प्रकाशित जाहीरनाम्यात या मुद्यांचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे या सगळ्या मुद्यांवर मोदी सरकार काय करते इकडे सर्वांचे लक्ष लागणे स्वाभाविक होते. यातील अनेक मुद्यांवर मोदी सरकारने घुमजाव केल्याची टीका या वर्षभरात ऐकायला येऊ लागली आहे.

ज्या मुद्यावर मोदी सरकारने घुमजाव केले असा व्यापक समज निर्माण झाला आहे ते बघता निवडणूकप्रचारात लोकांना भुलवणे, लोकांची दिशाभूल करणे पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या सरकारच्या अंगलट आले असे म्हणता येईल. कारण ज्या मुद्यांवर मोदी आणि त्यांच्या सरकारने घुमजाव केले असा लोकसमज निर्माण झाला आहे किंवा निर्माण करून देण्यात आला आहे त्यातील अनेक मुद्यांवर कोणत्याही सरकारला मोदी सरकार जे करत आहे यापेक्षा वेगळे काही करताच आले नसते. उदाहरणार्थ, काळा पैसा. या संदर्भात ज्या देशात भारतीयांचा काळा पैसा दडला असल्याचा संशय आहे त्या देशाशी पत्रव्यवहार करणे, चर्चा करणे, करारमदार करणे एवढेच भारत सरकारच्या हातात आहे. मनमोहन सरकारने तेच केले आणि मोदी सरकार तेच करत आहे आणि तेच करावे लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मोदी सरकारने काळा पैसा शोधण्यासाठी विशेष पथक निर्माण केले असले तरी हे पथक परकीय भूमीवर काहीही करू शकणार नाही. मात्र निवडणूकप्रचारात परदेशात दडलेल्या काळ्या पैशांचा प्रचंड आकडा जाहीर करणे, ठरावीक कालावधीत तो पैसा भारतात परत आणण्याचे आश्वासन देणे आणि सरकार बनविल्या नंतर मात्र काळा पैसा किती आहे हे माहीतच नाही असे जाहीर करणे या प्रकाराला घुमजावच म्हणावे लागेल.

असाच प्रकार सीमेवर घडणाऱ्या घटनांच्या बाबतीत आहे. मनमोहन सरकार हे कमजोर सरकार असल्याने अशा घटना घडतात, आपण मात्र हे खपवून घेणार नाही असे सांगितल्याने आणि मोदींची खंबीर नेता अशी प्रतिमा उभी करण्यात आल्याने मोदी सत्तेत आल्यानंतर अशा घटना थांबतील असे लोकांना वाटत होते. प्रत्यक्षात मात्र तसे काहीच घडले नाही. उलट मोदी सरकार सत्तेत आल्यावर अशा घटना चालूच राहिल्याने त्याची चर्चा जास्त होऊ लागली आहे. अशा घटनांवर मनमोहन सरकारची जी प्रतिक्रिया असायची तीच मोदी सरकारची राहिली आहे. दोन्ही बाजूंनी अशा आगळिकी घडत असतात आणि अशा आगळिकी थांबवण्यासाठी युद्धासारखे टोकाचे पाऊल उचलणे किंवा त्या देशाशी संबंध तोडणे शहाणपणाचे नसते. मोदी सरकार शहाणपणानेच वागत आहे. पण निवडणुकीतील भाषा आणि सरकारमध्ये आल्यानंतर बदललेली भाषा त्यामुळे मोदी सरकार शत्रूला धडा शिकवण्याऐवजी त्याच्यासाठी पायघड्या घालीत आहे, दिलेला शब्द फिरवत आहे असे सर्वसाधारण जनतेला वाटणे स्वाभाविकच आहे.

काश्मीरच्या बाबतीतही निवडणूकप्रचारातील भाषा आणि सरकारात आल्या नंतरची भाषा आणि कृती परस्परविरोधी आहे. काश्मीरच्या स्वायत्तते संदर्भातील ३७० वे कलम रद्द करणे म्हणजे काश्मीर गमावण्यासारखे आहे. त्यामुळे कोणतेही सरकार ही चूक कधीच करणार नाही. भारतीय जनता पक्षासाठी हे कलम अल्पसंख्याकाविरुद्ध भावना भडकवण्याचे एक साधन मात्र आहे. हे साधन कायम हाती असावे हीच त्या पक्षाची मनोमन इच्छा आहे. त्यामुळे सत्तेत आल्यावर ते कलम रद्द करण्यासाठी मोदी सरकार काही करणे शक्यच नव्हते. राष्ट्रीय जाहीरनाम्यात ३७० वे कलम रद्द करण्याचे आश्वासन आणि जम्मूकाश्मीर निवडणुकीसाठी काढलेल्या जाहीरनाम्यात या कलमाचा उल्लेखच नसणे यामुळे या मुद्यावर घुमजावच्या आरोपाला बळ मिळत असले तरी ३७० व्या कलमाला हात न लावणे देशहिताचेच आहे. कलम ३७० मूळ रूपात लागू करणे ही काश्मीरच्या जनतेची आणि तिथल्या सर्व पक्षांची आणि गटाची मागणी आहे. ही मागणीच फुटीरतावादी असल्याचा प्रचार जनसंघ काळापासून भाजप करत आला आहे. काश्मिरात भाजपचे स्वबळावर सरकार येणे शक्य नाही. भाजपला तिथल्या कोणत्यातरी पक्षासोबत किंवा गटासोबत संयुक्त सरकार बनवण्याशिवाय पर्याय नाही. भाजपच्या व्याख्येप्रमाणे तिथला प्रत्येक पक्ष-गट फुटीरतावादी आहे. त्यामुळे फुटीरतावाद्यांसोबत सरकार बनवून भाजपने आपल्या मूळ भूमिकेला सोडचिठ्ठी देऊन घुमजाव केले असा समज लोकांत निर्माण झाला असेल तर तो चुकीचा म्हणता येणार नाही. प्रत्यक्षात असे घुमजाव करून भाजपने मोदींच्या नेतृत्वाखाली काश्मीरबाबतच्या चुकीच्या भूमिकेत दुरुस्तीच केली आहे.

वर उल्लेख केलेल्या मुद्यांची मोदींचे घुमजाव म्हणून टीका केली जात असली आणि खिल्ली उडवली जात असली तरी मोदी सरकारने जे केले त्यापेक्षा वेगळे काही करणे शक्य नव्हते. पण अन्य काही बाबतीतील घुमजाव मात्र धोरणात्मक आणि खोलवर परिणाम करणारे असल्याने गंभीर आहे. मोदी सरकारचे आर्थिक निर्णय आणि सरकारचे जे आर्थिक धोरण समोर आले आहे ते 'सबका साथ सबका विकास' या निवडणूकप्रचारातील आश्वासनाला हरताळ फासणारे आहे. ज्या दुर्बल घटकांना सरकारच्या आधाराची आणि मदतीची गरज आहे त्यांना मोदी सरकारने वाऱ्यावर सोडले आहे ही भावना निराधार नाही. मोदी सरकारच्या पहिल्या पूर्ण अर्थसंकल्पातून ही गोष्ट स्पष्ट होते. एकीकडे सर्वसामान्य जनतेवरील सरकारी खर्चात मोठ्या प्रमाणावर कपात करण्यात आली आहे तर दुसरीकडे करकपात करून उद्योजकांना आर्थिक लाभ करून देण्यात आला आहे. सर्वसामान्यांच्या शिक्षण, आरोग्य यांच्यायासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खर्चात वाढ करण्याची गरज असताना कपात केली गेली आहे. दलित-आदिवासी सारख्या वंचित घटकांना न्याय देण्यासाठी भरीव तरतुदीची गरज असताना त्यातदेखील कपात करण्यात आली आहे. अर्थसंकल्पाच्या इतिहासात अशी कपात पहिल्यांदाच झाली आहे. दलित-आदिवासी समाजाच्या

विकासासाठीच्या खर्चात गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी तब्बल ३२,१०० कोटी रुपयाची कपात करण्यात आली आहे. सर्वसामन्यांच्या शिक्षण आणि आरोग्यविषयक तरतुदीत गेल्या वर्षीपेक्षा अनुक्रमे १३६९५ कोटी आणि ५९०० कोटींची कपात करण्यात आली आहे. कॉंग्रेस सरकारवर मदरशांना अव्वाच्या सव्वा निधी देऊन भेदभाव करत असल्याचा आरोप करणाऱ्या भाजपच्या सरकारने प्रत्यक्षात मदरशांच्या अनुदानात वाढ केली हे विशेष! स्वच्छता अभियानाचा गवगवा करत असताना आणि त्यासाठी कराचे प्रावधान करूनही पिण्याचे पाणी व स्वच्छतेवर होणाऱ्या खर्चात ९००० कोटींची कपात झाली आहे. ग्रामीण विकासावर होणाऱ्या खर्चात देखील १०५०० कोटीची कपात करण्यात आली आहे. महिला आणि बालविकास कार्यक्रमावरील खर्चात अशीच भरभक्कम कपात करण्यात आली आहे. एकीकडे सेवाकरात आणि अप्रत्यक्ष करात वाढ करून सर्वसामान्यावरील बोजा वाढवला आहे तर दुसरीकडे कॉर्पोरेट करात ५% कपात करून कर देण्याची क्षमता असणाऱ्या धनदांडग्या मंडळीवरील कराचा भार हलका केला आहे. अर्थसंकल्पाच्या अभ्यासकाच्या मते मोदी सरकारच्या अर्थसंकल्पातून उद्योगजगताला तब्बल ५,४०,००० कोटींची सवलत मिळाली आहे. सबका साथ सबका विकास या आश्वासनाकडे मोदी सरकारने पाठ फिरवली हे दर्शवण्यासाठी हे आकडे पुरेसे बोलके आहेत.



मोदी सरकार गरिबांचे सरकार नसून धनदांडग्या उद्योगपतीधार्जिणे सरकार आहे असा समज आणखी दोन गोष्टींनी दृढ होत चालला आहे. पहिली म्हणजे, भूमिअधिग्रहण कायद्यात बदल करण्याची सरकारला झालेली घाई. सत्तेत आल्यानंतर घाईघाईने मोदी सरकारने घेतलेला हा पहिला निर्णय होता. या कायद्यातील काही तरतुदीत शेतकरीहिताच्या दृष्टीने बदल करण्याची आवश्यकता असताना मोदी सरकारने मात्र उद्योगजगत धार्जिणे बदल घडवून आणण्याचा चंग बांधला. त्यासाठी एकदा नाही तर दोनदा वटहुकूम काढण्याचा मार्ग पत्करून उद्योगाचे नव्हे तर उद्योगपतींच्या हिताचे रक्षण करणारे सरकार असा शिक्का आपल्या पाठीवर मारून घेतला. खरे तर भाजप आणि मोदींनी निवडणूक प्रचारकाळात मनमोहन सरकारने पारित केलेल्या भूमिअधिग्रहण कायद्याचे समर्थनच केले नव्हते तर या कायद्यातील शेतकरी हिताच्या तरतुदीचे श्रेय आपल्याकडे घेतले होते. निवडणूक काळात विकासावर मोठमोठी भाषणे देताना विकासासाठी या कायद्यात बदल करण्याची आवश्यकता असल्याचे कधीच म्हंटले नव्हते. निवडणूक निकालाची शाई वाळत नाही तोच या कायद्यात बदल करण्याची घाई मोदी सरकारने केली. निवडणूक काळात शेतकऱ्याशी 'चाय पे चर्चा' करताना आपण सत्तेत आलो तर शेतीमालाला उत्पादनखर्च अधिक ५०% नफा इतका हमीभाव देण्याचे वचन दिले होते. शेतकऱ्याला त्याच्या आजच्या दयनीय परिस्थितीतून बाहेर काढण्याचा हा उत्तम मार्ग असल्याने शेतकरी समुदायाने या घोषणेचे स्वागत करून मोदींना समर्थन दिले. सरकारात आल्यावर मात्र मोदींनी घुमजाव करीत हमीभाव ठरवण्याची परंपरागत पद्धत अवलंबली.

या वर्षातील मोदी सरकारचे सर्वात मोठे घुमजाव तर विकासाच्या मुद्यावर झाले आहे. निवडणूककाळात मोदी आणि त्यांच्या सर्व समर्थकांसाठी विकास हा परवलीचा शब्द बनला होता. विकासाशिवाय दुसरे काहीच बोलले जात नव्हते. सर्व धार्मिक मुद्दे अरबी समुद्रात बुडवून टाकल्यागत निवडणूककाळात बोलले गेले होते. पण सत्तेत आल्याच्या पहिल्या दिवसापासून मोदीसमर्थकांची भारताला हिंदूराष्ट्र बनवण्याची भाषा सुरू झाली. विकासाच्या कार्यक्रमाची चर्चा होण्याऐवजी 'लव्ह जिहाद', 'घर वापसी' हेच कार्यक्रम चर्चेत आले. पंतप्रधान मोदींनी या कार्यक्रमाचे समर्थन केले नाही हे खरे. पण त्यांनी अशा कार्यक्रमांचा चकार शब्दानेही विरोध केला नाही हेही तितकेच खरे. अशा कार्यक्रमांनी अल्पसंख्याक भयभीत होऊनही मोदींनी त्यांच्यात विश्वास निर्माण करण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नाही. त्यामुळे मोदींची याला फूस नसली तरी मूकसंमती असावी असा समज निर्माण झाला आहे. याचा मोदींशी संबंध नाही हे तांत्रिकदृष्ट्या सांगता येईलही. एक मात्र खरे की समर्थकांच्या बेताल आणि बेभान वागण्याने मोदींच्या लोकप्रियतेला आणि विश्वासार्हतेला तडा जाण्यास सुरुवात झाली आहे. मोदींच्या सत्तेतील ३०० दिवसासंबंधी करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा तरी हाच निष्कर्ष आहे. मोदी सरकारच्या चांगल्या कामांऐवजी आणि चांगल्या निर्णयाऐवजी 'घुमजाव'चीच चर्चा होऊ लागल्याने मोदी आणि त्यांच्या सरकार–बद्दलच्या अपेक्षाभंगाचे बीज रुजविणारे वर्ष म्हणून मोदी सरकारच्या पहिल्या वर्षाकडे पाहिले जाईल. ●

**– सुधाकर जाधव**
९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com



# नवी दिल्ली : नवे राजकारण!

**अभिलाष खांडेकर**

नरेंद्र मोदी यांचं सरकार सत्तारुढ होऊन वर्ष झाले आहे. काम न करणारे, क्वचितच बोलणारे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग पायउतार होऊन, आता अत्यंत घाईत असलेले, खूप बोलणारे नरेंद्र मोदी त्यांच्या जागी आरुढ आहेत. अनेक कामे, सतत दौरे आणि शासनप्रणालीचा आगळेवेगळेपणा दाखवण्यात ते प्रचंड गुंतलेले वगैरे दिसतात. सतत टीव्हीवर दिसणे ही तर त्यांची खासियत!

मोदी आणि भाजपच्या ऐतिहासिक अशा २०१४ च्या लोकसभा विजयानंतर लोकांच्या अपेक्षा खूपच उंचावल्या होत्या. तसे होणे साहजिकच होते. भाजपचा उंचच उंच उडालेला फुगा दिसेनासा होईल की काय अशी अवस्था असताना तो 'भगवा फुगा', हवा हळू हळू कमी होत गेल्याने दृष्टिआड होण्याऐवजी वेगाने खाली खाली येताना सध्यातरी दिसत आहे. याचे अन्वयार्थ काय आहेत?

खरे तर मराठी माणूस दिल्लीतील राजकारणाकडे खूप असा ओढला जात नाही. परंतु बऱ्याच वर्षांनंतर मोठमोठाली खाती मराठी नेत्यांच्या हाती यावेळेला आली आहेत.

नवी दिल्ली ही राष्ट्रीय राजधानी; तिचा डौलच न्यारा. त्यात गुजराती राष्ट्रप्रेमी मंडळींनी (मोदी, शाह) आणलेले नवे राजकारण, नवे खेळाडू, नवीन पायंडे यामुळे २००४ ते २०१४ पर्यंतच्या दहा वर्षांच्या राजकारणाचा चेहरामोहराच पार बदलून टाकला. हे बदललेले चित्र महाराष्ट्रातून अर्थात मुंबई-पुणे-नागपूर किंवा बीड-यवतमाळ-नगरहून आणि झालेच तर पार टोकाच्या कोकणातून कसे दिसते, जर दिसत असेल तर?

खरे तर मराठी माणूस दिल्लीतील राजकारणाकडे खूपसा ओढला जात नाही. परंतु बऱ्याच वर्षांनंतर मोठमोठाली खाती मराठी नेत्यांच्या हाती यावेळेला आली आहेत. नितीन गडकरी, सुरेश प्रभू, मनोहर परीकर , श्रीपाद नाईक व प्रकाश जावडेकर. लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजनपण (साठे) मूळच्या महाराष्ट्रातल्याच. गोपीनाथराव बिचारे अकाली गेले. या मराठी टक्क्याच्या वाढीमुळे पण कदाचित महाराष्ट्रात दिल्लीबद्दल वेगळे, नवे असे कौतुक असू शकेल असे मी गृहीत धरतो.

तसे बघितले तर चिंतामणराव देशमुख वा यशवंतराव चव्हाणांपासून वसंत साठे, शंकरराव चव्हाण, शरद पवार, शिवराज पाटील, सुशीलकुमार शिंदे, प्रमोद महाजन, (अंतुले, पटेल, देवरा) वगैरे अनेक मराठी नेते दिल्ली दरबारात वेळोवेळी मोठ्या खुर्च्यांवर होते म्हणा, परंतु तो काळ वेगळा होता. दिल्लीतील सरकार म्हणजे काँग्रेस सरकार असे समीकरणच होते अनेक वर्षे. ते जणू एक सवयीचे चित्र होते, परंतु तेच आता पूर्णपणे बदललेले आहे.

बदल अनेक वेळा चांगले असतात असे मानले जाते. मोदींच्या धडाकेबाज आगमनामुळे खीळ बसलेला देशाचा विकास वेगाने पुढे जाईल, महागाई कमी होईल, सुशासन येईल, उद्योगधंदे वाढीला लागतील व देशाचे संपूर्ण चित्र पार बदलून जाईल असे देशवासीयांना वाटायला लागले. परंतु वस्तुस्थिती अशी आहे, की भाजपला सोडून कुणालाच चांगला असा फरक जाणवत नाहीये.

एका वर्षात नवे, चकचकीत चित्र थोडे अंधूक व अस्पष्ट वाटायला लागलेय. मोठे उद्योगपती नाराज आहेत. महत्त्वाचे निर्णय फक्त पंतप्रधान कार्यालयच घेत आहे. मातब्बर मंत्री कळसूत्री बाहुल्यांसारखे वागवले जात आहेत व एकूणच दिल्लीतील राजकीय वातावरण प्रचंड संशयाचे झाले आहे. उद्योगजगतात बऱ्याच अंशी निराशा व घबराटीचे वातावरण दिसत आहे.

मोदी स्वत: खूप काम करतात, अधिकाऱ्यांना कामाला लावतात असे दिल्लीत बोलले जात आहे. परंतु मोठे सनदी अधिकारी, पत्रकार, तसेच ज्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बळावर, लालकृष्ण अडवाणी व इतर बड्या नेत्यांना बाजूला सारून सत्तेत आलेले मोदी खूप लवकर सर्वांच्या टीकेचा केंद्रबिंदू झालेले आहेत. त्यांच्या

अरेरावीचे किस्से दिल्लीत अनेक लोक रंगवून सांगताना भेटतील, काही खरे, तर काही ऐकीव स्वरूपाचे. पण किस्से भरपूर. मनमोहनसिंग यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडीला बदनामी मिळाली ती दहा वर्षांच्या अखेरीस, परंतु मोदी पहिल्याच वर्षात आलोचनेच्या केंद्रस्थानी आहेत.

मोदींचे सरकार जरी पाच वर्षांसाठी निवडून आले असले तरी जे पाय पाळण्यात दिसले आहेत त्यावरून पुढे काय होईल याचा अंदाज येणे मुळीच कठीण नाही. तरीही मी आशावादी आहे, कारण सुरुवातीच्या वर्षांनंतरची वर्षे कदाचित चांगले परिणाम दाखवू शकतील.

> विरोधी पक्ष अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असतानासुद्धा सरकारच्या आडमुठ्या धोरणांमुळे मोदींना अनेक वेळा तोंडघशी पडावे लागले

हरियाणा, झारखंड व महाराष्ट्र जिंकल्याने भाजपची घोडदौड जोरात होती, जोमात होती. परंतु दिल्लीत सपाटून मार खाल्ल्याने तसेच आयुष्यभर मुसलमानांना शिव्या घालणाऱ्या पक्षाने जेव्हा मुफ्ती मोहम्मद सईद यांच्याबरोबर मिळून काश्मिरमध्ये सरकार बनवले तेव्हा मात्र भाजपचा 'वेगळेपणा' खरेच किती वेगळा आहे ते जगासमोर आले व मोदींचे हसू झाले. दिल्लीतील पराजय फक्त मोदी-शहा प्रभृतींमुळे झाला, हे स्पष्टच झालय! अनेक नेते हे खासगी बोलतात. शहा एक वेगळेच प्रस्थ आहे. ते भाजपच्या मागील कुठल्याही अध्यक्षांपेक्षा खूप वेगळे आहेत. अरेरावी तर आहे पण कार्यपद्धतीपण सगळ्यांना सांभाळून घेण्याची नाही. सीबीआय कोर्टाने त्यांना सोहराबुद्दीन हत्येच्या कारस्थानाच्या आरोपातून अचानक मुक्त केल्याने ते अजून ताकदवर झाले आहेत, परंतु भाजपची ज्येष्ठ मंडळी त्यांना वचकूनच असतात. दिल्ली निवडणुकांमध्ये भाजप तोंघडशी पडल्यानंतर बदल घडेल असे वाटत होते, परंतु तसे झालेले दिसत मात्र नाही!

परंतु हा झाला निवडणुकीचा हाल. विरोधी पक्ष अत्यंत हलाखीच्या परिस्थतीत असतानासुद्धा सरकारच्या आडमुठ्या धोरणांमुळे मोदींना अनेक वेळा तोंडघशी पडावे लागले असे म्हणता येईल. मोदींचे सल्लागार कोण आहेत, ते कसे सल्ले देतात, त्यांना देशातील मुद्दे, आंतरराष्ट्रीय पेच वगैरे इतक्या लवकर समजायला लागलेत काय, असे प्रश्न वारंवार आता चहूकडून विचारले जात आहेत. जर सल्लागार चांगले असते तर कदाचित चहा विकणाऱ्या एकेकाळच्या लहान मुलाने व संघाच्या मुशीत तयार झालेल्या नरेंद्र मोदींनी 'दहा लाखांचा' स्वत:चे नाव लिहून घेतलेला सूट, साध्या परंतु उच्च विचारसरणी आणि साधी राहणी असलेल्या बराक ओबामांसमोर कदाचित घातला नसता. घातला तर घातला नंतर त्याचा लिलाव करून जगाला दाखवण्यासाठी भलतीच कल्पना कोणी त्यांना दिली, न कळे!

ज्या सोशल मीडियाला हाताशी धरून मोठे कॅम्पेन मोदींनी निवडणूक लढवण्यासाठी तयार केले होते, तोच सोशल मीडिया मोदींची प्रचंड टिंगल उडवताना दिसतोय सध्या. आता म्हणे अमित शहा यांनी सोशल मीडियाच्या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांना दिशानिर्देश दिलेत. संजय जोशी यांच्या वाढदिवसावरूनसुद्धा भाजपमधील अनेक नेते कसे मोदीविरोधी आहेत हे चव्हाट्यावर आले.

दिल्लीत सध्या हा विनोद सारखा सांगितला जातो, की मोदी भारताच्या दौऱ्यावर सध्या आलेले आहेत. काही पत्रकार त्यांच्या परदेश-वाऱ्यांना एका 'इव्हेंट मॅनेजर'चा दौरा असेही संबोधतात!



आम आदमी पार्टीचा भव्य विजय, केजरीवाल यांचे हुकूमशाही एकूण वागणे, विवादास्पद शासन पद्धती, 'आप'ची भांडणे, राहुल गांधी अचानक गायब होणे, काँग्रेसच्या लाथाळ्या असे सगळे भाजपला हवे तसे सुरू

असतानासुद्धा दिल्लीतील राजकारणात एककल्लीपणा जाणवतोय. गृहमंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज, थोड्याफार प्रमाणात आपले गडकरी असे अनेकजण रागावलेले, दुखावलेले आहेत. त्यांना त्यांच्या अखत्यारीतील अधिकारपण मुक्त स्वरूपाने वापरण्यास संपूर्ण मुभा नाही. अरुण जेटलींचे बजेट भाषण पंतप्रधान कार्यालयाने अनेक सुधारणा केल्यावरच, स्वत: जेटली लोकसभेत वाचू शकले, असे सांगणारे दिल्लीत अनेक लोक आहेत. हे सगळे असताना अजित डोभाल व अन्य अधिकारी पत्रकारांना चार हात लांब ठेवण्याचे सल्ले मंत्र्यांना व सनदी अधिकाऱ्यांना देत असतात. माहितीचा अधिकार देण्यासाठी स्थापलेला आयोग अध्यक्षाविना काम करत आहे गेले दहा महिने.



जमिनीबद्दलचा कायदा हा एकमात्र कायदा आहे ज्याने अख्ख्या विपक्षाला एकत्र आणले व झोपलेल्या-पेंगलेल्या काँग्रेसला खडबडून जागे केले. यात सरकारचे मोठे अपयश समोर आलेय. काय करावे व काय करू नये हे सरकारला सूचत नाही. एकिकडे बळीराजा नाराज आणि दुसरीकडे उद्योगपती! कामे कोणाचीच होताना दिसत नाहीत. अण्णा हजारे जेव्हा दोनच दिवसांसाठी दिल्लीत आले होते तेव्हा तर सरकार खूपच घाबरलेले होते.

मोदी आणि शहा या जोडीने गेल्या सहा-आठ महिन्यांत अनेक भाजप नेत्यांना खूप दुखावले आहे. दिल्लीचा पराजय हे त्याचे एक मोठे कारण होते. बंगलोरच्या भाजप कार्यकारिणीमध्ये अडवाणींना बोलू न देणे हेसुद्धा खंद्या भाजपवाल्यांना नाराज करून गेले. अडवाणी व त्यांच्या कंपूचा संपूर्ण नायनाट करण्याचे काँग्रेस पक्षासारख राजकारण भाजपमध्येपण सुरू असणे वेदनादायी आहे. मोदींच्या जवळ असलेल्या स्मृती इराणी असोत किंवा पूर्व सेनाध्यक्ष असोत किंवा गिरीराज सिंग असोत सगळ्यांनी मिळून सरकारला तोंड लपवायला जागा ठेवली नाही.

वर्षभरात खूप काही चांगले दिवस (अच्छे दिन) आले नसले, काळा पैसा देशात परतला नसला, दिल्ली व देशभरात बलात्कारांवर आळा बसला नसेल, नव्या नोकऱ्या व संधी मिळत नसल्या तरी एक गोष्ट खरी आहे, की मोदी एकापाठोपाठ एक झटके खात-खात थोडे राजकीय दृष्ट्या नरम पडलेले दिसतात. त्यांचा लोकसभेतला आविर्भाव उसना आहे की खरा हे पुढचे वर्ष सांगेल, परंतु अरेरावी जशी अहमदाबादमध्ये चालायची तशीच ती दिल्लीतसुद्धा खपवून घेतली जाईल हा त्यांचा चुकीचा समज आता दूर झाला असावा असा एक ताजा अंदाज आहे. लालू-मुलायमकडे लग्नाला जाणे; काँग्रेसशी बातचीत, गडकरींना भू-संपादन विषयामध्ये दिलेले अधिकार, हिंदुस्थान टाइम्सला दिलेली पंतप्रधान झाल्यानंतरची पहिली मुलाखत हे बदल स्पष्ट करतात.

भ्रष्टाचाराच्या क्षेत्रात मोदींनी नक्कीच विजय मिळवला आहे. मोठा घोटाळा जगासमोर अजून तरी आला नाही. कोळसा खाणीचा लिलाव खूपच पारदर्शी पद्धतीने केला. परंतु उद्योगघराणी त्याने खूप लाभान्वित झाली असे म्हणता येणार नाही. पहिल्या वर्षात तरी या कारणास्तव कुणा मंत्र्याची विकेट गेलेली नाही, परंतु भाजप राज्यांमध्ये असे चित्र दिसत नाही. नवे राजकारण म्हणजे नव्या-कोऱ्या पाटीवरचे लिखाण. ते सुवाच्च असावे, अर्थपूर्ण असाव तसेच जे लिहलेय ते कृतीत दिसावे अशी अपेक्षा कुणीही करेल. तसे अजून तरी होताना दिसत नाही. कदाचित २०१५ च्या शेवटपर्यंत चित्र पालटेल; जर भाजप बिहारमध्ये भगवा फडकावू शकला तर.

मोदी म्हणतात तसे, अनेक वर्षांची साफसफाई करायला वेळ लागेल तसे असेल तर त्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पूर्ण व्हायला व परिणाम दिसायला भारतवासीयांना एक-दोन वर्षेतरी वाट पहावी लागेल. तोपर्यंत स्वच्छता अभियान, टॉयलेट्स, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, मोदींच्या नरजेतून घडणारे विश्वदर्शन हे सगळे आहेच की आपल्यासारख्या सामान्यजनांसाठी!

●

**अभिलाष खांडेकर**

(लेखक दैनिक भास्कर समूहाचे राजकीय संपादक आहेत.)

०७८३८४२६०६६

abhilash@dbcorp.in



# ‘टोलमुक्त’ देशाचे स्वप्न! – गडकरी

**विकास झाडे**

मोदींच्या मंत्रिमंडळात अनेक दिग्गज मंत्री आहे. दिग्गज असले तरी त्यांना त्यांच्या मर्जीनुसार काम करू दिले जाते का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. अनेक मंत्र्यांच्या फाईल्स थेट पंतप्रधानांच्या घरीच जातात अशी चर्चा आहे. मंत्र्यांची कुरबूर असते परंतु सांगायचे कोणाला? सरकार आणि पक्ष दोन्ही मोदी–शहांच्या हाती आहे. त्यामुळे ज्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली त्यातच समाधान मानायचे आहे आणि जेवढे पदरात पडेल तेवढे काम मुकाट्याने करायचे आहे. तरी सुद्धा मोदींच्या मंत्रिमंडळावर दृष्टिक्षेप टाकला तर महाराष्ट्राचे वजन आहे असे दिसून येईल. तरुण मराठी चेहऱ्यांना महत्त्वाचे खाते मिळाले आहे. सुरेश प्रभू यांना रेल्वे, मनोहर पर्रीकर यांच्याकडे सुरक्षा, पियुष गोयल कोळसा व ऊर्जा, प्रकाश जावडेकर यांना पर्यावरण व वने, अनंत गीते अवजड उद्योग, कोळसा भ्रष्टाचार बाहेर काढणारे हंसराज अहिर यांच्याकडे रसायन विभाग या महत्त्वाच्या खात्याशिवाय मोदींच्या तोडीचे नेते असलेले नितीन गडकरी यांच्याकडे दळणवळण हे महत्त्वाचे खाते आहे. गडकरी हे दिल्लीत अत्यंत प्रभावीपणे काम करत आहे. त्यांचे काम नजरेत भरण्यासारखे आहे. नितीन गडकरी हे रोखठोक बोलणारे आहेत. त्यामुळे कोण दुखावतील आणि कोण सुखावतील या परिणामाचा ते विचार करत नाहीत, देशाचा विकास व्हावा ही त्यामागची तळमळ असते. त्यांच्या डोक्यात सातत्याने भन्नाट आयडिया येतात. त्या जनहिताच्या आणि सर्वांना आश्चर्याचा धक्का देणाऱ्या ठरतात. ते म्हणाले, मी जे बोलतो ते करतो. जे शक्य होणार नाही ते स्पष्टपणे सांगायला मागे कचरत नाही. विशेष म्हणजे मी माझ्या विभागात भ्रष्टाचाराला १०० टक्के फाटा दिला आहे. ही माझी मोठी उपलब्धी आहे. गंगा अविरत प्रवाही, निर्मल व्हावी हा माझा प्रयत्न आहे त्यासोबतच देशातील भ्रष्टाचारही संपुष्टात आल्याचे चित्र दिसेल. दिल्लीत त्यांनी स्वत:ची स्पेस निर्माण केली आहे. त्यांच्याच शब्दात....!

> नितीन गडकरी हे रोखठोक बोलणारे आहेत. त्यामुळे कोण दुखावतील आणि कोण सुखावतील या परिणामाचा ते विचार करत नाहीत.

टोल नाक्यांवर खासगी वाहनांची कोंडी होत असते. दररोज ये–जा करताना खासगी व सरकारी वाहनधारक जाम वैतागलेले असतात. अनेक ठिकाणी राजकारण होते आणि आंदोलनही होत असतात. या वाहनांच्या टोलच्या माध्यमातून वर्षाकाठी केवळ दीड हजार कोटी महसुल जमा होतो. ही टोलवसुली अन्य मार्गातून व्हावी आणि लोकांचे रुसवेफुगवे दूर व्हावेत. खासगी व शासकीय वाहन चालकांना कायमचे टोलमुक्त करावे यासाठी या विभागाचे मंत्री नितीन गडकरी यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांनी काही मार्गांना टोलमुक्त केले आहे, परंतु ते एवढ्यावरच समाधानी नाहीत; टोलच्या माध्यमातून मिळणारा महसूल कोणत्या मार्गाने भरून काढता येईल यासाठी ते मार्ग शोधत आहेत. त्यांना या वर्षात यासाठी मार्ग सापडू शकतो.

आपण महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना ‘पुलकरी’ म्हणून लौकिकास आलात. आता देशासाठी कोणते स्वप्न बाळगून आहात?

गडकरी – देशाच्या विकासामध्ये रस्त्यांची भूमिका फार महत्त्वाची आहे. रस्त्यांमधून प्रगती आणि विकास होतो. आज राष्ट्रीय महामार्गांची जबाबदारी माझ्याकडे आहे. अनेक रस्त्यांची कामे गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडली होती. वन, पर्यावरण आणि भूमी अधिग्रहणाचे अडथळे निर्माण झाले होते. काही ठिकाणी रेल्वे ओव्हरब्रिजचे प्रश्न होते. ते सगळे संपवून ७५ ते ८० टक्के प्रकल्प, जवळपास १ लाख ८० हजार कोटी रुपयांचे बंद पडलेले प्रकल्प सुरू केले आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात दररोज १ कि.मी. रस्ताबांधणी होत होती. येत्या दोन वर्षांत मला प्रत्येक दिवशी ३० कि.मी. रस्ता बांधायचा आहे, सध्या दररोज १२ किमी. रस्ताबांधणीचे काम सुरू आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधण्यात येत असल्याने पुढचे ५० वर्षे कोणतेही मेंटेनन्स लागणार नाही. आम्हाला रस्तेबांधणीसाठी १२० रुपये प्रती बॅग सिमेंट

मिळाले आहे. हा अभूतपूर्व दर आहे. त्यामुळे खर्चात मोठी बचत होत आहे. याचा लाभ राज्य सरकार, महापालिका आणि अन्य शासकीय संस्थाना घेता येणार आहे. निर्मितीचा खर्च कमी करताना दर्जा उत्तम कसा असेल याचे नियोजन करण्यास आम्ही प्राथमिकता दिली आहे. आयर्न स्लॅक हे पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याचे मोठे पहाड देशात पडले आहे त्यामुळे ते मोफत उपलब्ध होईल आणि नव्याने दहा हजार खाणी तयार कराव्या लागणार नाहीत. यामुळे पर्यावरणही अबाधित राहणार आहे. महामार्गांच्या कडेला प्रवाशांसाठी दोन हजार सेंटर उघडण्यासाठीच्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांना स्वच्छतागृहे, हॉटेल आणि मार्केट उपलब्ध करून देत आहोत. ट्रकवाल्यांसाठीही वेगळ्या प्रकारची व्यवस्था आम्ही करत आहोत. शिवाय महामार्गांच्या मध्यातील उपलब्ध जागेत ऑप्टिक फायबर केबल, इलेक्ट्रिक कार स्पेशल पाइपलाईन आणि गॅस पाइपलाईन टाकता आली तर त्यापासूनही महसूल मिळू शकतो काय हे पडताळून पाहत आहोत. लोकांना जास्तीत जास्त सेवा देणे आणि त्यांचा त्रास कमी होण्यासाठी माझे प्रयत्न आहेत.

गेल्या दहा महिन्यांत रस्तेनिर्मिती आणि जहाजबांधणी विाागाच्या अनेक घोषणा तुमच्याकडून झाल्यात. यात महत्वाच्या योजना कोणत्या आहेत?

गडकरी – याआधी अडकलेले सर्व प्रकल्प आम्ही मार्गी लावले. शिवाय ४० हजार कोटींच्या नव्या प्रकल्पाला सुरुवात केली आहे. येणाऱ्या काळात आमचे लक्ष्य पूर्ण करणार आहोत. सध्या रस्तेबांधणीची एक किलोमीटरची गती १२ कि.मी.वर आणण्यात आली आहे ती वाढवून ३० कि.मी.वर घेऊन जाऊ. क्रिसेलने जो अहवाल तयार केला त्यात रस्तेबांधणीला वेग आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मी ज्या घोषणा केल्या आहेत त्या निश्चित लिहून ठेवाव्यात आणि त्यातील मी एकही बाब करू शकलो नाही तर त्यासाठी मला जबाबदार धरा.

तुम्ही इ-रिक्षा आणला. परंतु त्यात तुमचे हित असल्याचे आरोप झालेत. इ-रिक्षाबाबतची तुमची संकल्पना काय आहे. हा देशार चालावा अशी काही योजना आहे काय?

गडकरी – या देशात एक कोटीपेक्षा अधिक लोक सायकलरिक्षाद्वारे माणसे माणसांना ओढतात. मला त्यात अमानुषता वाटते. इ-रिक्षामुळे आता ते सोपे झाले आहे. मी कोणासही सांगत असतो की या उद्योगात पडा. त्याचा थेट अर्थ माझ्या हितसंबंधाशी जोडला जात असेल तर ते सिद्ध करावे. बेजबादार आणि खोटे आरोप हे अस्वस्थतेपोटी होतात. इ-रिक्षानिर्मितीच्या क्षेत्रात माझा कोणताही नातेवाईक किंवा जवळची व्यक्ती नाही. दिल्लीत इ-रिक्षा सर्वाधिक आहेत. त्यामुळे येथे निर्मिती करणाऱ्या उद्योजकांची संख्या वाढली आहे. इ-रिक्षाचा कायदा हा देशासाठी झाला असला तरी कोणत्या राज्याने इ-रिक्षा चालवायचे त्याचे स्वातंत्र्य त्या राज्यांना आहे. इ-रिक्षांना आता मोटर व्हेईकल ॲक्टनुसार अधिकृत नंबरही दिला जाणार आहे. यासाठी चालकांना दहा दिवसांचे प्रशिक्षण देऊन वाहन चालक परवाना देण्यात येणार आहे. माणसाने माणसाला ओढण्यापेक्षा एनर्जीद्वारा माणसाला ओढण्याचे साधन अत्यल्प खर्चात उपलब्ध होत असेल तर अशी क्रांती घडवण्यासाठी मी अग्रेसर राहणार आहे. सामान वाहतुकीसाठी इ-कार्ट तयार होत आहे. रोजगारासाठी हा पर्यायही उत्तम ठरू शकतो. रिक्षा ओढताना मानवाधिकाराचा प्रश्न निर्माण होतो. परंतु लोक त्याकडे दुर्लक्ष करतात.

तुम्ही सातत्याने उद्योगावर भर देता. देशातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून नवे-नवे प्रयोग करता. उद्योगाची पार्श्वभूमी नसताना उद्योगांमध्ये पडण्याचे धाडस तुमच्यात कसे झाले?

गडकरी – उद्यमशीलता आणि उपक्रमशीलता या दोन भिन्न बाबी आहेत. देशातील गरिबी, उपासमारी आणि बेकारी दूर करायची असेल तर कल्पक (इनोव्हेटिव) पर्याय उपलब्ध करावे लागणार आहेत. त्यामुळे मी नवीन प्रयोग करत असतो. लोकांनाही प्रोत्साहित करत असतो. देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. ऑरगॅनिक फार्मिंग, बायोडिझेल, बायो एनर्जी, हॅन्डीक्राफ्ट अशा कितीतरी क्षेत्रात मी काम करतो. राजकीय नेत्यांनीही केवळ सत्तेच राजकारण करू नये. सेवा, विकास आणि शिक्षणाचे राजकारण करावे. सर्वांना रोजगार मिळवून द्यावा. गावांमध्ये नवे तंत्रज्ञान, इनोव्हेशन आणून गावातील लोकांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे त्यांची गरिबी निश्चितच दूर होऊ शकते. राजकारण हे सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे प्रभावी उपकरण आहे या भावनेतून काम करायला पाहिजे अशी माझी यामागील भूमिका आहे.

तुम्ही इ-टोलसाठी पावले उचलली आहेत? देशातील नागरिकांसाठी 'फ्री' टोल असावा असेही तुमचे प्रयत्न असल्याचे कळते. हा नवा प्रयोग काय आहे? हे शक्य आहे काय?

गडकरी – आयएम कोलकाता आणि ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांनीही जो रिपोर्ट दिला त्यानुसार दरवर्षी ८८ हजार कोटी रुपयांचे नुकसान केवळ टोलनाक्यांवर वाहने थांबल्यामुळे होते. यातून मार्ग निघावा म्हणून आतापर्यंत ११० इ-टोल सुरू करण्यात आले आहे. तर वर्षाअखेरपर्यंत ३५० इ-टोल सुरू होतील. त्यामुळे स्वाभाविकपणे रहदारीत अडथळे निर्माण होणार नाहीत. वेळ वाचणार आहे. देशातील टोलच्या बाबत लोकांची नाराजी आहे. आपल्याला चांगले रस्ते करायचे असल्यास त्यासाठी पैसाही लागणार आहे. परंतु लोकांना टोलमधून कायमस्वरूपी सवलत द्यावी यासाठी कोणता मार्ग काढता येईल का, यावर विचारविनिमय सुरू असून तो प्राथमिक स्तरावर आहे. २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात ११ हजार ४०० कोटी रुपये टोल मिळाला. त्यात ९ हजार ८०० कोटी हा व्यावसायिक वाहनांकडून होता तर केवळ १६०० कोटी रुपये खासगी वाहनांकडून प्राप्त झाला. खासगी वाहनांद्वारे अत्यल्प टोल मिळतो हे खरे आहे आणि रोषही त्यांचाच अधिक असतो. त्यामुळे अलिकडच्या काळात त्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाऊ शकतो. त्यासाठी ही तूट अन्य मार्गातून कशी

भरून काढता येऊ शकेल त्याबाबतही विचार करत आहोत. २०१९पर्यंत व्यायसायिक वाहनांच्या टोलच्या माध्यमातून १ लाख ७२ हजार ८८२ कोटी रुपये टोल प्राप्त करण्याचे लक्ष्य आहे. रस्ते उारणीसाठी याची मोठी मदत होईल.

बांधा आणि वापरा (बीओटी) तत्त्वावरच्या प्रयोगाने तुम्हाला महाराष्ट्राने ओळख दिली. केंद्रातही तुम्ही यावरच भर देत आहात?

गडकरी – पब्लिक प्रायव्हेट इन्व्हेस्टमेंट (पीपीपी) मॉडेल ही बाब आनंदाने नाही तर कोणताही पर्याय नसल्याने पुढे आली आहे. आज आपल्या देशातील खेड्यात जायला रस्ते नाहीत. तिथे पीपीपी मॉडेल नाही. त्यामुळे मोठ्या शहरातील रस्ते खासगी गुंतवणुकीतून करायचे तर सरकारचे रस्तेबांधणीचे संपूर्ण बजेट ग्रामीण, आदिवासी भागाकरिता व गरिबांसाठी खर्च करायचा ही खरी त्यामागची भूमिका आहे. त्यामुळे देशातील खेडी महानगरांसोबत जोडली जाणार आहेत.

तुमची भूमिका ही कंत्राटदाराच्या बाजूने असते अशीही ओरड होते. गोसेखुर्दचेच घ्या. कंत्राटदारांना मिळावे म्हणून तुम्ही केंद्राला पत्रही लिहिले होते. दैनंदिन व्यस्ततेत आणि तुमची विकासाची भूमिका असतानाही अशा गोष्टींचा स्वत:च त्रास ओढवून घेता असे तुम्हाला वाटत नाही का?

गडकरी – मुळामध्ये या सगळ्या चुकीच्या गोष्टी आहेत. मी कुठल्याही कंत्राटदाराचे समर्थन केले नाही आणि कोणी माहिति न घेता बेजबाबदारपणे बोलत असेल तर त्यात कोणतेही तथ्य नाही. गोसेखुर्दचा प्रकल्प पाण्याखाली यावा ही माझी भूमिका आहे. विदर्भातील शेतकरी आत्महत्या करत आहेत. गोसीखुर्दचा प्रकल्प पूर्ण झाला तर साडेतीन लाख एकर जमीन पाण्याखाली येणार आहे. विदर्भाचा विकास होणार आहे. मी तेथील लोकप्रतिनिधी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही माझी भूमिका आहे. पाटबंधारे प्रकल्प पूर्ण व्हावा ही माझी आग्रही मागणी आहे. कंत्राटदाराला काम मिळावे किंवा त्यांचे पैसे मिळावे अशी भूमिका कधीही राहिली नाही आणि या बाबी कोणीही सिद्ध करू शकले नाहीत.





तुम्ही बोलता त्यापेक्षा अधिक काम करता असे खासगीत विश्वासाने सांगत असता. परंतु मोदी सरकारमध्ये हे तुम्हाला शक्य होईल असे वाटते का?

गडकरी – मी आजपर्यंत जेवढे बोललो तेवढे किंबहुना त्यापेक्षा ३० ते ४० टक्के अधिक करून दाखवले आहे. माझ्या घोषणा लोकांनी निश्चितपणे लिहून ठेवाव्यात. त्यातील मी एकही करू शकलो नाही तर मी जनतेची माफी मागेन. मी ज्या घोषणा केल्या किंवा करतो त्या अभ्यासपूर्ण असतात. त्यामागे नियोजन, निश्चिततेची हमी आणि इच्छाशक्ती असल्याने हे प्रकल्प कुठेही अडण्याचे कारण नाही.

गेल्या दहा महिन्यांमध्ये ज्या गोष्टी तुमच्याकडून व्हायला पाहिजे होत्या त्यात किती टक्के यश मिळाले?

गडकरी – रखडला या शब्दाशी माझा संबंध नसतो. माझे काम कधीच रखडत नाही. मात्र, जी रखडलेली आणि फसलेली कामे होती ती संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारची होती. ती सुद्धा मी बाहेर काढण्याचे काम केले आहे. दहा महिन्यांत मी १०० टक्के कामांना न्याय दिला आहे.

सांसद ग्रामयोजनेतून मतदार संघातील पाच गावांचा विकास करावा असा पंतप्रधानांचा फतवा आहे. मात्र, यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध नसल्याने खासदारांची कुजबूज सुरू आहे. तुम्ही याकडे कसे बघता?

गडकरी – मुळामध्ये गावांच्या विकासासाठी सरकारच्या ६३ योजना आहेत. त्या सर्व योजनांमधून आपल्याला गावांचा विकास करता येणे शक्य आहे. आणि सरकारने याला प्राथमिकता दिलेली आहे. याशिवाय जर निधी लागला तर तो केंद्र किंवा राज्य सरकारच्या अन्य योजनांमधून घेतला जाऊ शकतो. खासदार निधीतीलही काही टक्का याकडे वळवण्यावर विचार सुरू आहे. सांसद ग्रामयोजनेत पैसा ही अडचण नाही. काम करण्याची इच्छाशक्ती हवी आहे. विकासाची दृष्टी आणि समाजाबद्दलची संवेदनशीलता, गरीब माणसांचा कळवळा हे आवश्यक आहे.

या वर्षातील तुमचा ॲक्शन प्लॅन काय आहे?

गडकरी – 'इनलॅंड वॉटरवे'ला मी प्राधान्य देणार आहे. चीनमध्ये ४४ टक्के वाहतूक पाण्यावर आहे. आपल्या देशात केवळ ३.३ टक्के आहे. हा टक्का वाढवून ८ ते १० टक्क्यांपर्यंत नव्या वर्षात नेण्याचा माझा प्रयत्न आहे. हे अत्यंत कठीण काम आहे. यात यश मिळावे यासाठी माझ्या हालचाली सुरू आहेत. गंगेतून वाराणसी ते हल्दीयापर्यंत आणि तिकडे उत्तरपूर्वमध्ये पाण्यावरची प्रवासी आणि मालवाहतुक सुरू व्हावी असे अनेक ठिकाणी मी प्रयत्न सुरू केलेले

आहे. येणाऱ्या काळातील हे काम मोठे आव्हानात्मक आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद नाकारण्यामागची तुमची भूमिका काय होती?

गडकरी – मी एक तर दिल्लीच्या राजकारणात आलो होतो. दिल्लीत आल्यानंतर मी गंगेचे काम, राष्ट्रीय महामार्गाचे काम अशी अत्यंत मोठे प्रकल्प हाती घेतले आहेत. दिल्लीत येण्यामध्ये माझ्या मनात दुमत होते. जायचे की नाही जायचे! एकदा दिल्लीत आल्यावर पुन्हा महाराष्ट्रात जायचे नाही असा मी निर्णय घेतला. मी दिल्लीतूनही महाराष्ट्राचा विकास करण्यास कटिबद्ध आहे.



गेल्या दहा महिन्यांत भ्रष्टाचाराला आळा बसला आहे असे वाटते का?

गडकरी – शंभर टक्के बसला आहे. १९८८ चा मोटर अधिनियम ॲक्ट आणत आहोत. या सगळ्यातून खूप मोठे परिवर्तन होणार आहे. देश भ्रष्टाचारमुक्त होईल. अनेक ठिकाणचा भ्रष्टाचार संपेल. आता आम्ही ऑन लाईन परमिट केले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी परिवहन कार्यालयात जाण्याची गरज नाही. अशा अनेक सुधारणा होताहेत की त्याचा फायदा जनतेला झाल्याशिवाय राहणार नाही. माझ्या विभागात भ्रष्टाचार झाला असे एकही वाक्य दहा महिन्यांमध्ये कुठे लिहून आलेले नाही.

तुमचे भविष्यातील स्वप्न काय आहे?

गडकरी – अविरत आणि निर्मल गंगा करण्याचे काम हाती घेतले आहे. ते मला पूर्ण करायचे आहे. राष्ट्रीय महामार्गाचे दररोज ३० कि.मी. निर्मितीचे लक्ष्य आहे. देशात अनेक ठिकाणी इनलँड वॉटर वे निर्माण करायचे आहेत. महाराष्ट्रातील काही नद्यांवर वाहतुक सुरू करण्याचा मी निर्णय घेतला असून त्याच्या कामास सुरुवात झाली आहे. ●

**विकास झाडे**

९७११११८५९८

zade.vikas@gmail.com

**ग्रंथाली**

# चिकित्सा आरोग्यसेवांची – डॉ. शाम अष्टेकर




वैद्यकीय क्षेत्रात प्रचंड तांत्रिक प्रगती बरोबरच खर्च आणि इन्शुरन्स वगैरे व्यवस्थाही वाढत चालली आहे. मात्र सरकारतर्फे सर्वांना सर्व सेवा संपूर्णपणे मोफत देणे हे अर्ध्या उडीत दरी ओलांडण्यासारखे कठीण आहे, मधे पडून कपाळमोक्ष होण्याचीच त्यात जास्त शक्यता आहे. हे प्रचंड खर्चिक दुस्साहस सुरू केलेच तर कोणत्याही सरकारला ते धड चालवणे किंवा बंद करणे शक्य नाही. यापेक्षा सामाजिक सहभागी आरोग्य योजना प्रांतोप्रांतीचे खाचखळगे काळजीपूर्वक ओळखून क्रमश: विकसित करता येतील. तथापि गरजूंसाठी आताच्या उपलब्ध मोफत सेवा कार्यक्षम करणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे.

सध्याच्या परिस्थितीत गुंतागुंतीच्या आरोग्य–वैद्यकीय क्षेत्राचे दहा मुख्य विभाग कल्पून महाराष्ट्रातील नवीन सरकार काय काय करू शकेल याचा आराखडा मी या पुस्तकात मांडला आहे.

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**



# शेतकऱ्यांसाठी 'बुरे दिन'

**श्रीकृष्ण उमरीकर**

२०१४ साली झालेली लोकसभेची निवडणूक एक 'गेम चेंजर ठरणार' याची लक्षणे आधीपासूनच दिसत होती; आणि झालेही तसेच. १९८४ नंतर पहिल्यांदाच एका पक्षाला पुर्ण बहुमत मिळाले. त्या पक्षाने निवडणुकांच्या आधीच आपला पंतप्रधान कोण हे जाहीर केले होते आणि त्याप्रमाणे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले.

मोदींची गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून जी कारकीर्द होती ती सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरली होती. कुणी त्यांना खलनायक ठरवून टीका करत होते तर कुणी नायक म्हणून त्यांची पूजा करत होते. निःष्पक्षपणे मोदींच्या कामाचे मूल्यमापन करण्यात माध्यमे कमी पडली असेच नमूद करावे लागते. कारण टोकाचा मोदीद्वेष आणि आंधळे मोदीप्रेम या दोन टोकाच्या भूमिकांतून बाहेर येऊन कुणी त्यांच्या कामाची नोंद घ्यायला तयारच नव्हते.

पण माध्यमांनी जरी नोंद घेतली नाही तरी बातमी कर्णोपकर्णी पसरत होतीच. गुजरातेत उद्योगांमध्ये काम करणारे अनेक कामगार बिहार-उत्तर प्रदेशातून आलेले होते त्यांनी आपापल्या गावात गुजरातेतल्या प्रगतीची बातमी नेली. गुजरतेत माल नेण्या-आणण्यासाठी गेलेल्या ट्रकचालकांनी त्यांना आलेले सुखद अनुभव ढाब्या-ढाब्यावर पसरवले. तसेच गुजरातेत कृषीक्षेत्रात जी अतुलनीय प्रगती झाली होती तिची बातमी सुध्दा देशाभरातल्या शेतकऱ्यांपर्यंत पोचली. आणि मोठ्या आशेने, युपीए १ आणि २ च्या निष्क्रिय-भ्रष्ट कारभाराला कंटाळलेल्या जनतेने भाजपच्या नव्हे मोदींच्या पारड्यात भरभरून मते टाकली आणि एका पक्षाच्या हाती सत्ता देण्याचे काम तीन दशकांनंतर करून दाखवले.

कंटाळलेल्या जनतेने भाजपच्या नव्हे मोदींच्या पारड्यात भरभरून मते टाकली आणि एका पक्षाच्या हाती सत्ता देण्याचे काम तीन दशकांनंतर करून दाखवले.

मोदींच्या काळात गुजरातेत कृषीक्षेत्रात असे झाले तरी काय याचा आढावा घेणे सयुक्तिक ठरेल. शेतीसाठी सिंचन हा मुद्दा समोर येताच, गुजरातचा विचार करता आपल्या डोळ्यांपुढे सरदार सरोवराच्या भिंतीची उंची, मेधा पाटकर-बाबा आमटेंचा लढा, विस्थापित, वीजनिर्मिती, राज्यांचा वाटा असे अनेक मुद्दे पुढे येतात आणि मूळ मुद्याला बगल दिली जाते. मूळ मुद्दा असा की गुजरातेतल्या सिंचनाच्या एकूण क्षमतेच्या ८२% सिंचन विंधन विहिरींच्या माध्यमातून होते. सरदार सरोवराचे पाणी केवळ १ लाख हेक्टरला सिंचित करत आहे (पाच वर्षांपूर्वीच्या आकडेवारीनुसार). गुजरातमधली ७०% जमीन कोरडवाहू आहे. कोरडवाहू जमिनीत शेती करण्यासाठी सिंचन किंवा उत्तम पाऊस हवा असतो. गुजरातेत पडणारा पाउस तसा कमिच आहे. मग नेमके झाले तरी काय, ज्यामुळे सिंचन क्षमता वाढली?

२००४ मध्ये गुजरातमधील जवळपास निम्म्या (२२५ पैकी ११२) तहसिलमध्ये जमिनीतल्या पाण्याची पातळी धोक्याच्या खाली गेलेली होती. त्यानंतर पाचच वर्षांत म्हणजे २००९ मध्ये त्यापैकी ६० तहसिलांमध्ये ती सामान्य झाली होती. यामागे कारणीभूत होती सरकारची चेक डॅम बनवण्याची योजना. २००० ते २०१० ह्या काळात गुजरातेत एक लाखापेक्षा जास्त चेक डॅम बनवण्यात आले ज्यांचा खर्च केवळ १४०० कोटी रुपये होता. या तुलनेत महाराष्ट्रात सिंचनखात्याने लावलेले दिवे पाहता मोठे प्रकल्प न करता सूक्ष्म सिंचनावर भर दिल्यास काय परिणाम होऊ शकतो हे स्पष्ट दिसते. पण त्यापूर्वी २००० पर्यंत केवळ १०००० चेक डॅम्स बांधण्यात आले होते. त्या तुलनेत मोदींच्या कार्यकालात सिंचनक्षमतेमध्ये झालेली वाढ हनुमानउडीसारखीच होती असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मोदींच्या काळात गुजरातेत झालेला दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे विजेचा नियमित पुरवठा. 'ग्रामज्योती' योजनेच्या माध्यमातून राज्यातल्या प्रत्येक घरात २४ तास अखंड वीजपुरवठा केला गेला.

तसेच शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या वीजपंपांना दिवसातून आठ तास खात्रीचा वीजपुरवठा केला गेला. त्यामुळे पिकांना पाणी द्यायची नियमित सोय झाली. तसेच हा पुरवठा योग्य दाबाने तसेच योग्य फ्रिक्वेन्सीने होत असल्यामुळे मोटारी वारंवार जळण्याचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे शेतकऱ्यांचे तसेच पिकांचे नुकसान लक्षणीयरीत्या कमी झाले.

वाढलेली भूजलपातळी आणि खात्रीचा वीजपुरवठा यांमुळे शेतकऱ्यांनी सिंचनाखालचे क्षेत्र वाढवले. त्यासाठी सरकारने ठिबकसिंचनाचा प्रभावी वापर करून सिंचनाखालचे क्षेत्र कित्येक पटींनी वाढेल असे धोरण आखले. गुजरतेत ठिबकसाठी ५०% अनुदन मिळते. शेतकरी केवळ ५% रक्कम उभी करतो, त्याला ४५% रकमेसाठी सहकर्ज उपलब्ध करून दिले जाते. यामुळे शेतकऱ्यांनी फळबागा, कापूस, आणि इतर पिकांच्या उत्पादनात भरघोस वाढ नोंदवली. केवळ कापसाचाच विचार करता देशातील कापसाखालील एकूण क्षेत्रापैकी गुजरातेत २६% क्षेत्र आहे, पण कापसाच्या उत्पादनात त्या राज्याचा वाटा ३६% आहे. याचे कारण जास्त एकरी उत्पादन.

तिसरा लक्षणीय बदल असा की गुजरतेतली ९८% पेक्षा जास्त खेडी बरमाही पक्क्या रस्त्यांनी जोडलेली आहेत. ग्रामीण भागात केलेल्या विविध प्रकारच्या गुंतवणुकीचा विचार करता रस्त्यांवर केलेल्या गुंतवणुकीतून सर्वाधिक परतावा मिळतो असा निष्कर्ष अभ्यासातून निघतो. हीच बाब लक्षात घेऊन मोदींनी रस्ते सुधारण्यावर भर दिला आणि परिणाम पुढे स्पष्ट दिसून आला.

कृषीक्षेत्रातल्या संशोधनावरही त्यांनी भर दिला आणि समाजसेवी संस्थांच्या आणि कंपन्यांच्या सहकार्याने नवनवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचले. गुजरात कृषी विद्यापीठाची चार विद्यापीठांत विभागणी करून तेथे वेगवेगळे संशोधन होईल यास प्रोत्साहन दिले.

या सर्व बदलांचा सकारात्मक परिणाम शेतीच्या विकासदरावर झाला. १९९० च्या दशकात गुजरातेतील कृषी विकास दर २% एवढाच होता. २००० च्या दशकात तो ९.२% एवढा झाला. त्याच काळातल्या देशातल्या सरासरी दराच्या तो ३ पट जास्त होता.

ही पार्श्वभूमी पाहता मोदींच्या राज्यात शेतकऱ्यांचे भले होईल ह्या आशेने रंजल्या गांजल्या शेतकऱ्यांनी मोदींना भरघोस मते टाकली. पण मोदी सरकारची आजवरची वाटचाल पाहता, त्यांनी शेतकऱ्यांची घोर निराशा केलेली आहे असे म्हणावे लागेल. किंबहुना शेतकऱ्यांची फसवणूक केली असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. पहिले आपण अर्थसंकल्पाचा आढावा घेऊ. कारण त्यात सरकारच्या दुरगामी धोरणाची दिशा स्पष्ट होते.

२०१४ साली सत्ता हाती घेतल्यानंतर मोदी सरकारने पहिले अंतरिम बजेट सादर केले. त्यापासून फारशा आपेक्षा नव्हत्याच. पण २०१५ साली सादर झालेल्या बजेटपासून मोठ्या आपेक्षा होत्या. मात्र शेतकऱ्याच्या पदरी निराशाच पडली आहे.

बजेटने शेतकऱ्याला काय दिले हे पाहण्याआधी शेतकऱ्याचे मुख्य प्रश्न कोणते याचा थोडक्यात आढावा घेऊया. त्या संदर्भात अर्थसंकल्पात किंवा गेल्या एका वर्षात सरकारने काय केले हेही पाहूया.

शेतकऱ्यास छळणारा मुख्य प्रश्न म्हणजे शेतमालाचे बाजारभाव आणि शेतमालाचा बंदिस्त बाजार. शेतमालाचे भाव आपल्या देशात सरकार ठरवते. हे भाव ठरवण्याची प्रक्रिया अशास्त्रीय असल्याचे शरद जोशी यांनी वेळोवेळी अर्थशास्त्रीय रीत्या सिद्ध केलेले आहे. शेतमालाचे भाव पाडूनच तो खरेदी करायचा हेच सरकारचे धोरण राहिलेले आहे. त्यामुळे शेती सतत तोट्यात राहिलेली आहे. शेतमालाची बाजारपेठ मूठभर दलालांच्या हातात असते. शेतकऱ्यास आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्येच नोंदणीकृत दलालांच्या मार्फत विकण्याचे बंधन आहे. हे दलाल संगनमताने शेतकऱ्यास लुटत असतात. कांद्याच्या दलालांकडून कांदा उत्पादक शेतकऱ्यांची कशी फसवणूक होत असते हे 'कॉंपिटिशन कमिशन ऑफ इंडियाने' दाखवून दिले आहे. केंद्राने आदर्श बाजारसमिती कायदा राबवण्यासंबंधी रज्यांना सुचना केलेली आहे पण तो विषय राज्य सरकारच्या आखत्यारीतला असल्यामुळे मोजकी राज्ये वगळता अनेक राज्यांनी त्याची अंमलबजावणी केलेली नाही. कृषी उत्पन्न बजार समित्या शेतकऱ्यांची लूट करत असतात आणि त्यांच्या माध्यमातुन प्रचंड भ्रष्टाचार होत असतो यामुळेच सगळ्या राजकीय पक्षांची बाजारसमितीवर आपले वर्चस्व राहावे अशी धडपड चाललेली असते.

चालू अर्थसंकल्पात कृषी मालासाठी राष्ट्रीय पातळीवर एकसंध बजारपेठ स्थापन करण्याची मोठी घोषणा करण्यात आली आहे. पण आदर्श बाजार समिती कायद्याची अंमलबजावणी करण्यात सरकारला आलेले अपयश पाहता ही घोषणा प्रत्यक्षात कधी येईल आणि बंदिस्त बाजाराच्या बेड्यांतून शेतकऱ्याची सुटका कशी होईल हे अनिश्चित असल्याचे जाणवते.

कृषीमालाच्या निर्यातीवर सरकार बंदी घालत असते कारण देशातल्या बजारपेठेत त्या मालाचे भाव वाढतील अशी भीती असते. कापूस आणि कांदा ह्या दोन पिकांच्या बाबतीत हा अनुभव हमखास येत असतो. इतर मालाच्या निर्यातीसाठी अनुदान आणि कृषीमालाच्या निर्यातीवर बंधने अशीच सरकारची सावत्रपणाची भूमिका राहिलेली आहे. हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी आजवर आत्महत्या केल्या, पण सरकार द्रवले नाही. कृषी मालाची निर्यात खुली करण्याच्या दृष्टीने सरकारने काहीही पावले उचलेली नाहीत.

शेतकऱ्यांना छळणारा दुसरा प्रश्न म्हणजे कर्जाची अनुपलब्धता. सरकारी बँकांतून शेतीसाठी कर्जे मिळवणे अत्यंत कठीण आणि जिकिरीचे आहे. सरकारी बँका रिझर्व बँकेच्या निर्देशांना अबगल देऊन व्याजाची आणि कर्जाच्या हप्त्याची आकारणी करतात. येवढेच नाही तर या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने

दिलेल्या आदेशांचेही पालन होत नाही. मोदी सरकारने कर्जवाटपाचे उद्दिष्ट वाढवण्याशिवाय शेतीसाठी वित्तपुरवठा सुलभ करण्याच्या दृष्टीने कोणतेही पाऊल उचलेले नाही. त्यामुळे बँकांतुन कर्ज न मिळवू शकणाऱ्या शेतकऱ्याच्या गळ्याभोवती सावकाराचा फास लगणारच अशी भीती वाटते.



शेतकऱ्यास शेतीसाठी महत्त्वाची असलेली एक निविष्ठा म्हणजे खत. कागदोपत्री सरकार हजारो कोटी रुपयांचे अनुदान खतासाठी देते. पण वस्तुस्थिती अशी आहे की हे अनुदान शेतकऱ्यास न देता खत कंपन्यांना केवळ देयके जमा केली की दिले जाते. प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत ते खत पोचले की नाही, त्याचे वाटप न्याय्य पद्धतीने झाले की नाही हे कुणी पाहत नाही. याचा परिणाम खताची कृत्रिम टंचाई होण्यात होतो. काळ्या बाजारात खताचा भाव वाढतो. मग खतासाठी शेतकऱ्यांच्या रांगा लागतात. शेतकऱ्यांवर लाठिमार, गोळीबार होतो. अनेक जखमी तर काही मरतात. हे नेहमीचेच आहे. एवढेच नाही, तर जे मिळाले तेच किंवा जे स्वस्त आहे तेच खत देण्याकडे शेतकऱ्याचा कल असतो आणि जमिनीला/पिकाला कोणत्या खताची जास्त आवश्यकता आहे याकडे दुर्लक्ष होते आणि खताची मात्रा वाया जाते किंवा तिचे पुरेपूर फायदा मिळत नाही. हे टाळण्यासाठी खताच्या अनुदानात आमूलाग्र बदल करणे गरजेचे अहे असे अनेक तज्ज्ञांनी सुचवलेले आहे. त्या दृष्टीने ह्या सरकारने एकही पाऊल पुढे टाकले नाही. नाही म्हणायला प्रत्येक 'सॉईल हेल्थ कार्ड' देऊन माती परीक्षण करता यावे यासाठी निधी मंजूर करून योजना जाहीर केलेली आहे. पण सध्या चालू असलेल्या सरकारी मृदतपासणी प्रयोगशाळांची केविलवाणी अवस्था पाहता याचा काही लक्षणीय परिणाम होईल असे वाटत नाही.

रंजल्यागांजल्या शेतकऱ्यांनी मोदींना भरघोस मते टाकली. पण मोदी सरकारची आजवरची वाटचाल पाहता, त्यांनी शेतकऱ्यांची घोर निराशा केलेली आहे

ग्रामीण भागात पायाभूत सोयींची उभारणी करण्यासाठी २५,००० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्याचा योग्य वापर झाला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर काही प्रमाणात परिणाम होऊ शकतो.

मनरेगा ही योजना तिच्या नावाने होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे बदनाम आहे. ह्या योजनेतला भ्रष्टाचार संपवून ती प्रभावीपणे न राबवता ती तशीच चालू ठेवून सरकारने सुधारणा करण्याची संधी वाया घातली आहे. मनरेगाच्या माध्यमातून हमखास रोजगार मिळत असल्यामुळे ग्रामीण भागात मजुरीचे दर खूप वाढले आहेत. त्यामुळे तोट्यातली शेती जास्तच तोट्यात जात आहे. ज्या काळात शेतीची कामे नसतात त्याच काळात मनरेगाची कामे सुरू केली तर शेतमजुरांचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो. तसेच मनरेगाच्या माध्यमातुन जर वनराई, बंधारे, शेततळे, नालाबंडिग अशी सिंचनक्षमतेमध्ये वाढ करणारी कामे करून घेण्यात आली तर त्याचा शेतकऱ्यास फायदाच होऊ शकतो. पण त्या दिशेने सरकारने पाऊल उचलेले नाही. नाही म्हणायला ५,३०० करोड रुपये सूक्ष्म सिंचनाच्या नावाने देण्यात आले आहेत पण राज्यांनी आपला वाटा उचलावा असे संगून सरकारने पाचर मारून ठेवली आहे. कारण राज्य सरकारांची आर्थिक स्थिती आधीच हलाखीची आहे. जर रज्य सरकारांनी आपला वाटा उचलला नाही तर ही योजना कागदावरच राहील असे दिसते.

बेभरवशाचा आणि निकृष्ट दर्जाचा वीजपुरवठा हा शेतकऱ्यांपुढचा एक मोठा प्रश्न आहे. तो सोडवण्यासाठी सरकारने काहीही केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य सरकारने गोहत्याबंदीसारखा अश्मयुगीन कायदा आणून दुधाच्या धंद्याचे गणित बिघडवले आहे. त्याचा आढावा

घेऊन केंद्राच्या पातळीवर काही करता येईल का याचा विचार केंद्र सरकार करत आहे. तसे काही झालेच तर दुधाच्या व्यवसायासाठी ते मारक ठरेल. कारण आकडेवारी असे दाखवते की जिथे गोहत्येवर बंदी नाही तिथे गायींचे प्रमाण म्हशींपेक्षा खूप जास्त आहे. दुधाच्या व्यवसायातही सरकार ढवळाढवळ करत असते. दुधाची बाजारपेठ खुली करण्यासंबंधी सरकारने काहीही केलेले नाही.



सरकारने न केलेल्या कामांची यादी अशी मोठी असताना जमीन अधिग्रहण कायदा आणून सरकारने जो घोळ घातला आहे तो कुठल्याही 'सुलतानी'पेक्षा कमी नाही. हा कायदा खरे तर स्वतंत्र लेखाचाच विषय आहे. पण सध्या थोडक्यात समजावून घेऊ. विविध विकास कामांसाठी सरकार शेतकऱ्यांकडून हव्या त्या जमिनीचे अधिग्रहण करणार. शेतकऱ्याने जो मिळाला तो मोबदला घेऊन गप्प बसावे अशी सरकारची आपेक्षा आहे. विकासासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा विरोध मुळीच नाही. पण खाजगी उद्योग, व्यवसाय यांसाठी सरकारने अधिग्रहण करू नये ही अपेक्षा रास्त आहे. त्याचबरोबर सरकार जो मोबदला देत आहे तोही पुरेसा नाही. अधिग्रहणाच्या कारणाने शेतकऱ्यास आपल्या उत्पन्नाच्या स्रोतास कायमचे मुकावे लागते हे लक्षात घेऊन त्याची भरपाई व्हायलाच हवी.

एकूण काय, गुजरातेत जोमाने सुधारणा राबवून मोदींनी तेथील कृषीक्षेत्राचा कायापालट केला आणि गुजराती शेतकऱ्याच्या आयुष्यात 'अच्छे दिन' आणले, मात्र केंद्रात त्यांच्या नेतृत्वाखालचे सरकार आल्यावर शेतकऱ्याचे शोषण करणारे धोरण बदलेल आणि त्यास 'अच्छे दिन' येतील ही अपेक्षा पूर्ण होताना दिसत नाही हे खेदाने नमूद करावे लागेल.

देशातली अर्धी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. कृषीक्षेत्राच्या विकासाचा दर १.१ वर कुंठीत झाला आहे. देशातल्या अर्ध्या लोकसंखेला हलाखीच्या परिस्थितीमधे ठेवून देशाला 'अच्छे दिन' आले असे म्हणाता येणार नाही. पण तसे होऊ नये म्हणून मोदी सरकारने काहीही केलेले नाही असेच त्यांच्या एका वर्षाच्या कारभाराचा आढावा घेतला असता म्हणावे लागेल. ●

**– श्रीकृष्ण उमरीकर**
९४२२६४६२८३
umrikar@gmail.com




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

# अंतर्नेत्र – सुदेश लोटलीकर

ग्रंथाली

कवी वा अन्य कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून आपले जगणे व त्यावरचे आपले भाष्य अर्थपूर्ण करत असतात. सुदेश लोटलीकरांनीही त्यांच्या कवितेतून आपल्या जगण्याची अर्थपूर्णता प्रकट केली आहे. एकेकाळी मला लोटलीकरांचे काव्यलेखन हे इतर अस्तित्वलक्षी कवींच्या लेखनासारखेच वाटत होते. आज मात्र त्यांच्या 'अंतर्नेत्र' या कवितासंग्रहातल्या आध्यात्मिकतेच्या वैशिष्ट्यपूर्ण स्पर्शामुळे व तशा स्पष्ट निर्देशामुळे त्यांचे काव्यलेखन वेगळे बनले आहे.

**– डॉ. केशव सद्रे**



# मोदी सरकार : पहिल्या वर्षाचा ताळेबंद

**अमेय तिरोडकर**

नरेंद्र मोदी सत्तेत आले तेच एका प्रचंड ध्रुवीकरण झालेल्या वातावरणात. वर्षभरापूर्वीचा तो माहौल असा होता की जणू काही देशाची मोदीसमर्थक आणि मोदीविरोधक अशी मानसिक फाळणीच झाली होती! अजूनही या दोन्ही बाजूंचे चढलेले आवाज खाली आलेले नाहीत. अशा स्थितीत ‘मोदी सरकार’च्या एका वर्षाच्या कामाचा लेखाजोखा मांडायचा म्हणजे बोलभांडांच्या गदारोळात आणखी एकानं सामील व्हायचे. पण, हा धोका पत्करून आणि दोघांचीही लागट टीका अंगावर घ्यायची तयारी ठेवून ही चर्चा केलीच पाहिजे! याचं कारण जनता सरकार ५ वर्षांसाठी निवडते. आणि एक वर्ष त्या सरकारची दिशा आणि गती समजायला पुरेसं असतं. म्हणून ही चर्चा केली पाहिजे. पण इतकंच नाही, तर त्याही पुढे जाऊन ‘मोदी सरकार’ने या १ वर्षाच्या काळात जे प्रशासनयंत्रणा आणि व्यवस्था यांचे ‘नवे आयाम’ उभे केलेत त्यांचीही चर्चा लोकशाहीच्या दूरगामी हिताच्या दृष्टिकोनातून केली पाहिजे!

या सरकारची सर्वात ठळक गोष्ट कोणती तर हे ‘मोदी सरकार’ आहे. थेट... स्पष्ट.. व्यक्तिकेंद्रित. कागदावर दाखवायला २९ पक्षांची राष्ट्रीय लोकशाही आघाडी वगैरे आहे ते सोडा, पण ते उरलेले २८ पक्ष आणि भाजपमधले उरलेले २८१ खासदार यांच्या असण्यापेक्षाही मोदी हेच चलन आज मोठं आहे. आणि ते साहजिकही आहे. मोदींनी प्रचारामध्ये ‘एनडीए’साठी नाही, ‘भाजपा’साठी नाही, तर थेट स्वत:साठी मतं मागितली आणि ३० वर्षांच्या कालखंडानंतर एवढ्या अजस्त्र देशात एकहाती सत्ता आलीही. त्यामुळे या अशा व्यक्तिकेंद्रित सत्तास्थानाबद्दल मोदींच्या समर्थकांमध्ये कौतुक, तर राजकीय विरोधकांमध्ये असूया आहे! १२५ कोटींचा देश असा एकाच माणसाच्या हातात एकवटला तर कसं चालेल असे प्रश्न विरोधकांना विचारू दे, पण सामान्य जनतेला मात्र यूपीए २ च्या भोंगळ अनागोंदी कारभारानंतर मोदींना एकहाती सत्ता दिलीय त्याबद्दल ‘अजूनही’ विश्वास वाटतो. लक्षात घ्या, हा विश्वास ‘जबाबदारी’ संदर्भातला आहे. या सरकारच्या सगळ्या भल्यावाईट गोष्टींसाठी कुणाला जबाबदार धरायचं याचा फैसला जनतेनं यातून केलाय.

> मोदी एकहाती कारभार चालवात ही चर्चा आहे. पण एक समजून घेतलं पाहिजे, की पंतप्रधान हे एरवीही मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात. या नात्यानं ते कुठल्याही खात्यामध्ये हस्तक्षेप करू शकतात.

**सरकार आणि कार्यपद्धती**

या जबाबदारीचा ताण पंतप्रधान कार्यालयाचा कानोसा घेतला की जाणवतो. तब्बल सव्वातीनशेहून अधिक अधिकारी सध्या या कार्यालयात घेतले गेलेत. (ही ‘आयात’ अजूनही सुरू आहे.) यापूर्वी इतिहासात कधी एवढं मोठं PMO नव्हतं. (मनमोहनसिंग यांच्यावेळी याच्या निम्मंपण नव्हते) याचा अर्थ काय? PMO ला इतके अधिकारी नेमके कशासाठी लागतात? याचा अर्थ कुठल्याही नजरेतून पाहिला तरी हाच की PMO आता जवळपास सगळ्याच मंत्रालयांशी आणि सरकारी संस्थांशी (over?) actively जोडलंय. समन्वयासाठी, गतिमान निर्णयांसाठी आणि त्यांच्या तशाच अंमलबजावणीसाठी ही यंत्रणा उभी केलीय असं याचं समर्थन आहे. आणि एका दृष्टीनं त्यात वावगं काहीच नाही. सत्तेचं एक अजस्त्र केंद्र नरेंद्र मोदींनी एकहाती कारभार चालवताना उभं केलंय ही चर्चा जरूर आहे. पण आपल्याला एक समजून घेतलं पाहिजे, की पंतप्रधान हे एरवीही मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात. या नात्यानं ते कुठल्याही खात्यामध्ये हस्तक्षेप करू शकतात. शिवाय भारतीय अधिकारीवर्गाच्या काम करण्याच्या गतीमुळे वर्षानुवर्षं रखडणारे प्रश्न मार्गी लावण्यासाठी थेट policy making authority नं अशी यंत्रणा उभी करायची तयारी दाखवली असेल तर कौतुकच व्हायला

हवं. यातला शंकेचा मुद्दा हा आहे की, इंदिरा गांधींच्या १९७३ ते ७५ पर्यंतच्या काळात इतका मोठा कारभार नसला तरी इतकंच शक्तिशाली PMO होतं. तेव्हा PMO कडून निर्णयप्रक्रियेच्या संदर्भात ज्या काही संस्थात्मक चुका झाल्या त्यांची चर्चा देशात या आधी झाली आहे. गतिमान प्रशासनाच्या भरात मोदींनी या व्यवस्थेमधून अशा चुका करता कामा नयेत. अजूनतरी निर्णयप्रक्रियेच्या दिल्लीतल्या अंडर सेक्रेटरी ते वर मंत्री आणि कॅबिनेट सेक्रेटरी या व्यवस्थेमध्ये तडजोडी झाल्याची चर्चा नाही. जोवर अशी चर्चा होत नाही तोवर या व्यवस्थेबद्दल आक्षेप घेण्याचं काही कारण नाही. फक्त आता, मोदींच्या कामांना गती देण्याच्या या प्रयत्नांना किती यश मिळालंय याची जमिनीवरची परिस्थिती लक्षात यायला आपल्याला आणखी साधारण एक वर्ष वाट पाहायला हवी. हे झालं ज्याची फार चर्चा/कुजबूज आहे त्या PMO बद्दल. पण मोदींच्या मंत्रिमंडळाबद्दल सुद्धा सत्तेच्या वर्तुळात फार उत्सुकता आहे.

जर बारकाईनं पाहिलं तर या मंत्रिमंडळाची ३ प्रकारे वर्गवारी करता येईल. पहिली मोदीनिष्ठ. 'कॉर्पोरेट' पद्धतीनं काम करणारे आणि मोदींच्या पूर्ण 'ऐकण्यातले' – ज्यांना फारसा राजकीय जनाधार नाही अशी ही पहिली मंडळी आहे. यातले जवळपास सगळेच राज्यसभेतले आहेत. लोकसभेत २८२ खासदार निवडून आलेले असताना मोदींनी कोणाकोणाला कुठली महत्त्वाची खाती दिलीत ती पाहा.

रेल्वे मंत्री– सुरेश प्रभू , मनुष्यबळ विकास मंत्री – स्मृती इराणी, उर्जा मंत्री – पियूष गोयल, पेट्रोलियम मंत्री – धर्मेंद्र प्रधान, पर्यावरण मंत्री – प्रकाश जावडेकर, आरोग्य मंत्री – जे.पी. नड्डा, टेलिकॉम मंत्री – रविशंकर प्रसाद, वाणिज्य मंत्री – निर्मला सीतारामन.

ही सगळी खाती लोकांच्या दैनंदिन व्यवहारांशी निगडीत आहेत. आणि त्याचवेळेला या खात्यांचे आर्थिक व्यवहारसुद्धा प्रचंड आहेत. इथे ज्या बड्या उद्योगपतींचे आर्थिक हितसंबंध गुंतले आहेत त्यांचे मोदींशी घनिष्ठ संबंध आहेत असाही आरोप होत असतो. त्यामुळेच या मंत्र्यांनी दिलेल्या प्रत्येक स्टेटमेंटला, घेतलेल्या प्रत्येक निर्णयाला लगेच मोदींशी जोडलं जातं. यातूनच मग, प्रकाश जावडेकर यांचं मंत्रालय आता 'क्लिअरन्स मंत्रालय' झालंय असा आरोप झाला. किंवा पियूष गोयल यांच्यावर 'एलइडी' दिव्यांच्या बाबतीत शिवसेनेच्या संजय राऊत यांनीच प्रश्न उठवले. स्मृती इराणी यांच्याबद्दल गेल्या वर्षात जितके वाद झले तितके कुणाबद्दलच नाही. त्यांच्या येल विद्यापीठातल्या त्या तथाकथित पदवीपासून ते ज्योतिषाला हात दाखवण्यापर्यंतच्या मुद्यावर वैयक्तिक स्वरूपाचे वाद झाले. विभागाशी संबधित झालेल्या आरोपांची गंभीरता तर अधिक आहे. आयआयटीमधल्या नेमणुकांच्या मुद्यावरून अनिल काकोडकर यांच्यासारख्या ज्येष्ठ मान्यवर शास्त्रज्ञाने राजीनामा दिला. ICHR (Indian Council for Historical Research) च्या वाय. सुदर्शन राव यांच्या नेमणुकीवर तर गदारोळ उडाला. पण इतक्या मूलभूत आणि गंभीर वादानंतरही मोदी चकार शब्द बोलले नाहीत. इराणी यांची कानउघाडणी केल्याचं ऐकिवात नाही. ही इतकी मुभा का? असा प्रश्न यातूनच उभा राहतो. आणि मग सरकारची ही वर्षभरातली नकारात्मक बाजूही लोकांच्या ठळकपणे समोर येते.

दुसरी वर्गवारी आहे ती वादग्रस्त मंत्र्यांची. साध्वी निरांजना ज्योती, गिरीराज सिंग, व्ही.के. सिंग, निहालचंद मेघवाल अशांची. यातल्या कोणी वादग्रस्त स्टेटमेंट केलंय तर कोणावर गंभीर आरोप आहेत. निरांजना ज्योती यांच्या 'रामजादे ..रामजादे' कॉमेंटनंतर मोदींनी लोकसभेत तोंडदेखलं स्टेटमेंट केलं आणि वेळ निभावून नेली. पण यातून चुकीचा संदेश गेला. मोदींना अशी स्टेटमेंट चालतात असा समज त्यांच्या सहका–यांनी करून घेतलाय की काय कोण जाणे, पण मग 'पाकिस्तान दिवस'च्या कार्यक्रमात जाण्यावरून व्ही.के. सिंग यांनी केलेलं ट्विट असो किंवा गिरिराज सिंग यांनी सोनिया गांधी यांच्याबद्दल वापरलेली अश्लाघ्य भाषा असो, मोदींच्या मंत्र्यांनी बोलण्याचं ताळतंत्र सोडलंय असंच चित्र तयार झालंय. आणि दुर्दैवानं त्याबद्दल ना सरकारला प्रामाणिक खेद दिसतोय ना भाजपाला!

तिसरी वर्गवारी ही भाजपामधल्या ज्येष्ठांची आहे. अरुण जेटली, राजनाथ सिंग, सुषमा स्वराज, नितीन गडकरी, अनंतकुमार, व्यंकय्या नायडू, उमा भारती, कलराज मिश्रा यांची. हे सगळेजण सध्या शांतपणे मोदी आणि मोदीनिष्ठांचा खेळ पाहत आपापल्या मंत्रालयाचं काम करत आहेत. यात गृहमंत्रालय आणि परराष्ट्रमंत्रालय सोडलं तर इतर खात्यांमध्ये मोदींचा किंवा मोदींच्या निकटवर्तीयांचा फारसा हस्तक्षेप नाही. संरक्षण आणि परिवहन खात्यांचा कारभार मोदींना अपेक्षित आहे तसाच चालला असल्याचं चित्र आहे. मग ते पर्रीकरांनी जपानमध्ये जाऊन रशियाच्या संरक्षणमंत्र्यांशी केलेला करार असो किंवा ग्वदार बंदर विकासासाठी गडकरींनी पुढाकार घेऊन केलेला करार असो. मोदींच्या परराष्ट्र धोरणाबाबतीत आपण सविस्तर चर्चा पुढे करू. पण मोदींच्या या विभागातील महत्त्वाकांक्षी योजनांमुळे आणि त्या पूर्ण करण्यासाठी थेट मोदींनीच actively लक्ष घातल्यामुळे सुषमा स्वराज यांना फारसं काम उरलेलं नाही. मूळातच मोदींच्या भाजपातल्या वाढत्या प्रभावाच्या काळापासून सुषमा स्वराज बाजूला फेकल्या गेल्यात. त्यातच मंत्रालयाची ही कथा ! गृहमंत्री राजनाथ सिंग यांची स्थिती सुषमांपेक्षा वेगळी नाही. मोदींचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल हेच या खात्याचा महत्त्वाचा सगळा कारभार हाकतात ही गोष्ट जाणकारांपासून लपलेली नाही. डोवाल इतके ॲक्टिव्ह आहेत की बंगालमधल्या बर्धमान स्फोटावरून NSA म्हणून त्यांनी जी 'कामगिरी' केली तिचं राजकीय स्वरूप अधिक आहे असा आरोप बंगालमधल्या सर्व प्रमुख पक्षांनी केलाय. कायदा आणि सुव्यवस्था हा राज्याचा विषय आहे. इंटेलिजेंस शेअरींगच्या भूमिकेत केंद्राने असावं पण त्यापलिकडे ढवळाढवळ करू नये अशी भूमिका मोदींनीच अडीच वर्षांपूर्वी NCTC च्या वादावेळी मांडली होती.

तेव्हा ते गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि 'देशाचा संघराज्य ढाचा NCTC च्या माध्यमातून यूपीए सरकार कमजोर करतंय' असा त्यांचा आरोप होता. विशेष म्हणजे बंगालच्या मुख्यमंत्री म्हणून ममतादीदीही तेव्हा त्यांच्यासोबत होत्या. आता याचा हा सविस्तर उल्लेख केला कारण 'बर्धमान'च्या निमित्तानं जे काही झालं ते याहून वेगळं नव्हतं. त्यामुळेच हा जो 'NSA हैण्ड' गृहमंत्रालयात आहे त्याबद्दल विरोधकांमध्ये अस्वस्थता आहेच, पण भाजपातही त्याचा 'दरारा' आहे!

आपण सरकारच्या कार्यपद्धतीबद्दल बोलताना जाता जाता बाबूवर्गाबद्दलही बोललं पाहिजे. ब्यूरोक्रसी हलली तर आपलं सरकार हलेल याची पूर्ण जाणीव मोदींना आहे. आणि इथे रिझल्ट्स मिळावेत म्हणून मोदींनी दुपदरी व्यवस्था आखलेली दिसते. एक म्हणजे अधिकाऱ्यांना निर्णय घ्यायला प्रवृत्त करणं, विश्वास देणं. यूपीएच्या काळात हा प्रकार जवळपास संपला होता. कोर्टकचेऱ्यांच्या भीतीनं अधिकारी निर्णय घेईनासे झाले होते. मोदींनी या अधिकाऱ्यांना विश्वास द्यायचा प्रयत्न चालवला आहे. वर्षभरात तब्बल तीनदा ते सर्व खात्यांच्या सचिवांना भेटलेत. एप्रिलच्या भेटीनंतर या अधिकाऱ्यांच्या विनंतीनुसार भ्रष्टाचारविरोधी कायद्यातील (जे यूपीए-२ने आणले होते) काही जाचक तरतुदी बदलण्याचा निर्णयही त्यांनी घेतलाय. हा झाला एक मार्ग. दुसरा आहे 'आपले' अधिकारी शोधण्याचा आणि त्यांना संधी देण्याचा. दिल्लीमध्ये काही माजी IAS, IFS, IPS अधिकाऱ्यांनी एकत्र येऊन 'विवेकानंद थिंक टॅक' बनवला आहे. RSS च्या विचारसरणीशी जवळीक असणारे हे अधिकारी आहेत असं म्हटलं जातं. सध्याचे NSA आणि मोदींचे कुठल्याही सहकारी मंत्र्यापेक्षा विश्वासू अजित डोवाल हे आताआतापर्यन्त याचे प्रमुख होते. असे जे हे 'आपले' अधिकारी आहेत त्यांना महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी देऊन 'व्यवस्थे'मध्ये 'परिवर्तन' आणण्याचा प्रयत्न मोदींनी चालवलाय.

पंतप्रधान झाल्यानंतर मोदींनी चालवलेल्या विदेशी दौऱ्यांमुळे त्यांच्यावर खोचक टीका झाली. 'प्रचारक' पंतप्रधानांचे दौऱ्यांचे 'इव्हेंट' आणि दौऱ्यातले 'इव्हेंट' फार चर्चिले गेले. सोशल मिडियावर 'अनिवासी भारतीय पंतप्रधान' अशा खोचक टीकेला मोदींना तोंड द्यावं लागलं. स्वत:च्या 'इमेज'बद्दल प्रचंड जागरूक असणाऱ्या मोदींनी तरीही दौरे थांबवलेले नाहीत. याचा अर्थ यात मोदींची स्पष्ट रणनीती असली पाहिजे. सरकारला एक वर्ष पूर्ण होत असताना हळूहळू ही रणनितीसुद्धा स्पष्ट होत आहे. आपल्या आयुष्याशी ती जोडली गेली असल्यानं गांभीर्यानं समजून घेतली पाहिजे. आणि त्याची प्राथमिक पायरी म्हणून मोदींचं परराष्ट्र आणि अर्थधोरण हातात हात घालून चाललं आहे हे गृहितक पक्कं ध्यानात ठेवलं पाहिजे.



काम करणारे मंत्री म्हणून दिल्लीत सुरेश प्रभू, प्रकाश जावडेकर आणि पियूष गोयल या मंत्र्यांची नावे अग्रक्रमाने घेतली जातात

देश जिंकल्यानंतर आता जगात आपला दबदबा वाढला पाहिजे हा मोदींचा अजेंडा आहे. तो पूर्ण करताना आपल्या उणिवा आणि शक्तिस्थानं यांची मोदींना पूर्ण जाणीव आहे. शपथविधीला 'सार्क' राष्ट्रांच्या प्रमुखांना आमंत्रण देऊन मोदींनी त्याची चुणूक दाखवून दिली. 'सार्क'च्या काठमांडू परिषदेमध्ये या राष्ट्रांसाठी 'उपग्रह' सोडण्याचा बोलून दाखवलेला इरादा त्यांच्या 'सार्क'चं नेतृत्व करण्याच्या महत्त्वाकांक्षेचं प्रतीक आहे. श्रीलंकेमध्ये २८ वर्षानंतर भारतीय पंतप्रधानांनी ठेवलेलं पाऊल हीसुद्धा याच धोरणाची एक गरज होती. नेपाळ आणि भूतानचा दौरा करून या दोन्ही शेजाऱ्यांना भरघोस आर्थिक मदत दिली आणि दुसरीकडे आपली विजेची गरज भागवण्यासाठी १० हजार मेगावॉटचे प्रत्येकी १ प्रकल्प या देशांत लागतील याची व्यवस्था केली. ज्या भाजपानं बांगलादेश-सोबतच्या सीमासहमती कराराला राज्यसभेत विरोध करत बरोबर दीड वर्षापूर्वी अडवून धरलं त्याच भाजपाच्या मोदींनी सत्तेवर आल्यावर 'सार्क' नेतृत्वाच्या महत्त्वाकांक्षेतून या करारात एकाही अक्षराचा बदल न करता चालना दिली! (आपला हा दुटप्पीपणा मात्र मान्य करायला मोदी आणि भाजपा तयार नाहीत.)

मात्र मोदींनी या 'सार्क' पलीकडे एक व्यापक परराष्ट्र धोरण आखलंय. जे व्यापार आणि स्ट्रेटेजिक जिओ पॉलिटिकल दृष्टिकोनातून भविष्यात अत्यंत महत्त्वाचं आहे. मोदी 'द्वारका' ज्या

राज्यात येते त्या गुजरातमधून येतात. मथुरेहून जेमतेम साधानांनिशी पळावं लागलेल्या श्रीकृष्णानं आणि यादवांनी द्वारकेला समुद्राच्या किनाऱ्यावर जाऊन बलशाली यादव राष्ट्र उभं केलं. ते त्यांना शक्य झालं कारण समुद्रावरच्या व्यापारानं त्यांना संपन्न बनवलं. शक्ती, सामर्थ्य या संपन्नतेतून येणाऱ्या गोष्टी आहेत हे द्वारका आणि व्यापार या दोन्ही गोष्टी समजणारे मोदी जाणतात. हिंदी महासागरातून होणाऱ्या वाहतुकीचं व्यापारी आणि राजकीय महत्त्व विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात वाढलंय. एकविसाव्या शतकात तर हा हिंद महासागराचा पट्टाच जगाच्या तराजूची स्थिती ठरवेल. अलीकडे यावर जास्त चर्चा सुरू झाली ती रॉबर्ट काप्लान या ख्यातनाम पत्रकाराच्या मॉन्सून या पुस्तकामुळे. या पाथब्रेकिंग पुस्तकात मॉन्सून ज्या पट्ट्यात कोसळतो त्या भागावर जगाचं भवितव्य कसं अवलंबून असेल याचं विवेचन आहे. (याच पुस्तकात मोदींनी मुख्यमंत्री असताना कांडला बंदराच्या विकासाला कसं दूरदृष्टी ठेवून महत्त्व दिलं त्यावर एक पूर्ण चॅप्टर आहे.) हे इतक्या विस्तृतपणे लिहिलं कारण मोदींनी या पट्ट्यावर लक्ष केंद्रीत केलंय. मुळात चीन आणि अमेरिका खूप अगोदरच इथे उतरलेत. आपल्याला उशीर झालाय. पण भारताचं मध्यवर्ती स्थान आणि व्यापाराची क्षमता यामुळे या भागाच्या नेतृत्वाची खूप मोठी संधी देशाला आहे. मोदींचे माले, मॉरिशस, ते म्यानमार आणि सुमात्रा दौरे या संदर्भातून पाहिले पाहिजेत. सरकारला अवघं एक वर्षं होत असतानाच परराष्ट्र आणि व्यापार धोरणाची दिशा इतक्या स्पष्टपणे आखून त्यावर काम करणं ही मोदी सरकारची कौतुकास्पद कामगिरी आहे.



भारताच्या परराष्ट्र धोरणात सर्वात महत्त्वाचा चौकोन आहे तो अमेरीका-पाकिस्तान-चीन-रशिया. मोदी सरकारनं इथेही वर्षभरात अनेक गोष्टी केल्यात. पाकसोबतची चर्चा ऑगस्ट २०१४ मध्ये तोडली आणि पीडीपीसोबत JK मध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी त्या PDP-BJP करारातली एक अट म्हणून परत सुरू केली. यूपीएच्या पाक धोरणाची खिल्ली उडवत सत्तेवर आलेल्या मोदींना त्यांच्या या गोंधळाच्या धोरणामुळे RSS चा पाठिंबा पण जिंकता आला नाही तिथे सामान्य जनतेची मनं जिंकणं सोडाच. पण त्याहीपलीकडची गंभीर गोष्ट अशी की चीन आणि पाकला कॉर्नर करण्यासाठी 'बराक बराक' करत अमेरिकेच्या जवळ जाण्याने आपण रशियासारखा वाईट काळातही साथ देणारा मित्र गमावला. युक्रेनच्या मुद्यावरून रशियाला इशारा देण्यासाठी ओबामांनी भारताच्या भूमीचा वापर केला आणि आपण त्यावर न ऐकल्यासारखे एकदम गप्प राहिलोत हे पाहून रशियानं पाकिस्तानला लढाऊ विमानं देण्याचा निर्णय घेतला. मागच्या ६० वर्षांत झालं नव्हतं ते ओबामांच्या एका दौऱ्यात झालं! अखेर संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकरांना 'रशियानं अशी विमानं देणं हा काळजीचा विषय आहे' हे मान्य करावं लागलं.

इतकंच नाही तर अमेरीकेशी ७ वर्षं अडलेल्या अणुकराराचा गुंता सुटलाय असा दावा करणाऱ्या सरकारला 'अणुअपघाता'ची जबाबदारी कुणाची या मुद्याचं जाहीर उत्तर अजून देता येत नाहीये. या सगळ्यातून प्रजासत्ताक दिनाचा जागतिक 'इव्हेंट' होण्यापलिकडे देशाचा नक्की काय फायदा झाला हे मोदी सरकार जनतेला सांगू शकलेलं नाही. असेच मोठमोठे इव्हेंट मोदींनी त्यांच्या अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा दौऱ्यात केले. याचा झगमगाट आणि खर्च डोळे दिपवणारा झाला. पण त्यामुळे एक रुपयाचीही गुंतवणूक देशात आलेली नाही हे माहितीच्या अधिकारात स्पष्ट झालं. शेवटी नव्यानं उभ्या केलेल्या निती आयोगाचे उपाध्यक्ष आणि मोदींचे खंदे समर्थक असलेल्या अरविंद पंगारिया यांना 'जेवढं बोललं जातंय तेवढं जमिनीवर होताना दिसत नाहीये' अशी स्पष्ट कबुली CII च्या एप्रिल महिन्याच्या कार्यक्रमात द्यावी लागली.

याचा अर्थ स्पष्ट आहे. जगाकडून १२५ कोटींच्या देशाकडे नाही तर बाजारपेठेकडे बघितलं जातंय. म्हणूनच मोठ्या आर्थिक सुधारणा करण्याची हिंमत दाखवली नाही तर सरकारवरची वर्षभर थोपवून धरलेली टीका फार काळ रोखता येणार नाही.

२८२ खासदारांचं एकहाती सरकार असूनही पहिल्या वर्षभरातच सरकारची प्रतिमा गंभीर चर्चेचा विषय बनते या परिस्थितीला सरकारच जबाबदार आहे. अध्यादेश काढणारं सरकार अशी या सरकारची ओळख बनलीय. देशभरात गदारोळ उडालाय

तो जमीन संपादनाच्या अध्यादेशावरून. त्याची चर्चा आपण करूच. पण याशिवायही एकूण १० अध्यादेश हे सरकार घेऊन आलं. यातले विमा, कोळसा, खाणीचे चर्चेअंती कायद्यात रूपांतरित झाले. हे होणारच होतं. फक्त अध्यादेश काढल्यानंतर विरोधकांशी चर्चा करायची जी भूमिका सरकारने घेतली ती आधीच घेतली असती तर सरकारच्या प्रतिमेवर झालेला नकारात्मक परिणाम टाळता आला असता. मोदी मुख्यमंत्री असताना विरोधकांशी बोलायचेही नाहीत. सभागृहात अत्यंत कमी वेळ हजर असायचे. यातून त्यांची जी 'व्यवस्थेला वळसा घालणारा नेता' (विरोधक या वृत्तीवर टीका करताना हुकूमशहा म्हणतात. मी इतका टोकाचा शब्द वापरणार नाही) अशी जी प्रतिमा झालेली आहे ती अध्यादेशाच्या या निर्णयानंतर अधिक गडद झाली.



आता जमीन संपादनाच्या अध्यादेशाबद्दल. २०१३ सालचा कायदा भाजपाच्या साक्षीनं आणि सहीनं संमत झाला होता हे देशाने पाहिलंय. पण उद्योगवर्तुळाचे या कायद्या-बद्दल काही आक्षेप होते. यूपीएच्या कारभाराला जितकी सामान्य जनता विटली होती तितका उद्योजकवर्गसुद्धा. यातून 'प्रो ग्रोथ – प्रो इंडस्ट्री' भूमिका घेणारे 'गुजराती मोदी' या वर्गाची आशा बनले. ते सत्तेत यावेत म्हणून या वर्गानं 'आवश्यक ते सर्व सहकार्य' मोदींना केलं असे आरोपही झाले. इथवर ठीक होतं. पण सत्तेत आल्यानंतर या देशातल्या जवळपास ६५ कोटी जनतेचा (म्हणजे बहुसंख्यांचा) उदरनिर्वाहाचा संबंध ज्या जमिनीशी येतो त्या जमिनीच्या कायद्यात बदल करताना व्यापक चर्चेची गरज होती. या बहुसंख्य जनतेनं कमीअधिक प्रमाणात का होईना सगळ्या पक्षांचे लोक निवडून दिलेत. त्यांच्याशी विचारविनिमय व्हायला हवा होता. या निवडून आलेल्या प्रतिनिधींच्याही पलीकडे भारतासारख्या जागृत लोकशाहीत विविध सामाजिक संस्था लोकांशी जोडलेल्या असतात. त्यांना विश्वासात घ्यायला हवं होतं. पण हे काहीच न करता जो अध्यादेश आणला जातो त्याबद्दल मग संशय, संभ्रम आणि विरोध हा असणारच! लोकशाहीचं हे इतकं मूलभूत तत्त्व समजून न घेतल्याचा परिणाम मोदी सरकारला आता अनेक आघाड्यांवर भोगावा लागतो आहे. ज्यांना १२ महिन्यांपूर्वी 'देशाचा तारणहार' म्हणून पाहिलं गेलं ते आज 'उद्योगपतींसाठी काम करणारे' झालेत. सरकारची ही प्रतिमा एकीकडे तर दुसरीकडे या अध्यादेशामुळे गलितगात्र विरोधकांना एकत्र येण्याची, मोदीविरोधी मोर्चा उभारण्याची संधी मिळालीय. शिवाय अण्णा हजारे, मेधा पाटकर यांनी आंदोलनाचा इशारा दिलाय. २०१३ च्या स्वरूपात मूळ कायदा परत आणला नाही तर या आघाडीवर उग्र आंदोलनाला सरकारला सामोरं जायचं आहे. आणि २०१३ च्या स्वरूपातला कायदा उद्योगवर्गाला मान्य नसल्यामुळे अर्थव्यवस्थेला मोठ्या उद्योगांच्या माध्यमातून उभारी देण्याच्या मोदींच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे. समन्वयाची भूमिका न घेतल्यामुळे या अशा तिहेरी कोंडीत मोदी सरकार सापडलेलं आहे. या देशातल्या जनतेला 'दमदार', 'खंबीर' नेतृत्वाबद्दल आकर्षण जरूर आहे. पण दमदारपणाचा अर्थ 'मनमानी', 'दुराग्रही' नाही हेही जनतेनं वारंवार सिद्ध केलंय हे लक्षात घेऊन मोदींना आता यापुढे पावलं टाकावी लागतील.

लोकसभा निवडणुकीत भाजपाला अभूतपूर्व यश मिळवून देण्याआधीच मोदींनी पक्षावर पूर्ण पक्कड मिळवली होती. याला कारण होतं ते त्यांची संघ परीवारातील केडरमध्ये असणारी लोकप्रियता. हे केडर मुळातच आक्रमक असतं. सत्ता आल्यानंतर त्यांना पुन्हा विविध संस्थात्मक कामांत किंवा व्यापक जनहिताच्या कार्यक्रमांत कसोशीनं गुंतवून ठेवणं गरजेचं होतं. अमित शहांना भाजपाचं अध्यक्ष केल्यानंतर तसे दोन कार्यक्रम त्यांनी दिलेही. ऊर्जाबचत आणि स्वच्छता. पण यापेक्षा परिवारातील काही संस्थांनी जास्त भर दिला तो वादग्रस्त कामांवर. 'लव्ह जिहाद', 'घरवापसी', 'गीता राष्ट्रग्रंथ' या आणि अशा उपद्व्यापांमुळे मोदी सरकारला हिंदुत्ववादी अजेंडा राबवत असल्याच्या टीकेला तोंड द्यावं लागतंय. त्यातच देशात काही ठिकाणी चर्चेसवर हल्ले झाले. पहिल्या हल्ल्यानंतर जवळपास तीन महिन्यांनी मोदींनी 'असे हल्ले सहन करणार नाही. कायद्याने कठोर कारवाई करू' असं आश्वासन ख्रिश्चन समुदायाच्या एका कार्यक्रमात दिलं. 'धार्मिक सलोखा बिघडवणारी वक्तव्यं करणाऱ्यांना इशारा दिला'. पण नेमकं त्यानंतरच्या तिसऱ्याच दिवशी सरसंघचालक मोहन भागवत यांचं मदर टेरेसा यांच्याबद्दल एक वादग्रस्त विधान आलं. या सगळ्यातून मोदींच्या आश्वासनांच्या गांभीर्यावर प्रश्न उभे राहिलेत. कलम ३७०, गोवंश हत्या बंदी, हिंदी एकमेव भाषा, हे वादग्रस्त मुद्दे संघाच्या अजेंड्यावर आहेतच. त्यामुळे मोदींना जी विकास, आधुनिकता, उच्च राहणीमान, तंत्रज्ञान या मुद्यांवर मतं मिळाली होती ते मुद्दे सत्ता मिळवण्यापुरतेच होते असं लोकांचं साधारणपणे मत होऊ

लागलंय. यामुळेच दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशामुळे लोकांनी मोदी सरकारला 'ट्रॅक'वर येण्यासाठी इशारा दिला असं म्हटलं गेलं.

म्हणूनच लोकसभेनंतर महाराष्ट्र, हरियाणा, झारखण्ड, जम्मू-काश्मीर अशा चार राज्यांत सत्ता मिळवूनही आणि देशभरात जवळपास सात कोटींपेक्षा जास्त सदस्य बनवूनही बिहारची लढाई भाजपाला सोपी वाटत नाही!

> एका रात्रीत या देशाचे प्रश्न सुटणार नाहीत आणि भाजपाचा अश्वमेधाचा वारू दिल्लीत रोखला गेला असला तरी नव्या जोमानं मोदी आणि अमित शाह ही जोडगोळी येत्या दोन वर्षांतील निवडणुकांसाठी कामाला लागलीय.

भाजपाचा अश्वमेधाचा वारू दिल्लीत रोखला गेला असला तरी नव्या जोमानं मोदी आणि अमित शाह ही जोडगोळी येत्या दोन वर्षांतील निवडणुकांसाठी कामाला लागलीय. केंद्रातील सत्तेचा पुरेपूर वापर करून बीजेपी जिथे जिथे कमजोर राहिली आहे तिथे तिथे मुसंडी मारायचा त्यांचा प्रयत्न आहे. मोदींच्या अलीकडच्या सर्व भाषणांत याचे संकेत मिळतात. ते देशाच्या पूर्व भागात विकासाचं कमी प्रमाण वारंवार बोलून दाखवतात. बिहार, बंगाल, आसाम, ओडिशा यांच्या विकासाचे त्यांचे प्लान्स प्रत्येक भाषणात जाहीर करतात. याचं कारण बिहारमध्ये २०१५ ऑक्टोबर, बंगाल २०१६ पूर्वार्ध, आसाम २०१७ अशा निवडणुका आहेत. बिहारला दिलं जात असलेलं १ लाख कोटी रुपयांच्या विविध योजनांचं पॅकेज याचमुळे आहे. त्यामुळे मोदी सरकारची येत्या दोन वर्षांतली वाटचाल 'पूर्वेच्या' दिशेनं होत राहील असं दिल्लीत गमतीनं म्हटलं जातं.

स्वच्छ भारत, नमामि गंगे (गंगा स्वच्छता), मेक इन इंडिया, रस्ते निर्माण आणि बंदर विकासामध्ये चालवलेली भरघोस गुंतवणूक, पर्यटनाला प्रोत्साहन मिळण्यासाठी चाललेले प्रयत्न, अपारंपरिक ऊर्जेसाठी आणलेल्या योजना यामुळे मोदी सरकारबद्दल अजूनही आश्वासक वातावरण आहे. पण भाजपा आणि संघ परिवाराच्या नेत्यांची वादग्रस्त असहिष्णू वक्तव्यं, अध्यादेशानं कारभार रेटून नेण्याचा सरकारचा प्रयत्न, शेतमालाचे पडलेले भाव, महागाईची अजूनही सामान्यांना बसणारी झळ यामुळे अस्वस्थता आणि अविश्वास यांनी जागा करायला सुरुवात केलीय. एका रात्रीत या देशाचे प्रश्न सुटणार नाहीत, सरकार पाच वर्षांसाठी निवडून दिलेलं असतं, याची जाणीव सामान्य मतदारांना असते. पण त्याचवेळेला उलटणाऱ्या प्रत्येक दिवशी तो सरकारचा जमाखर्चही शांतपणे मनाच्या खातेपुस्तकात नोंदत असतो. वर्षभराच्या या कामगिरीनंतर त्याच्या त्या पुस्तकातली शिलकीची जागा मोकळी राहणार नाही याची तजवीज करणं उरलेल्या चार वर्षांत मोदी सरकारला जमेल काय?

ता.क. : भाजपाचे उत्तर प्रदेशमधल्या उन्नावचे वादग्रस्त खासदार साक्षी महाराज यांच्या गाडीवर 'नमो युग आरम्भ' असं ठळक अक्षरांत लिहिलंय. साक्षी महाराजांच्या 'प्रच्छन्न वाणी'मुळे असलं युग नको रे बाबा असं इतक्यातच जनतेला वाटू लागलंय. हा संदर्भ ध्यानात घेऊन अलीकडेच भाजपाचे एक तरुण खासदार गमतीनं म्हणाले, अगर मोदीजी ऐसे नेताओंके भरोसे युग लाने की कोशिश करेंगे तो हम जैसो को एकही गाना गाना पडेगा - मंझिले अपनी जगह...रास्ते अपनी जगह...जब कदमही साथ ना दे तो मुसाफिर क्या करे? ●

**- अमेय तिरोडकर**
आयबीएन लोकमत, नवी दिल्ली
०९८९९३९५५६१
ameytirodkar@gmail.com

**शब्दसौरभ - विद्या प्रभू** ग्रंथाली




सूर्यबिंब बचक्यात मावेल एवढं; पण त्याच्या प्रकाशाला त्रिभुवनही अपुरं पडतं. तोच अनुभव शब्दांच्याही बाबतीत. बिंदूएवढ्या शब्दात अर्थाचा सिंधू सामावलेला असू शकतो. शब्दशक्ती अगाध आहे. शब्द हसवतात, रडवतात, वर्मावर घाव घालून घायाळ करतात; कधी क्रोधाचे अंगार फुलवतात. हताश, निराश मनात प्राण फुंकणारे संजीवक शब्दही असतात. संदर्भ बदलला की शब्द एक नवाच अर्थ प्रकट करू लागतो. शब्दांचं हे लीला लाघव पाहिलं की शब्दब्रह्माची प्रचीती येऊ लागते. शब्दांनी निर्मिलेली साहित्यसृष्टी ईश्वरनिर्मित सृष्टीइतकीच सुंदर असते.

शब्दफुलांचा हा आगळा गंध वाचकांना 'शब्दसौरभ'मध्ये अनुभवता येईल आणि मनात दीर्घकाळ दरवळत राहील.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## ‘पद्मगंधा’ची नवीन दर्जेदार प्रकाशने

संगीताचार्य अल्लाउद्दिन खाँ यांची कन्या आणि शिष्या, पं. रविशंकर यांची पहिली पत्नी, सूरवाद्य प्राणवंत करणाऱ्या पहिल्या महिला कलाकार अन्नपूर्णा यांचेविषयीचे पहिले पुस्तक.




### अन्नपूर्णा


स्वपनकुमार बंद्योपाध्याय

अनुवाद : डॉ. अपर्णा झा

**मूळ किंमत** ₹ १७० । **सवलतीत** ₹ १३५

बलुतेदारांची हत्यारे, अवजारे त्यांची माहिती, अर्थ व तत्कालीन संस्कृतिसंवर्धनातील त्यांचे योगदान स्पष्ट करणारे पुस्तक

### बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे




डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर

**मूळ किंमत** ₹ २३० । **सवलतीत** ₹ १८५

मराठी दलित कवितेचा लक्ष्यवेधी अभ्यास मराठीत प्रथमच.



### दलित कवयित्रींची कविता


**स्वरूप आणि चिकित्सा**

डॉ. जया विश्वनाथ पाटील

**मूळ किंमत** ₹ १४० । **सवलतीत** ₹ ११०

मानवी संस्कृतीचा इतिहास व समाजमन जाणून घेण्यासाठी मिथककथांच्या वाचकांना व अभ्यासकांना उपयुक्त

### मागोवा मिथकांचा




सुकन्या आगाशे

**मूळ किंमत** ₹ १८० । **सवलतीत** ₹ १४५

**धगधगती आत्मचरित्रे**

**आजच्या समाजव्यवस्थेने पीडित झालेल्या तरुणाचे आत्मानुभव आणि अन्यायाविरुद्ध, व्यवस्थेविरुद्ध अविरत सुरू झालेली लढाई**

हे केवळ आत्मकथन नसून माझ्या संपूर्ण समाजाचीच ही कहाणी आहे.
- दक्षिण बजरंगे छारा



### बुधन सांगतोय


दक्षिण बजरंगे छारा

अनुवाद : वैशाली चिटणीस

**मूळ किंमत** ₹ २२० । **सवलतीत** ₹ १७५

गजाआडच्या जीवनाची सत्यकथा.
तुरुंगातील यातनामय जीवनाचे वर्णन नाही; तर न्यायासाठी दिलेली चिवट झुंज आणि माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा होणारा विजय

### कलर्स ऑफ द प्रिझन




अरुण फरेरा

अनुवाद : रूपेश पाटकर

**मूळ किंमत** ₹ १६० । **सवलतीत** ₹ १३०

**पद्मगंधा प्रकाशन** १९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com





# ग्रंथपान

## साउथ ब्लॉक दिल्ली

शिष्टाईचे अंतरंग

विजय नाईक




साऊथ ब्लॉक दिल्ली, हे दिल्लीस्थित पत्रकार श्री. विजय नाईक यांचे पुस्तक पुण्याच्या रोहन प्रकाशनने नुकतेच प्रसिद्ध केले. हे पुस्तक म्हणजे परराष्ट्रसंबंधातील दुर्मिळ माहितीचा मौल्यवान खजिनाच आहे. या पुस्तकाद्वारे परराष्ट्र व्यवहार आणि मुत्सद्देगिरीच्या विश्वाचा श्री. विजय नाईक यांनी सखोल वेध घेतलेला आहे. १९६७ सालापासून श्री. नाईक हे दिल्लीत पत्रकारिता क्षेत्रात कार्य करीत असून सकाळ वृत्तसमूहाचे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. सुरुवातीची काही वर्षे दै. गोमंतकसाठी व नंतर सकाळ वृत्तपत्रसमूहासाठी पत्रकार म्हणून त्यांनी भरीव कार्य केलेले आहे. गेली पंचेचाळीसहून अधिक वर्षे पत्रकारितेच्या क्षेत्रात वावरत असल्याने त्यांचा राजकारणाच्या सर्वच अंगांचा अभ्यास दांडगा आहे. मुत्सद्देगिरीचे व राजनीतीचे क्षेत्र त्यांनी अत्यंत जवळून न्याहाळले आहे. त्यामुळे मराठी साहित्यात आजवर कुणीही न हाताळलेला 'शिष्टाईचे अंतरंग' हा विषय त्यांनी आपल्या पुस्तकासाठी निवडला. या विषयाच्या निरनिराळ्या पैलूंचा सखोल अभ्यास करून, त्याला आपल्या अनुभवाची जोड देऊन त्यांनी ह्या पुस्तकातील आशय अत्यंत समृद्ध बनविला आहे. दिल्लीतील राष्ट्रपतीभवनापासून हाकेच्या अंतरावर असलेली 'साऊथ ब्लॉक' ही देखणी इमारत म्हणजे भारताच्या राजनैतिक घडामोडींचा केंद्रबिंदू. या पुस्तकाला दिलेले नाव अगदी समर्पक वाटते. राजनीतीचे, मुत्सद्देगिरीचे, विदेशसेवेचे क्षेत्र किती व्यापक आहे, या विषयाला जागतिक घडामोडींमध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे, या विषयाचे किती असंख्य पैलू आहेत ते या पुस्तकात श्री. विजय नाईक यांनी विषद केले आहे.

राजनीतीच्या क्षेत्रातील महत्त्वाची पदे व हुद्दे यांपासून सुरुवात करून राजदूतांच्या कामाचे स्वरूप, त्यातील ताणतणाव, गांभीर्य, राजदूतांच्या नेमणुका, वकिलातींची आवश्यकता, त्यामागचे राजकारण, त्याचे आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणारे परिणाम याचे उत्तम विश्लेषण आपल्याला या पुस्तकात वाचायला मिळते. विजय नाईक यांनी आपल्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत आंतरराष्ट्रीय घडामोडींचा बारकाईने अभ्यास केलेला आहे. ४५ राष्ट्रांना भेटी दिलेल्या आहेत. अनेक राष्ट्रप्रमुखांना तसेच राजदूतांना भेटून त्यांच्या मुलाखती घेऊन स्वानुभवाच्या निरीक्षणांना अधिक सखोलता मिळवून दिलेली आहे. यापूर्वी संबंधित विषयांवर वृत्तपत्रातून त्यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. त्यांचे वृत्तपत्रीय लेखन व या पुस्तकातील लेखन यास संदर्भमूल्य आहे. खरे तर आंतरराष्ट्रीय व्यवहार हा सामान्य माणसाला क्लिष्ट वाटणारा विषय; पण त्यांनी हा विषय साध्यासोप्या शब्दांत मांडला आहे.

या विषयावरील त्यांचे वाचनही दांडगे आहे. प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला त्यांनी प्रसिद्ध राजकारणी व्यक्तींची वचने उद्धृत केलेली आहेत. फक्त ती वाचून त्यांचे मनन केले तरी वाचकांच्या ज्ञानात मोलाची भर पडू शकते.

या पुस्तकाला साऊथ कोरिया, युक्रेन वगैरे अनेक देशांमध्ये भारताचे राजदूत म्हणून काम केलेल्या श्री. सुधीर देवरे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. श्री. सुधीर देवरे हे या विषयातील तज्ज्ञ आहेत व त्यांनी विदेशसेवेत प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतला आहे. त्यांची अभ्यासपूर्ण आणि चिंतनशील विचार मांडणारी प्रस्तावना अत्यंत वाचनीय आहे.

श्री. नाईक यांनी पुस्तकात जागोजागी त्यांच्या पत्रकारितेच्या क्षेत्रातील राजदूत व राजनीतीशी संबंधित असे खुमासदार किस्से व घटना पेरलेल्या आहेत. राजदूतांच्या देहबोलीतूनही किती नाना प्रकारचे अर्थ निघू शकतात व अर्थाचे अनर्थ होऊ शकतात ते वर्णन मनोरंजक आहे. त्यामुळे पुस्तकातील गंभीर आशयाला विनोदाची झालर मिळाली आहे. असे असले तरी विषयाचे गांभीर्य अजिबात हरवलेले नाही.

शिष्टाईच्या पंढरीचे अंतरंग वाचकांपुढे उलगडून दाखवताना या विश्वाची भौगोलिक ओळख करून देण्यासाठी साऊथ ब्लॉक, चाणक्यपुरी, शांतिपथ, तेथील विविध दूतावास, निरनिराळ्या परराष्ट्र सेवा, संस्था यांची तपशीलवार माहिती पुरवली आहे. तसेच परदेशी पत्रकार, भारताची परराष्ट्र धोरणे त्यावरील प्रभाव, चढउतार, निरनिराळी आव्हाने, यशापयश यांचेही बारकाईने वर्णन केलेले आहे. आर्थिक, सांस्कृतिक, जनसंपर्क, क्रीडा, वैद्यकीय अशा शिष्टाईच्या नाना प्रकारांची ओळख या पुस्तकाद्वारे आपल्याला होते.

राजदूतांच्या बोलक्या अनुभवांचे वर्णन करताना विजय नाईक यांनी अनेक राजदूतांच्या तसेच त्यांच्या पत्नींच्याही मुलाखती घेतल्या. बाहेरून अत्यंत आकर्षक व दिमाखदार वाटणाऱ्या विश्वातील आव्हानांची देखील मांडणी केलेली आहे.

हेरगिरी, राजनैतिक प्रवक्ते, दुभाषे यांचीही महत्त्वपूर्ण जबाबदारी विषद करून लेखकाने वाचकांना मुत्सद्देगिरीच्या विश्वाचा सर्वांगांनी परिचय घडवला आहे. अनुभव, माहिती व व्यासंगाने हे पुस्तक आशयसमृद्ध बनले असून, वाचकांना आगळ्या वेगळ्या विश्वाची सफर घडवून आणते. हे पुस्तक सर्वांनी वाचावे असे आहे. विशेषकरून युवा पिढीला यातून एका नव्या विश्वाचा उलगडा होईल. यातून विदेशसेवेत जाण्याची अनेकांना प्रेरणा मिळेल.

इतक्या वेगळ्या विषयावरील पुस्तक रसिक वाचकांसाठी प्रस्तुत केल्याबद्दल लेखक पत्रकार श्री. विजय नाईक यांचे व उत्तम निर्मिती मूल्याबद्दल प्रकाशक श्री. चंपानेरकर यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

**सौ. ज्योती दाते**

मैफल, ४ सहवास सोसा., कर्वेनगर, पुणे-४११५०२

भ्रमणध्वनी : ९४२३५७७६८१

**रोहन प्रकाशन**

**पृष्ठे ३५९ • मूल्य : ३०० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २५० रु.**

मौज प्रकाशन

# ग्रंथपान

आपल्या मध्यमवर्गीय चाकोरीच्या बाहेर जाऊन आसपासचं उपेक्षितांचं जग आणि जगणं ह्यांचा वेध घेणारे संवेदनक्षम व सजग लेखक ही अनिल अवचटांची पहिली ओळख! त्यानंतर व्यसनमुक्तीसाठी 'मुक्तांगण'च्या रूपानं त्यांच्यातल्या सहृदयतेशी आणि क्रियाशीलतेशी मराठी वाचकांचा परिचय होत गेला. अलीकडं 'सृष्टीत-गोष्टीत' ह्या त्यांच्या पुस्तकातून त्यांचं निसर्ग-कुतुहल आणि सोपेपणानं निसर्ग-रहस्यांची उकल करण्याची हातोटी ठळकपणे समोर आली. ह्याचंच पुढचं पाऊल म्हणजे नुकतंच प्रकाशित झालेलं त्यांचं 'बहर शिशिराचा - अमेरिकेतील फॉल सीझन' हे पुस्तक होय.




भारतात वा उष्ण कटिबंधातही शिशिरात वनस्पतींची पानं गळतात, पण ती पिवळी होऊन! अमेरिकेतल्या शीत हवामानात मात्र झाडांची पानं लाल, पिवळी, नारिंगी, क्वचित गुलाबी आणि जांभळटही होतात आणि मग त्यांची गळती सुरू होते. निसर्गातले हे रंगांचे विभ्रम पाहणं किती आश्चर्यकारक, गंमतीचं आणि आनंददायी असतं; ह्याचा साक्षात प्रत्यय ह्या पुस्तकातली छायाचित्रं देतात. अवचटांच्या ह्या तिसऱ्या डोळ्याच्या- कॅमेऱ्याच्या- करामतीमागं त्यांच्यातला सदैव जागा असलेला चित्रकार असल्यामुळं ही चित्रं म्हणजे जणू शब्दकाव्यंच बनून येतात. ह्या चित्रांना तितकीच समर्थ साथ दिलीय्, ती अवचटांच्या संवादी शैलीतल्या निवेदनानं!

कुठलाही अभिनिवेश न ठेवता, सहजपणे मित्रांच्या कोंडाळ्यात बसून गप्पा माराव्यात, अश्या भाषेत ते लिहितात. सृष्टीच्या ह्या रंगरहस्याचं गुपित त्यांनी ज्या गुरूंकडून उलगडून घेतलं, ते वनस्पतिशास्त्राचे तज्ज्ञ श्री.दा. महाजन उर्फ बापू आणि भूशास्त्राचे जाणकार करमरकर सर ह्यांची व्यक्तिचित्रंही त्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणातून वाचकांपुढं अंशत: उभी राहतात. सहजसुंदर आणि सोप्या शैलीत ह्या स्पष्टीकरणांची मांडणी करण्याचं कसब मात्र खास अवचटांची ओळख पटवतं.

अमेरिकेतल्या ह्यावेळच्या वास्तव्यात फॉल सीझनबरोबरच अवचटांच्या सुहृदांनी त्यांना; सॅनफ्रान्सिस्कोचा समुद्र, तिथले खडक आणि बोगदा, विस्मयचकित करणारे सेडोनाचे डोंगर, तिथल्या सँडस्टोनची आनि लाइमस्टोनची नैसर्गिक कलाकारी, वेगळ्या कोनातून घेतलेलं ग्रँड कॅनियनचं दर्शन, लेचवर्थच्या दरीतली अद्‌भुत दुनिया, डॉरसेटच्या टेहेळणी कट्ट्या (वॉचटॉवर)वरून घेतलेलं जंगलाचं अप्रतिम विहंगम दर्शन, जंगलातल्या नितळ पाण्याच्या नदीतून वल्ह्यांनी हाकारलेल्या नावेतला शांततापूर्ण प्रवास असा स्वर्गसुख व आंतरिक समाधान देणारा जो अनुभव दिला, अवचटांनी उदार मनानं तो वाचकांपर्यंत पोचवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

पुस्तकातल्या शेवटच्या 'आणि इतर' व 'हृद्य क्षण'मध्ये वाचकांना ह्या भटकंतीतली आणखी काही दुर्मिळ दृश्यं व घटना कल्पक छायाचित्रांतून अक्षरश: भेटतात. एकंदरीत ह्या पुस्तकातून वाचकांना अवचटांमधला निसर्गसंवाद साधणारा, निसर्गतद्रूप झालेला, माणुसकीचे क्षण अचूक टिपणारा, कलासक्त सच्चा माणूस भेटतो.

पुस्तकात ५०हून अधिक छायाचित्रं असून त्यातलं वैविध्य लक्षणीय आहे. आर्टपेपरवरची दर्जेदार छपाई पुस्तकाचं मूल्य द्विगुणित करते.

कुटुंबातल्या सर्व वयोगटाच्या व्यक्तींना (अगदी छोट्या मुलांनाही ह्यातली चित्रं नक्कीच आवडतील) आवडेल असं हे पुस्तक आहे. म्हणूनच जाणकार रसिकांच्या संग्रही ते असायलाच हवं.

**मौज प्रकाशन**
**मूल्य ३०० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २५० रु.**


पद्मगंधा प्रकाशन

# ग्रंथपान

अरुण फरेरांनी स्वच्छ दृष्टीनं आणि तटस्थपणे तुरुंगवासातला छळ, खोटे आरोप ठेवून वर्षानुवर्षं तुरुंगात खितपत ठेवणं, कायद्याचं राज्य या नावाखाली संपूर्ण प्रक्रियेचं बेदरकारपणे उल्लंघन करणं याची हकीगत सांगितलेली आहे. आपल्या देशातल्या हजारो-लाखो लोकांचा, स्त्रियांचा, विशेषत: ज्यांच्याकडे वकील किंवा कायदेशीर साहाय्य मिळवण्यासाठीची साधनं नसतात; त्या सर्वांचा हा अनुभव आहे. या देशाला आणखी अशा पुस्तकांची गरज आहे.

– अरुंधती रॉय

**कलर्स ऑफ द प्रिझन**
गजाआडच्या जगाची सत्यकथा
मूळ लेखक : अरुण फरेरा
अनुवाद : रूपेश पाटकर




माओवादी चळवळीतील कार्यकर्ता म्हणून श्री. अरुण फरेरा कार्यरत असतानाच एके दिवशी नागपूर पोलीस त्याला अटक करतात. खरतनाक नक्षलवादी ठरवून त्याची रवानगी खाजगी तुरुंगात केली जाते आणि पुढे सुरू होतो अरुण फरेरा यांच्या जीवनाचा संघर्ष. अंधार आणि प्रकाश, जीवन आणि मृत्यू यांच्या सीमारषेवरचे जीवन फरेरा यांच्या वाट्याला येते. त्याची ही कथा.

मानवी हक्कांसाठी लढणाऱ्या अरुण फरेरा या कार्यकर्त्यास नक्षलवादी असल्याच्या आरोपावरून नागपूर पोलीस मे २००७ मध्ये अटक करतात. पुढच्या काही महिन्यांत गुन्हेगारी कटकारस्थान, खून, हत्यारे बाळगणे, दंगल माजविणे असे अनेक गंभीर गुन्हे त्याच्यावर दाखल केले जातात आणि महाराष्ट्रातील कुख्यात नागपूर मध्यवर्ती कारागृहात त्याला खितपत ठेवले जाते.

फरेरांच्या जवळपास पाच वर्षांच्या तुरुंगवासाची ही कहाणी आहे. हे वाचताना एका यातनाघराचा भयंकर तपशील आपल्या हाती लागतो. सतत होणारा छळ, मारहाण, अत्यंत भ्रष्ट व्यवस्था, कैद्यांचे परस्परांशी वागण्याचे संकेत, पाशवी अत्याचाराविरोधात कैद्यांनी पुकारलेले संप, तुरुंगाच्या संपूर्ण वातावरणात भरून असलेली असहाय्यता आणि थोडीफार आशा पल्लवीत करणारा, कधीतरी मिळणारा दिलासा या वास्तवाशी वाचकाचा सामना होतो.

सप्टेंबर २०११ मध्ये फरेरांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता होते. मात्र स्वातंत्र्यापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या फरेरांना सुटल्याबरोबर कारागृहाच्या गेटवरच साध्या वेशातील पोलीस पुन्हा अटक करतात. त्यांची वाट पाहत कारागृहाच्या गेटजवळ उभ्या असलेल्या आपल्या कुटुंबीयांनाही ते पाहू शकत नाहीत आणि पुन्हा सुरू होतो त्यांचा व्यवस्थेशी संघर्ष. ज्या बनावट आरोपांमुळे त्यांना बंदिवास भोगावा लागतो, त्यातून ते त्यांच्या धाडसी मित्र आणि कार्यकर्त्यांच्या मदतीने बाहेर पडतात.

'कलर्स ऑफ द प्रिझन' ही गजाआडच्या जीवनाची सत्यकथा आहे. मात्र ही कथा वाचकांना परिचित असलेल्या फिल्मी किंवा कल्पनारम्य कादंबऱ्यांसारखी नाही. तुरुंगातील यातनामय जीवनाचे केवळ हे वर्णन नाही तर न्यायासाठी दिलेली चिवट झुंज आणि माणसाच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा अंतिमत: होणारा विजय याची ही गोष्ट आहे.

हे तुरुंगातील दिवस म्हणजे काय असतात, हे वाचकांना समजावून सांगतानाच तुरुंगात मानवी हक्कांची पायमल्ली कशी होते, ते स्पष्ट होत जाते. फरेरा यांना तुरुंगातील सर्व भयानक भागात ठेवले होते. अंडा सेल, फासी यार्ड, गुनाहखाना, लाल गेट असे शब्द आपण वर्तमानपत्रांतील बातम्यांत अनेक वेळा वाचतो, पण प्रत्यक्षात तेथे कैदी कोणत्या अनुभवांना सामोरे जातात हे आपणास फारसे माहीत नसते. फरेरा यांनी तुरुंगातील अशा भयकारक ठिकाणांचा अनुभव घेतला आहे.

फरेरा यांनी तुरुंगात पुस्तकांशी आणि चित्रांशी केलेली मैत्री, पुस्तकातून व्यक्त होते. आतील व मुखपृष्ठावरील चित्र फरेरा यांचेच आहे. अशा संवेदनशील माणसाच्या आयुष्यातील काळ्या दिवसांचे हे आत्मकथन वाचकांना अंतर्मुख करते.


अरुण फरेरा हे मूळचे मुंबईकर, उत्तम मराठी जाणणारे, परंतु त्यांनी आपली ही आत्मकथा प्रथम इंग्रजीतून लिहिली. सामाजिक कार्यकर्ते डॉ. रूपेश पाटकर यांनी तिचा उत्तम अनुवाद केला आहे.

अपरिचित अशा जगाचा, भीषण वास्तवाचा, मानवी हक्कांची कुचंबणा करणारा हा अनुभव थरारक आहे.

**पद्मगंधा प्रकाशन**
**पृष्ठे १६४ • मूल्य १६० रुपये 'ग्रंथाली' येथे सवलतीत १२० रु.**

दिवस ढकलत जगण्यापेक्षा

# दिवस समजून जगा...




सर्व धार्मिक व पुस्तक दुकानात उपलब्ध

## मराठी महिन्यांनुसार असलेली एकमेव दिनदर्शिका

रसिक साहित्य प्रा. लि.

कोणत्याही पुस्तकासाठी संपर्क 'साधा'

प्रमुख विक्रेते : रसिक साहित्य प्रा.लि. अप्पा बळवंत चौक, पुणे २.

☎ : ०२०२४४५११२९

*ONLINE PURCHASE :* www.erasik.com

### हेमन्त टकले यांच्या 'थोडी ओली पाने' पुस्तकाचे शानदार प्रकाशन

# समाजाविषयी आस्था आणि सुसंवाद साधण्याची शैली हे सकस लेखनाचे वैशिष्ट्य

## – शरद पवार

नाशिक (प्रतिनिधी) : जुन्या आठवणी, प्रसंग आणि वास्तूंच्या आठवणी यांचा मनोज्ञ संगम 'थोडी ओली पाने' या ललितलेख संग्रहात असून हेमन्त टकलेंना असलेली समाजाविषयी आस्था आणि सुसंवाद साधण्याची शैली यातूनच ते लेखन वाचकांना भिडते. अफलातून विषय आणि दैनंदिन जीवनातले अनुभव यांचे मिश्रण यात ठासून भरलेले आहे, असे प्रतिपादन हेमन्त टकले यांच्या 'थोडी ओली पाने' पुस्तक प्रकाशन समारंभाप्रसंगी मा.खा. शरद पवार यांनी केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान; मुंबई, विभागीय केंद्र नाशिक, कुसुमाग्रज प्रतिष्ठान; नाशिक, लोकहितवादी मंडळ; नाशिक, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद; नाशिक शाखा, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड (नॅब) युनिट महाराष्ट्र, नॅब डॉ. एम.एस. मोडक रिसर्च ॲन्ड रिहॅबिलिटेशन सेंटर, नाशिक, विश्वास को–ऑप. बँक लि., नाशिक व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे सदर समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

मा.खा. पवार पुढे म्हणाले की, आठवणींचा वेध घेतानाच कुसुमाग्रजांचा सहवास त्यांची प्रेरणा आहे. त्यातून असेच सकस लेखन त्यांच्या हातून भविष्यात होईल. त्यांनी आपल्यासमोर नैवेद्य ठेवला आहे. यापुढे भरगच्च लेखनाचे भांडे त्यांनी समोर ठेवावे, असेही शरद पवार म्हणाले, त्याचे मराठीचे अभिरुचीसंपन्न वाचक स्वागत करेल. यावेळी त्यांनी पुस्तकातील निवडक लेखांचा वेध घेतला.



मधु मंगेश कर्णिक म्हणाले की, हेमन्त टकले यांनी राजकारणात राहूनही संवेदनशील मन जपले आहे. जे कवितेत मावत नाही ते ललितलेखनात त्यांनी छान पकडले आहे. इरावती कर्वे, दुर्गा भागवत यांच्या परंपरेशी नाते सांगणारे हे लेखन आहे. यशवंतराव चव्हाण यांनी वाचन, चिंतनातून अस्सल साहित्य निर्माण केले. तीच विचारधारा टकलेंच्या लेखनात आहे.

डॉ. जब्बार पटेल म्हणाले की, 'थोडी ओली पाने' पुस्तकात काव्यमय शैली, विषयांचे वेगळेपणे, मनस्वीपणे प्रत्येक क्षण अनुभवल्याचा आनंदाविष्कार सामावला आहे. भूतकालीन घटनांची अत्यंत सूत्रबद्ध मांडणी हे या लेखनाचे वेगळेपण आहे. राजकीय, सामाजिक विश्लेषणाबरोबरच जगणे व वास्तवाचे प्रतिबिंब यात त्यांनी सुंदर मांडले आहे.

प्रास्ताविक व आभार व्यक्त करताना विश्वास ठाकूर म्हणाले की, हेमन्त टकले यांनी 'थोडी ओली पाने' पुस्तक प्रकाशनासाठी दिलेली संमती आपल्या सर्वांसाठी आनंद सोहळाच आहे. चांगल्या लेखकाचे चांगले लेखन वाचकांपर्यंत नेण्यासाठीचा हा सोहळा आहे. यात आपण सहभागी झालात हे टकले यांच्या लेखनप्रवासाला बळ देणारे आहे.

यावेळी आ. हेमन्त टकले यांच्या कार्यावर आधारीत १५ मिनिटांची चित्रफीत दाखवण्यात आली. त्यानंतर संजीव लाटकर यांनी आ. हेमन्त टकले यांची मुलाखत घेतली. त्यांनी यावेळी सांगितले की, कवी कुसुमाग्रजांचा सहवास, सोबतीला कलंदरी वृत्ती आणि माणसे वाचण्याचा स्वभाव यातून लेखनाची प्रेरणा मिळत गेली व त्यातून जीवनाच्या घडण्याची प्रक्रिया सुरू झाली. जाणिवांचे प्रदेश विकसित होत गेले, माणसांतला प्रामाणिकपणा शोधण्याच्या प्रयत्नातून माझ्यातला 'माणूस' चौफेर होत गेला, असा आपला प्रवास हेमन्त टकले यांनी मुलाखतीतून उलगडला. अंधबांधवांसाठी काम करत असताना त्यांच्यातील दुःखाच्या हृदयद्रावक अनुभवातूनच अंधबांधवांसाठी काम करण्याची सुरुवात झाली. अपार करुणेचा अनुभवही यातून मला मिळाला, असेही टकले म्हणाले. रोजच्या अनुभवातून मनावर चित्र तयार होते आणि नकळत लेखनात चित्रमयता येत गेली. वास्तवातला आक्रोश लेखनातून आविष्कृत होत गेला. कुसुमाग्रजांच्या सहवासामुळे अनेक साहित्यिकांशी परिचय झाला.

नाट्य, चित्रपट क्षेत्रातील दिग्गज व्यक्तींचा सहवास कलाक्षेत्रातील वाटचालीला दिशा देणारा ठरला, असेही टकले म्हणाले. आपल्याला मिळालेले आयुष्य हे समाजप्रती ऋण व्यक्त करण्यासाठीही आहे, याची जाणीवही प्रत्येकाने जोपासावी, असेही ते म्हणाले. यावेळी टकले यांनी 'थोडी ओली पाने' पुस्तकातील निवडक भागांचे वाचन केले. त्याला उपस्थितांनी दाद दिली.

कार्यक्रमाची सुरुवात सई आपटे आणि साथीदारांनी 'आजि सोनियाचा दिनु' या अभंगाने केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनायकदादा पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी आ. सुनील तटकरे, आ. छगन भुजबळ, आ.जयंत पाटील (शेकाप), विजयश्री चुंभळे, आ.जयवंत जाधव, आ.प्रा. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, पद्मभूषण देशपांडे तसेच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा अशा क्षेत्रांतील मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. ●

## 'दगड मारून आणि खूनखराबा करून नव्हे, तर विचारांनीच परिवर्तन होते'

# गृहराज्यमंत्री प्रा. राम शिंदे यांचे उद्‌गार

दगड मारून आणि आततायीपणे खूनखराबा करून नव्हे, तर विचारांच्या आणि लेखणीच्या साहाय्यानेच समाजात अपेक्षित परिवर्तन करता येते, असे उद्‌गार महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री प्रा. राम शिंदे यांनी काढले. प्रा. किसन चव्हाण यांनी लिहिलेल्या 'आंदकोळ' या आत्मकथनाचे प्रकाशन अहमदनगर येथील यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात तुडुंब गर्दीत झाले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी माजी खासदार यशवंतराव गडाख, माजी आमदार पद्मश्री लक्ष्मण माने, कवी लहु कानडे, साहित्यिक संदीप जावळे, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

वंजारी समाजातील एका स्त्रीने पारधी समाजातील पुरुषाशी लग्न केल्यानंतर त्या दोघांना आणि त्यांच्या मुलांना जो विलक्षण जीवनसंघर्ष करावा लागला त्याचे हृदयस्पर्शी शैलीतले चित्रण या पुस्तकात शब्दांकित झाले आहे. जातपंचायतींनी विरोध केलेला असताना आणि एकूणच परिस्थिती अतिशय प्रतिकूल असतानादेखील या दोघांनी अत्यंत नेटाने आणि धीराने आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिले, हे अनुकरणीय आणि आदर्श आहे. अशा प्रकारच्या प्रगतीला अडथळा ठरणाऱ्या जातपंचायतींविरोधात सरकार कडक धोरणे आखत असून जातिव्यवस्थेला खतपाणी घालणाऱ्या सर्व प्रतिगामी यंत्रणा नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असेही राम शिंदे यावेळी म्हणाले.



सभेच्या सुरुवातीला बोलताना यशवंतराव गडाख यांनी गृहराज्यमंत्री राम शिंदे यांना हे पुस्तक पोलिसांना द्यायला सांगा असे म्हटले होते. व्यस्त वेळापत्रकामुळे राम शिंदे कार्यक्रमाला उशिरा येणार होते आणि गडाख यांना या पुस्तकाच्या प्रकाशनाला उपस्थित राहून आणखी एका कार्यक्रमाला जायचे होते. त्यामुळे गडाख आपले भाषण करून निघून गेले. दरम्यान राम शिंदे यांचे आगमन झाले. त्यानंतर पुस्तकाचे लेखक प्रा. किसन चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करताना गडाख यांचा हा निरोप राम शिंदे यांना ऐकवला. त्यावर बोलताना शिंदे यांनी या सूचनेचे स्वागत केले. पोलीस डिपार्टमेंटला आंदकोळ हे पुस्तक देण्याची व्यवस्था आम्ही करू, जेणेकरून पारधी समाजाकडे पाहण्याचा पोलिसांचा दृष्टिकोन बदलून तो सकारात्मक आणि मानवी होईल, असा आश्वासक सूर त्यांनी छेडला.

यशवंतराव गडाख यांनी या पुस्तकाच्या अनुषंगाने सुंदर भाषण केले. ते म्हणाले, मी हे पुस्तक हाती घेतले आणि संपूर्ण वाचूनच थांबलो. समाजातल्या प्रत्येक संवेदनशील माणसाने आणि विशेषत: पोलिसांनी हे पुस्तक वाचलेच पाहिजे, इतके ते चांगले आहे, अशी शिफारस त्यांनी करून म्हणाले, की पोलिसांना आणि पोलीस अधिकाऱ्यांना हे पुस्तक वाचायला द्या म्हणजे त्यांना पारध्यांच्या काय वेदना आहेत हे समजेल. गृहराज्यमंत्री आले की माझा हा निरोप त्यांना जरूर कळवा.

पद्मश्री लक्ष्मण माने यांनी आपल्या भाषणात अतिशय प्रगल्भ मांडणी केली. जातिव्यवस्थेविरोधात आम्ही गेली चाळीस वर्षे लढतो आहोत. त्याला आता कुठे हळूहळू यश येऊ लागले आहे. परंतु जातिअंत लवकरात लवकर घडवून आणायचा असेल तर या कार्यात उच्चवर्णीय समाजाने जाणीवपूर्वक पुढाकार घेतला पाहिजे. तसे झाले तरच जातिव्यवस्था खऱ्या अर्थाने संपुष्टात येऊ शकेल. आपल्या भाषणातून माने यांनी सरकारकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांचे मारेकरी कसे काय सापडत नाहीत, असा सवाल त्यांनी मंत्रिमहोदयांना विचारला. या दोघांची कुणाशीही व्यक्तिगत दुश्मनी नव्हती. हे दोघे आयुष्यभर एक साधा अपशब्दसुद्धा कुणाला बोलले नाहीत. अशा सज्जन माणसांची दिवसाढवळ्या हत्या होतेच कशी? ते सातत्याने एका समाजविघातक प्रतिगामी विचारसरणीशी संघर्ष करत होते. त्यामुळे त्या विचारसरणीत त्यांच्या हत्येचे धागेदोरे लपलेले असण्याची दाट शक्यता आहे. सरकारने त्या दिशेने तपासाचा रोख वळवावा, असा सल्ला त्यांनी दिला.

ज्येष्ठ कवी लहु कानडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना किसन चव्हाणांच्या या पुस्तकाला हार्दिक शुभेच्छा दिल्या. 'आंदकोळ' हे आत्मकथन विलक्षण अस्वस्थ करणारे तर आहेच, परंतु ते माणसाच्या ध्येयवादाचे आणि विजयाचे आदर्श असे उदाहरणही आहे, असे उद्‌गार त्यांनी काढले. त्यांनी किसन चव्हाण यांच्या आई आणि पत्नी यांना सन्मानाने मंचावर बोलावून त्यांचा सत्कार घडवून आणला.

साहित्यिक संदीप जावळे यांनी आपल्या भाषणात 'आंदकोळ' हे किसन चव्हाण यांचे ओपन बुक असल्याचे सांगितले. कितीही दु:ख-दारिद्र्य वाट्याला आले तरी रडत न बसता त्यावर फुले-आंबेडकरी विचारांनी निर्धारपूर्वक मात करणे, मेंदूत वळवळणाऱ्या जातीच्या मानसिकतेला कायमची तिलांजली देणे आणि आपली खरी संस्कृती कोणती याचा शोध घेऊन ती संस्कृती स्वीकारणे, हे तीन धडे या पुस्तकातून प्रत्येकाने घेतले पाहिजेत,

असे प्रतिपादन त्यांनी केले.

याप्रसंगी 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर खास उपस्थित होते. आपल्या छोटेखानी भावपूर्ण भाषणात ते म्हणाले, नगरच्या दया पवारांच्या 'बलुतं'ला लाभले तसे आता पुन्हा एकदा नगरच्याच किसन चव्हाणांच्या 'आंदकोळ' या पुस्तकाला सुप्रसिद्ध चित्रकार षांताराम पवार यांचे मुखपृष्ठ लाभले असून हा योगायोग निव्वळ विलक्षण आहे. किसन चव्हाण हा लेखक अत्यंत ताकदीचा असून 'ग्रंथाली'ला हे पुस्तक काढण्यात खूप आनंद होत आहे. या पुस्तकाचे भरभरून स्वागत होईल, याची खात्री वाटते.

'आंदकोळ'चे लेखक प्रा. किसन चव्हाण यांनी नेहमीच्या तडाखेबंद शैलीत आपले मनोगत व्यक्त केले. आंदकोळ म्हणजे वादळ! न थांबणारं, न थकणारं वादळ! आमचं आयुष्य हेही एक न थकणारं वादळच होतं! माझी आई आणि वडील यांनी वादळाप्रमाणे आपली आयुष्ये जगली. आम्हालाही वादळाप्रमाणेच जगायला आणि लढायला शिकवले. त्यातून आम्ही घडलो. माझ्या आणि माझ्या भावंडांच्या हातात त्यांनी भिकेचा कटोरा दिला नाही, तर पाटी-पेन्सिल दिली आणि हीच आमच्या आयुष्यातली क्रांती ठरली. बुद्ध, फुले, शिवराय, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही आता आमची प्रेरणास्थाने झाली आहेत. जीवन जगावे कसे? आता आम्ही रडत-रडत आणि कुढत-कुढत जगणार नाही, तर लढत-लढत जगणार आहोत! आत्मकथन लिहिणे ही माझी नसून चळवळीची गरज होती. हे पुस्तक आता आमच्या चळवळीचे हत्यार झाल्याशिवाय राहणार नाही.


कवी संदीप काळे आणि संजय चव्हाण यांनी या सोहळ्याचे काव्यमय शैलीत बहारदार सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक स्वरूपचंद गायकवाड यांनी केले. रावसाहेव जाधव यांनी आभार मानले. पुस्तक प्रकाशनापूर्वीच्या सत्रात गायकांनी-शाहिरांनी परिवर्तनवादी गीतांचा सुरिला नजराणा पेश करून कार्यक्रम वेगळ्या उंचीवर नेला. ●

### कुमार केतकर यांचे मत : विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज

# मादाम क्युरीचे जीवनकार्य प्रेरणादायी

विज्ञानाच्या बाबतीत जितकी प्रगती झालेली आहे. तितकीच उदासीनतासुद्धा दिसून आली आहे. त्यामुळे विज्ञानाकडे बघण्याचा दृष्टिकोन आता बदलायची गरज आहे. जगामधील विज्ञानातील रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र या दोन्ही विषयांत नोबेल मिळविणाऱ्या मादाम क्युरीचे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी मुंबई व्यक्त केले.

दादरच्या शिवाजी पार्क येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक समिती सभागृहात 'ग्रंथाली' प्रकाशनतर्फे मादाम क्युरी या मूळ इंग्रजी ग्रंथाचे अश्विनी भिडे-देशपांडे यांनी मराठी अनुवादित केलेल्या पुस्तक प्रकाशन समारंभप्रसंगी ते बोलत होते.




**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**

मादाम क्युरी यांनी केलेल्या कार्याची आजच्या पिढीने दखल घेऊन वाटचाल केल्यास जीवनात नक्कीच यश मिळवता येईल. अगदी खडतर आयुष्य जगून जगासाठी नवनवीन संयुगांचा शोध लावण्यासाठी मादाम क्युरी व त्यांचे पती पेरी क्युरी यांनी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. आतापर्यंत दोन नोबेल मिळविण्याचा मान त्यांच्याच नावे आहे. जगामध्ये कार्य करणाऱ्या महान शास्त्रज्ञांची प्रेरणा घेण्यात आजची पिढी कमी पडत आहे. संगणक, मोबाइल फोन यावर ही पिढी नको तितका वेळ घालवते, मात्र या तंत्रज्ञानाविषयी जाणून घेण्याची गरज त्यांना वाटत नसल्याने देशाचा फायदा होती का? हे समजण्याच्या पलीकडचे असल्याची खंतही केतकर यांनी व्यक्त केली.

यावेळी अच्युत गोडबोले, उषा मेहता, कविता रेगे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

तत्पूर्वी या पुस्तकातील काही महत्त्वाचा भाग अभिनयासह संदेश आणि अमृता यांनी प्रेक्षकांसमोर वाचून दाखविला. भावनेने ओतप्रोत भरलेल्या या सादरीकरणामुळे प्रेक्षकांनी त्याला भरभरून दाद दिली.


**('लोकमत'कडून साभार)**

॥ग्रंथाली॥

दैवी प्रतिभेचा कलावंत


## मायकेलअँजेलो

**डॉ. माधवी मेहेंदळे**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

शिल्पकला, चित्रकला, तत्त्वज्ञान, काव्य, स्थापत्य या सर्व कलांमध्ये पराकोटीची अभिव्यक्ती आणि नैपुण्य असलेला हा महमानव वयाच्या पंधराव्या वर्षापासून नव्वदाव्या वर्षापर्यंत अखंड निर्मिती करत होता. त्याची बॅकस, पिएता, डेव्हिड, मोझेस ही शिल्पं सौंदर्याची, अचूकतेची परिमाणं मानली गेली आहेत. त्याला पेंटिंगमध्ये रुची नव्हती; तरीही 'सिस्टाईन चॅपेल'सारखी चित्रकलेच्या इतिहासातील कलाटणी देणाऱ्या १२००० चौरस फूट एवढ्या प्रचंड व्याप्तीच्या चित्रकृतीची निर्मिती त्याच्या हातून झाली. त्याच्या 'लास्ट जजमेंट'सारख्या अजरामर कलाकृतीनं चित्रकलेला रिॲलिझमकडून मॅनेरिझमच्या दारात पोचवलं. त्याच्या त्या उत्कट चित्रप्रवासाचा व शिल्पप्रवासाचा आस्वादक आढावा या पुस्तकात घेतला आहे. प्रत्येक निर्मितीमागची त्याची भूमिका, त्याची विचारप्रक्रिया समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे.




## आटपाटनगरीच्या कथा

**डॉ. द.ता. भोसले**

**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

या कथा म्हणजे लोककथांचे तंत्र वापरून, ती आविष्कार पद्धती स्वीकारून, आजचे प्रश्न, आजचे समाजमन, समाजाची आजची स्थितीगती, जीवनमूल्यांचा त्यांचा अग्रक्रम आणि मानवी स्वभावाची गूढ आणि व्यामिश्र गती-विकृती साकार करणारी निर्मिती आहे.

या आटपाटनगरीच्या कथा जेव्हा विविध मासिकांच्या दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झाल्या; तेव्हा त्यांची कथनपद्धती, त्यातले नावीन्य आणि त्या कथांतून झालेले जीवनभाष्य व त्यातील मौलिकता अनेक वाचकांना मनापासून भावली होती.

काही जाणकारांनी या कथांचा संग्रह प्रसिद्ध करावा, असा सातत्याने आग्रह केला होता.

या आटपाटनगरीतील सारे प्रजानन आणि त्यांची सुखदुःखे मराठी वाचकांना उच्च दर्जाचा आनंद देतील...

KISAN KR RAMCHANDRA

# Kisan Ramchandra

AUCTIONEERS PVT. LTD.

TEL (O) : 26360356, 26361357 FAX : (020) 26361359 GRAMS : 'AUCTIONEER'
E-mail : krapl@pn2.vsnl.net.in Website : www.krauctioneers.in

**I. COMPANY PROFILE**

To Introduce our's is an enterprise engaged in the 'Auctioneering Activiteis' with proven experience of more than a decade and history of being an accociate of Centurion firm of Auctioneers. Under the flag of 'KISAN RAMCHANDRA' we have,

1. Team of dedicated professionals including engineers, Managers and Technical/Commercial staff who understand language and needs of sellers and bidders (buyers).
2. Network of offices and representatives in Pune, Mumbai, Banglore, Nagpur and other places.

**II. MAXIMIZING RETURNS**

As appraised at point no. (1) above, we can act as 'Contributors' to you by way of recognizing real value of your scrap / assests and ensuring maximum returns on the sale through Action Sale.

Considering gainful experiecne in this specialized field of 'Auctioneering' and infrastructure available with us, we are keen in offering our services on All India Basis to you and enter into an annual contract if necessary.



**कथा युगभानाची –**
अरुण साधू यांच्या निवडक कथा
संपदान : मीना गोखले
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.



**बॉम्बे स्कूल : आठवणीतले, अनुभवलेले**
सुहास बहुळकर
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.



**काळा तुकतुकीत उजेड**
किशोर पाठक
मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.



**थांबवू शकत नाही कविता लिहिणं**
सायनम मार्टिन
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



**भाषाग्रहण आणिभाषाशिक्षण**
रमेश पानसे
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



**दीपदान**
चंद्रशेखर सानेकर
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



**चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी**
प्रकाश चांदे
मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.



**वांझुठाव**
भाऊ गावंडे
मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.



**आनंदनक्षत्र**
प्रल्हाद जाधव
मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.



**लांबा उगवे आगरीं**
म.सु. पाटील
मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु.




**अमीरबाई कर्नाटकी**
प्रशांत कुलकर्णी
मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.




**चाला, पळा, धावा**
डॉ. पी.एस. रामाणी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



**माझे अंतरंग**
डॉ. दाऊद दळवी
मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.



**भारतातील मुस्लिम स्थापत्यकला**
डॉ. दाऊद दळवी
मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.



**नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४**
नंदिनी/सुधीर थत्ते
मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.

नाशिक, सोलापूर आणि मुंबई येथे ग्रंथाली वाचकदिनी
प्रकाशित झालेल्या १५ पुस्तकांचा संच
मूळ किंमत ४१०० रु. सवलतीत २५०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १५० रुपये




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**




'संकल्प' हे संजीव खांडेकरांनी संपादन केलेले पुस्तक वाचनात आले ते बऱ्याच उशिरा. मूळचा प्रकाशनाचा काळ आहे आहे १९८२ सालचा. मी वाचन केले ते २०१४ च्या उत्तरार्धात. मध्ये बराच मोठा बदलाचा प्रवाह काळाचा पुलाखालून वाहून गेला आहे. काही संदर्भ बदलले, काही नव्याने तयार झालेत. लेखनकर्त्यांना पुन्हा आपल्या या लेखनाकडे वळून पाहता येईल. कदाचित त्यांनाच त्या काळच्या परिस्थितीच्या जाणिवा नव्याने अनुभवास येतील. आजच्या वर्तमानाच्या सहाणेवर घासून पाहण्याची संधीही त्यांना मिळू शकेल. परंतु वाचक म्हणून म्हणून मी या लेखांकडे पाहतो तेव्हा जाणवते, वाचनात राहिलेली ही उणीव मोठी आहे. पोकळीचे वास्तव मान्य करायला लावणारी आहे. 'युक्रांद' हे नाव त्याकाळी कानावर होते, त्यांच्या चळवळींच्या बातम्याही वाचनात आलेल्या होत्या. तशा इतरही अनेक अशा संस्था होत्या, ज्यांची कुमार केतकरांनी सविस्तर यादी त्यांच्या लेखात दिलेली आहे. या संस्थांची माहिती कानावर पडत होती. सगळ्याच नव्हे, पण काहींची. पण त्यातली सगळ्यात मोठी उणीव होती ती समजून घेण्याची. संस्था चालवताना घ्यावे लागणारे कष्ट आणि होणारे त्याचे परिणाम हे विषय आहेतच. विषय आहे तो चळवळीत उतरलेल्या युवकांचा. त्यांना त्यावेळी या संस्थांच्या चळवळीविषयी नेमके काय वाटत होते. त्या स्थापन करण्याचा वा त्यात सहभागी होण्याचा ध्यास कसा निर्माण झाला. आणि त्यातून उद्देशाच्या शिखराला हात लागल्याचे समाधान मिळाले का?

संजीव खांडेकर यांनी हाती घेतलेल्या या प्रकल्पाचा संकल्प त्या दृष्टीने मोलाचा वाटतो. त्यांची भूमिका आणि तो पूर्ण करण्यासाठी केलेली दगदग समजून घेण्यासारखी आहे. ध्येय आणि शल्य उरी बाळगणे तसे क्लेशदायकच. जे गवसले त्याचे मोल करता येणार नाही. मात्र त्यासाठी प्रस्तावना शांतपणे वाचणे गरजेचे आहे. लेखांइतक्याच प्रस्तावनादेखील अंतर्मुख करणाऱ्या आहेत.

या संकल्पाचे तीन भाग करण्याात आलेले आहे. पहिल्या भागात मनोगते आहेत. ज्यांची मनोगते यात आलेली आहेत ते सर्वजण चळवळीचे प्रणेते आणि प्राणदाते आहेत. खांडेकांच्या हाकेला प्रतिसाद देणाऱ्या या चळवळकर्त्यांची संख्या आहे सोळा. पहिलेच नाव आहे नरेंद्र दाभोलकरांचे. (आज हयात नाहीत हे सत्य. याला दुर्दैव म्हणायचे तर ते कुणाचे? चळवळीचे की दैवाचे?) आज त्यांच्याविषयीची जनमानसात निर्माण झालेली प्रतिमा आहे ती अंधश्रद्धाविषयी लढा देणारा योद्धा अशी. परंतु त्यांचा या पुस्तकातला लेख वाचला तर त्यांनी त्यावेळी सुरू केलेली चळवळ, आणि त्याद्वारे केलेले कार्य हे त्यापलीकडचे होते असे लक्षात येते.

दुसरे उदाहरण घ्यायचे तर कुमार सप्तर्षी यांचे घेता येईल. आजकाल अनेकदा त्यांचे दर्शन दूरदर्शनवरील काही कार्यक्रमांतून होताना दिसते. परंतु खरा कुमार समजून घ्यायचा तर त्याचा लेख आवर्जून वाचायला हवा. कुमारने सुरू केलेले 'युक्रांद' आणि त्यांची स्वतःची जडणघडण हा काळ १९७७ पर्यंतचा आहे. ध्येयवादाच्या त्याकाळात त्यांना भेटलेली प्रेरक आणि मार्गदर्शक मंडळी आणि घडत गेलेल्या घटना, यांनी त्यांच्यावर कसा परिणाम केला, हे तपशील कार्यकर्त्याचे साधन, साधना आणि साध्य यांचा संघर्ष उलगणारे आहेत.

रझिया पटेल, वाहरू सोनवणे, नीलम गोऱ्हे, पार्थ पोळके, प्रेरणा राणे, दीनानाथ मानेहर, विश्वास काकडे, शारदा साठे, जगदीश गोडबोले, सुभाष जोशी, प्रतिभा जोशी, प्रवीण वाघ, सुनील तांबे, सुहास परांजपे यांच्या मनाचा तळ त्यांच्या लेखांमधून उघड झालेला आहे. प्रत्येकाची सांगण्याची, व्यक्त होण्याची पद्धती वेगवेगळी आहे, तरी सूत्र तेच आहे.

दुसरा भास आहे 'निरीक्षणे.' यात वसंत पळशीकर, अविनाश सप्रे, म.द. हातकणंगलेकर, लक्ष्मण माने आणि कुमार केतकर यांनी या कालखंडाविषयी आपली निरीक्षणे नोंदविलेली आहेत. कुमार केतकरांचा बाज आपणा सगळ्यांना ठाऊक आहेच. त्यांनी केवळ सामाजिक चळवळीविषयी निरीक्षणे नोंदवलेली आहेत असे नाही. साहित्य, संस्कृती, कामगार, राजकारण अशा सगळ्याच क्षेत्रांतल्या बदलाबाबत; तिन्ही काळांचा संदर्भ ठेवून त्यांनी मते मांडलेली आहेत. तीही अतिशय परखडपणे आणि तितकीच सूक्ष्मपणे. त्यांच्या काळाचे वर्णन करताना ते लिहितात, 'या चळवळी आपल्या एकांड्या वैभवात तळपत आहेत. पण त्यांची अवस्था खुंटलेल्या वाटांसारखी झाली आहे, आणि ते अपरिहार्य आहे.'

शेवटच्या भागात मधुकरराव देवल यांची मुलाखत दिलेली आहे. आणि खांडेकरांची 'लाकूडतोड्याची गोष्ट' ही कविता आहे. खूप दिवसांनी एक चांगले पुस्तक वाचल्याचा आनंद मिळाला.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

गावोगावी प्रौढसाक्षरतावर्ग चालवावेत, 'निशाणी डावा अंगठा' ही खूण पुसली जावी, त्यासाठी जे प्रयत्न केले जातात त्याचे नाव आहे 'साक्षरता अभियान.' हेतू उदात्त आहे. काम ही सोपे. प्रत्येक गावातून पंधरा ते पस्तीस वयोगटातील निरक्षरांचा शोध घेऊन याद्या तयार करणे. दहा निरक्षरांचा एक वर्ग करणे. त्यावर स्वयंसेवक नेमून हे कार्य चालवणे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण आणि साहित्य उपलब्ध करून देणे. या कार्यावर देखरेख करण्यासाठी प्रत्येक केंद्रावर एक पूर्णवेळ कार्यकर्ता, शिक्षक असलेला. त्याचे काम म्हणजे साक्षरतावर्गांना रात्री भेटी देणे. सात ते दहापर्यंत. बस्स, तीन घंटे काम. गावात साक्षरतावर्ग चालतील. गाव साक्षर होईल. 'डावा अंगठा' ही निशाणी पुसली जाईल. किती सोपं! प्रश्न आहे तो, त्याप्रमाणे हेतू साध्य होतो का?




या अभियानात सहभागी झालेला पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणजे रंगनाथ भास्कर डुकरे. दिवसभर मास्तरकी करण्यापेक्षा हे काम उत्तम. तो या अभियानात उडी घेतो, मोठ्या उत्साहाने. पुन्हा प्रश्न उपस्थित होतो, त्याचा हा उत्साह शेवटपर्यंत टिकतो तो कसा? आणि अभियानाची सांगता होते ती कशी?

साक्षरता अभियान हा आपल्या सगळ्यांना नक्कीच ठाऊक असणारा विषय. त्यातून तो शासकीय उपक्रमाचा एक भाग. त्याच्या यशस्वितेबाबत मनात काही शंका आली तर नवल वाटायला नकोच. परंतु ही कादंबरी केवळ त्या अभियानाचे चित्रण करते असे नाही. त्यानिमित्ताने शाळा आणि त्यात सहभागी झालेले शिक्षक, समन्वयक, संबंधित अधिकारी, गाव, गावकरी, गावचे पुढारी, पंच, सरपंच यांचेही चित्रण करते. यात आलेल्या पात्रांची संख्या बरीच मोठी आहे. त्या प्रत्येकाची स्वभाववैशिष्ट्ये, वागण्याची रीत, बोलण्याची ढब, लय, तिच्यातला तिरकसपणा, उपहास, प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन या सगळ्यांना तिने आपल्या कवेत घेतले आहे.

भाषेचा बाज हा बुलडाणा-अमरावतीकडचा. त्यामुळे तिच्यातली लय आपली छाप घेऊन आलेली आहे. मनुष्यस्वभाव किती प्रकारचे असू शकतात, आणि एकाच प्रसंगावर प्रत्येकजण कसा वेगवेगळा कृती करू शकतो, याचा प्रत्यय प्रत्येक प्रसंगातून येतो. संवाद ही तर मोठीच जमेची बाजू. सहजपणा, उपहास, उपरोध, मिश्किलपणा, हे अचूक घाव घालणारे गुण. तर काही प्रसंगी इरसालपणा, मुळात दडलेला आणि प्रसंगी उफाळून वर येणारे अस्सल शीवराळ काटे संवादाची कनात घट्ट ठोकून उभी करतात. त्यातून घटनेतील वास्तवतेचा दाहक किंवा सौम्य प्रकार तर उघड होतोच, पण विनोदाची झालरही डौलाने फडकताना दिसते. हे गुण अंगभूत असल्याने त्यात कुठे कृत्रिमपणा वा भडकपणा जाणवत नाही. जसे,

'आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन हा काही जयंती नाही की पुण्यतिथी नाही, की कुणाचा फोटो काढावं. पुसावं. हार करावं. निरक्षराहीले हार घातले असते तं होतं बुवा.'

'पर्यटन शब्दाचा अर्थ तं याले डिक्शनरीत सापडला तरी समजणार नाही. मी तं म्हणतो पोराहीसंगं सहलीत होतं तेवढंच याचं पर्यटन. मले तं खात्री हाये, की त्यानं अजून आगगाडीबी बरोबर पाह्यली नसंन. बसणं तर दूरच.'

'अक्षराची संगत - जीवनात रंगत.' असा अक्षराफिक्क्षेरानं कुठं जीवनात रंग येतो का? ते पूस अन् लिव्ह 'बाटलीची संगत- जीवनात रंगत.'

रंभा डुकरेसोबत भाऊ राठोड, नामदेव, जुबड, जावई असे शिक्षक आहेत. तशा काळबोधबाई, बोगदेबाई, केप्राबाई यांसारख्या शिक्षिका आहेत. कमरुद्दीन काझी नावाचा साहेब आहे. या प्रत्येकाचा कस अभियान राबवताना कसा लागला, याचे वर्णन वाचताना छान मनोरंजन होते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लबाडीला बक्षीस जाहीर होते तेव्हा लेखक नमूद करतात, 'बातमी वाचून-ऐकून कुणालाही म्हणजे अगदी एकालासुद्धा वाईट वाटलं नाही. दुःख झालं नाही. '

ही कादंबरी लेखनाचा वेगळा बाज घेऊन आली आहे. ती वाचत असताना 'कोसला'ची आठवण होते. निवेदन आणि स्वगत अशा दोन्ही पातळ्यांवर ती पुढे जात राहते. तिचे प्रवाहीपण वाचनाचा आनंद देत जाते.

उदय पटवर्धन यांनी मुखपृष्ठावरील दाखवलेला 'अंगठा' हा अभियानाला मिळाललेल्या यशस्वितेचे प्रगतीपत्र म्हणून तर दाखवलेला नाही ना, अशी शंका यावी, इतका चपखलपणे वापरला आहे.

- **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान

मागे एकदा म्हैसूरला गेलो होतो. तिथे पॅलेसमध्ये एका चित्राने मनाला भुरळ घातली. हातात दिवा धरलेली युवती. दिव्याच्या ज्योतीला वारा लागू नये म्हणून तिने हाताने धरलेला आडोसा. दिव्याची प्रभा त्या युवतीच्या चेहऱ्यावर पसरलेली. शिवाय छातीजवळचा भाग उजळून निघालेला. परंतु जास्त लक्षात येत होते ते तिच्या बोटांच्या पाकळ्यांमधून पाझरणारा प्रकाश. बराचवेळ ते चित्र पाहात राहिलो. आकाराने ते मोठेही होते. त्याचप्रकारचे आणखी एक चित्र हैदराबादच्या सलारजंग म्युझियममध्ये पाहिले. पण त्याचा निर्माता कोण इकडे त्यावेळी लक्ष गेले नाही. पुढे हे चित्र सा. ल. हळदणकरांचे आहे असे कळले. पण हळदणकर कोण हे काही माहीत नव्हते. ते माहीत झाले 'बॉम्बे स्कूल आठवणीतले, अनुभवातले' या पुस्तकामुळे. नुसते माहीत झाले नाही तर, हळदणकरांची अशा तऱ्हेची दोन चित्रे आहेत– 'ग्लो ऑफ होप' आणि ' निरांजनी' – ती पाहण्याची संधी मिळाली. चित्रकाराविषयीची माहितीही वाचायला मिळाली. आणि पुन्हा म्हैसूर व सलारजंग म्युझियममधील स्मृती ताज्या झाल्या.




सुहास बहुळकर यांचे हे मोठ्या आकाराचे पुस्तक. पुस्तकरूपाने त्यांची भेट प्रथमच होत आहे. परंतु दिवाळी अंकांतून यापूर्वी त्यांची भेट झाली आहे. एशियाटिक सोसायटीत दुर्गाबाई भागवतांचे पोट्रेट लावण्यात आले. ते त्यांनीच साकारलेले होते. त्या कार्यक्रमात बहुळकरांना प्रथम पाहण्याची, ऐकण्याची संधी मिळाली. या पोट्रेटसाठी किती आणि कशी मेहनत घ्यावी लागली ते ऐकले. महाराष्ट्र टाइम्समध्ये त्यांचा त्यासंबधाने विस्तृत लेखही वाचनात आला होता. तेव्हापासून बहुळकरांविषयी एक कुतूहल वाटू लागले होते. ते कुतूहल या पुस्तक प्रकाशनाच्या दिवशी बऱ्यापैकी शांत झाले. कारण या दिवशी त्यांच्याशी बोलण्याची संधी मिळाली होती.

सुहास बहुळकर हे उत्तम चित्रकार आहेत, परंतु त्यांनी आतापर्यंत लेखन केले ते इतर चित्रकार आणि त्यांची चित्रे यावर, स्वतःला वगळून. या पुस्तकात हळदणकर, ज.द. गोंधळेकर, प्रा. बी.एन. सुखडवाला, शंकर पळशीकर, ग.ना. जाधव, नागेश साबणणवर, बाबुराव सडवेलकर, डॉ. भय्यासाहेब ओंकार, संभाजी कदम, प्रफुल्ला डहाणूकर, मुकुंद केळकर अशा मोठमोठ्या चित्रकारांविषयी त्यांनी लिहिले आहे. त्यांच्या चित्रांविषयी लिहिले आहे. चित्र काढण्याच्या पद्धती, लकब, कसब या विषयी लिहिले आहे. त्यांचा कालखंड, त्यांचा दृष्टिकोन, त्यांचे शिकवणे, त्यांचे वैयक्तिक वागणे असे सारेच यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे यात पुढे स्वतः बहुळकरही सहभागी झालेले आहेत. बहुळकर स्वतः बॉम्बे स्कूलच्या परंपरेतून आलेले, तिचे ऋण मानणारे, अभ्यासक आणि कलासंवर्धक आहेत. त्यामुळे त्यांचे हे पुस्तक अनुभव आणि आठवणीतले म्हटले आहे ते या अर्थाने.

आता 'जे जे स्कूल ऑफ आर्ट' म्हणून आपण ज्या संस्थेला ओळखतो तिची कलापरंपरा आहे ती बॉम्बे स्कूलची. जिची स्थापना झाली २ मार्च १८५७ रोजी. बॉम्बे स्कूल ही संज्ञा मुख्यतः मुंबईच्या सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये ब्रिटिश चित्रकलेच्या परंपरेतून आलेले यथार्थवादी चित्रण आणि त्यात प्रावीण्य प्राप्त केलेल्या चित्रकारांच्या संदर्भात वापरली जाते. बेंगाल स्कूल , बडोदा स्कूल याप्रमाणे बॉम्बे स्कूल. प्रमुखपदी आलेल्या ब्रिटिश आणि भारतीय चित्रकारांची मोठी परंपरा असलेल्या या स्कूलमध्ये प्रत्येकाने आपली छाप निर्माण केलेली आहे. सेसिल बर्न, कॅ. ग्लॅडस्टन सालोमन, चार्ल्स जेरार्ड, व्ही. एस. अडूरकर, जे.डी. गोंधळेकर ही त्यांची नावे. कॅ. सालोमन यांनी सुरू केलेला 'न्यूड स्टडीज'चा अभ्यास, व पुढे 'इंडियन डेकोरटिव्ह पेंटिंग'चा स्वतंत्र वर्ग. यांना बॉम्बे रिव्हायव्हलिस्ट चळवळीचे प्रणेते मानले गेले. पुढे इतर डायरेक्टरांनी निर्माण केलेली परंपरा, त्याच काळात असलेले प्राध्यापक आणि नंतर आलेले प्राध्यापक, ज्यांची नावे वर आली आहेत. त्यांचा काळ, त्यांची हातोटी, वैशिष्ट्ये, स्वभाव, केलेले संस्कार या सगळ्यांचा सखोल शोध घेतलेला आहे. बारकाव्यांसहित त्यांचे वर्णन केलेले आहे. मग ती गोंधळेकरांची सिगारेट ओढण्याची लकब असो की, पळशीकरांची निवृत्तीच्या निमित्ताने निर्माण झालेली उदासीनता असो.

बहुळकर नुसतेच संस्थेचा इतिहास वा माहिती देत नाहीत, तर अनेक प्रसंगही आपल्यासमोर ठेवतात. अनावृत्त स्त्री मॉडेल अचानक समोर हजर झालेली पाहून गर्भगळित झालेला जगू शहा या विद्यार्थ्याचा प्रसंग, पळशीकर अग्निकुंडाला एकेक चित्र समर्पण करत असताना आठवलेली गुणाढ्य ऋषीची कथा, साबणवरसरांचे वापरत असलेल्या हत्याराशी असलेले नाते, आणि नैनिताल स्टडी टूरच्या वेळी याच सरांनी शिस्तीच्या निमित्ताने रेल्वे डब्यात मुलामुलींची केलेली विभागणी... असे कितीतरी प्रसंग यात मजेशीरपणे सादर केलेले आहेत. सगळ्यात उत्तम समन्वय साधला आहे तो चित्रांनी. प्रत्येक चित्रकाराची चित्रे आणि त्यांची स्वतःची पोट्रेट्स या पुस्तकात सोबत छापलेली आहेत. पेन इंक, जलरंग, तैलरंग, पेन्सिल यात चितारलेली. त्यात काही रंगीत आहेत. ही चित्रे पाहणे हीच मोठी मेजवानी वाचकासाठी ठरली आहे. 'दृश्यकला'कोश तयार करण्यात बहुळकरांचा मोठा वाटा आहे. परंतु प्रस्तुतचे पुस्तक हे त्याच्याच परंपरेतले समजायला हरकत नाही. विशेष म्हणजे, बहुळकर स्वतः चित्रकार असूनही त्यांच्या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले ते सतीश भावसार यांनी. तर त्यांच्या पुस्तकाचे उत्तम संपादन केले आहे दीपक घारे यांनी.

- **मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु.**




# ग्रंथपान




कवी किशोर पाठक यांचा प्रकाशित झालेला हा नवा कवितासंग्रह. बरोबर शंभर कविता असलेला. प्रत्येक कवितेत एकेक अनुभव वेचून काढलेला. एकेका अनुभवाचे पदर अलगद बाजूला करून त्यातला अर्काचा पुंकेसर शोधून काढलेला, फुलासारखा. असा हा कवितांचा संग्रह. कवीच्या अगोदरच्या पाच कवितासंग्रहांची चढती कमान कायम ठेवणारा. नावातले अनोखेपण जपणारा. 'आभाळाचा अनुस्वर', 'मी मृगजळ पेरीत', 'पालव', 'संम्भवा' आणि 'निरूपण' याप्रमाणेच शीर्षक असलेला 'काळा तुकतुकीत उजेड'.

शीर्षकाच्या धुक्यातून वाचक डोळे किलकिले करून अंदाज घेईल तेव्हा त्याची शंका या उजेड आणि काळोखाशीच विसावण्याची शक्यता जास्त. पण कुठलाही संग्रह पूर्ण वाचल्याशिवाय असे अनुमान काढणे योग्य नाही. त्यामुळे स्वतःचीच फसगत होण्याची शक्यता असते, याचे भान हा कवितासंग्रह जागे करतो. या शीर्षकाच्या ओळी असलेल्या पृ. क्र. ९७ वरील कवितेत कवी प्रकाशाची ग्वाही देतो,

माझ्या लेखणीतून उगवतो ना शुभ्र काळोख
आणि काळा तुकतुकीत उजेड.

हा संपूर्ण संग्रह व्यवस्थित मांडणीत सजवलेला आहे. एकेक मजला चढत उंच इमारतीत शिरावे तशी ही मांडणी आहे. भावभावनांची आदोलने सुरुवातीच्या कवितांमधून आपल्याला जाणवत राहतात. कवी आपल्या कोषात गुरफटलेल्या सहचराला उपदेश करतो,

सोड तू निळ्या शांततेचा एखादा ढग समजावणीचा
आणि पुसून टाक काळेकभिन्न ढगांचे डाग पावसाच्या धारांनी.

रडणे हा काही अपूर्वाईचा ऐवज नाही. परंतु जन्माला येणाऱ्या लहान बाळाच्या रडण्याची प्रत्येकजण किती आतुरतेने वाट पाहत असतो. ते रडले की माणसे कशी आनंदीत होतात हे पृ.क्र.२० वरील कवितेत वाचायला मिळते. साचेबंद जगणे आणि स्वैर जगणे याबाबत कवीची भूमिका आहे संयमाची.

जगण्याचा कासरा ढिला सोडला तर आयुष्य वाऱ्यावर उधळायचे
त्यापेक्षा कासरा थोडा आवळून धरावा.

बाईपणाच्या कवितांचा एक टप्पा आपल्याला रोखून ठेवतो. काही क्षणासाठी पत्नी आणि अनंत काळाची माता असे हे बाईचे रूप. तरी ती अनंत काळ संसाराच्या खुराड्यात पत्नीपणाचा कारावास भोगत असते. आणि त्याचवेळी प्रेयसी असण्याचा काळही जपत असते अनंतकाळासाठी. बाई असणे हेच तिचे शस्त्र असते. गलितगात्र झालेल्या पुरुषाच्या हाती तीच ते शस्त्र सोपवते, पुन्हा विजयासाठी. संसारासाठी तीच दुपारची चुंबळ करून सूर्याला कळशीत भरून भराभरा चालत राहते. ती नवऱ्याला विचारते,

मी भांगात कुंकू भरले नाही तुझ्यासाठी
मळवट भरलाय सती जाण्यासाठी
तू चिता होशील ना?

कवी कवितेची अनेक रूपे उलगडून दाखवतो. कविता कवीसाठी फूल होते, वही होते, खळाळ नदी होते, स्वयंपाकाची चूल होते, स्त्री होते, जगण्याचा एक थेंब होते. कविता जगवते आपल्याला ह्या दुधखुळ्या कल्पनांवर, असे म्हणताना कवी कवितेलाच आवाहन करतो,

कविते पुरून टाक मला तुझ्या मातीत
गाडून टाक न सापडण्याइतका.

या संग्रहात माणसाच्या कविता आहेत. माणूसपणाच्या कविता आहेत. उजेड-काळोखाच्या सावल्या आहेत. बुबुळांना दिसणारे जग आहे. ते सुद्धा कवीला वेगवेगळे भासते, 'बुबुळांच्या आड लपलेला अंधार', 'अंधाराच्या बुबुळांनी वाचत राहतो प्रकाश', ' लुकलुकत्या बुबुळांचे अथांग आभाळ'. असाच 'भण्ण' हा शब्द. तो अनेक संदर्भ घेऊन येतो.'भण्ण प्रवास, भण्ण मस्तक, भण्ण डोके, भण्ण योगिनी'.

मुखपृष्ठ रविमुकुल आणि संग्रहाची सजावट श्रीधर अंभोरे यांनी केली आहे. कवितेला अनुसरून रेखाचित्रे रेखाटलेली आहेत. कविता अनेक अंगांनी फुललेली असली तरी तिचा आकृतिबंध लहान आहे. शिवाय कवितांना शीर्षक नाही. त्यामुळे संपूर्ण कविता एकच असून ती तुकड्यातुकड्यात अनुभवाच्या अंगाने साकारलेली आहे असे वाटत राहते.

- **मूल्य १२० रु. सवलतीत ७० रु.**

# 'ग्रंथाली'ची नवी प्रकाशने




## डॉक्टरांच्या जगात

**डॉ. वर्षा दंडवते**

काम करणाऱ्या स्त्रियांना आणि स्त्री डॉक्टरांना अनेक पातळ्यांवर लढा देत जगावे लागते. घरचे काम दोघांनी करायचे की एकटीने? स्त्रियांनी आर्थिक भार पेलायचा की नाही? आपण स्त्रीदुय्यमतेकडून स्त्री-पुरुष समानता आणि कधी कधी बेदरकारपणाच्या पुढच्या टप्प्यावर तर जात नाही ना? यासारखे प्रश्न मांडून सद्य परिस्थितीत स्त्रियांना स्व-परिक्षणाची गरज आहे आणि आत्मभान सावरणे गरजेचे आहे असा निष्कर्ष लेखिका काढते. अतिशय प्रांजळपणे पण तितक्याच तटस्थपणे लिहिलेले हे अनुभव आपल्याला वाचायला मिळतात.

– डॉ. माया तुळपुळे

**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत ११० रुपये**





## आंदकोळ

**किसन चव्हाण**

किसन चव्हाण याचं हे आत्मकथन संक्रमित व कालक्रमिक असून भारदस्त व प्रसंगनिष्ठ आहे त्यासाठी वापरलेली सत्यनिष्ठ, वाचकप्रिय आणि परिवर्तनवादी भाषा समिक्षकांनाही अंतर्मुख करणारी ठरेल. तथागत गौतमबुद्ध, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदि महापुरूषांना अभिप्रेत असणाऱ्या पुरोगामी विचारालाही हे आत्मकथन निश्चितच प्रेरक ठरेल यात शंका नाही.

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**




## पराकाष्ठा

**डॉ. अनंत लाभसेटवार**


दरवर्षी हजारो भारतीय विद्यार्थी अमेरिकेत शिक्षणासाठी येतात. या वास्तव्यात ते सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित व व्यापक दृष्टीचे होतात. तरीपण ते अमेरिकन विवाहपद्धती पाळत नाहीत. लग्न करण्यासाठी ते भारतात जाऊन आईवडिलांच्या नियोजित पद्धतीनं लग्न करतात. म्हणजे एवढं शिकूनही ते पारंपरिक लग्नपद्धतीच वापरतात. भारतीय संस्कृतीच्या स्थैर्याचं ते एक कारण आहे. पारतंत्र्यात कुठलीच परदेशी शक्ती तिचा भेद करू शकली नाही. या कादंबरीत ह्या दोन संस्कृती सामिप्यात आल्यामुळे हा फरक पृष्ठस्थरीय होतो.

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २०० रुपये**

## स्त्रिया आणि दहशतवाद

**डॉ. अंजली रानडे**

मराठीत प्रथमच स्त्रिया आणि दहशतवाद या विषयाचा घेतलेला वेध. दहशतवादाच्या व्यामिश्र जगात स्त्रियांचे स्थान काय, त्यात त्या स्वेच्छेने सहभागी होतात की त्यांच्यावर बळजबरी केली जाते, त्या संघटनेत कोणकोणत्या स्तरांवर कार्यरत असतात, त्या संघटनेत सर्वोच्च पदावर पोचतात की संघटना त्यांचा आपल्या स्वार्थासाठी फक्त वापर करून घेते, याविषयी यातून मिळणारी माहिती कधी आश्चर्यकारक, कधी मती गुंग करणारी, कधी धक्का देणारी तर कधी हृदय हेलावून टाकणारी! प्रत्येकाने वाचायलाच हवे असे पुस्तक.




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## ओढ ईशान्येची

**ज्योती शेट्ये**

ज्योती शेट्ये या काही प्रशिक्षित शिक्षिका नव्हेत, परंतु त्यांना आपद्धर्म म्हणून तेथे नागा मुलामुलींना विज्ञानविषय शिकवावा लागला. त्यासाठी त्यांनी स्वत:ची तयारी केली व ते काम निभावून नेले. त्या ओघात तेथील जीवनाशी जशा एकरूप झाल्या तशा 'वनवासी कल्याणाश्रमा'च्या कार्याशीदेखील जोडल्या गेल्या. या पुस्तकामधून नागभूमीमधील एका खेड्यातील शाळेचे दैनंदिन जीवन उलगडत जाते. तशाच पद्धतीने तो प्रदेश समजत जातो. त्यांनी त्यांच्या डायरीस जोड म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील पूरक माहिती दिली आहे, तीदेखील आपली त्या प्रदेशाची समजूत संपन्न करते.




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

## इये मराठीचिये नगरी

**संपादन : अशोक बेंडखळे**
**डॉ. उज्ज्वला मेहेंदळे**




**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**

आता नऊ व्याख्यानांचा ग्रंथ 'इये मराठीचिये नगरी' या नावाने संघाच्या अष्टदशकपूर्तीच्या निमित्ताने प्रकाशित होत आहे. व्याख्यांनाचा विषय मराठी भाषा आणि तिची वैशिष्ट्ये असा आहे. या सर्व वैशिष्ट्यांचा आणि आयामांचा विचारपूर्वक धांडोळा व्याख्याते डॉ. सुधाकर देशपांडे, डॉ. अरुण टिकेकर, डॉ. यु.म. पठाण, डॉ. कुमुद गोसावी, प्रा. म.रा. जोशी, विद्यावाचस्पति शंकर अभ्यंकर, ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगांवकर, डॉ. निशिकांत मिरजकर, डॉ. द.ता. भोसले यांनी आपापल्या व्याख्यानांतून घेऊन मराठी भाषेच्या अभ्यासकांना मोठे पाथेय पुरवले आहे.

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.

# मादाम क्युरी पुस्तक प्रकाशन समारंभ






अश्विनी भिडे-देशपांडे मराठी अनुवादित 'मादाम क्युरी' या पुस्तकाचे वाचन करताना अमृता सुभाष आणि संदेश कुलकर्णी

अश्विनी भिडे-देशपांडे मराठी अनुवादित 'मादाम क्युरी' पुस्तक प्रकाशनसमयी बोलताना मान्यवर



अश्विनी भिडे-देशपांडे



उषा मेहता



कविता रेगे



कुमार केतकर



अच्युत गोडबोले



अश्विनी भिडे-देशपांडे मराठी अनुवादित 'मादाम क्युरी' पुस्तक प्रकाशनसमयी राजेंद्र देशपांडे, उषा मेहता, लेखिका अश्विनी भिडे-देशपांडे, कविता रेगे, अच्युत गोडबोले, कुमार केतकर आणि सुदेश हिंगलासपूरकर

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.